(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरू....

तालिका सभापती : आपल्याला अर्थसंकल्पावरील चर्चा दीड तासामध्ये पूर्ण करावयाची आहे. अजूनही 15 सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कमीतकमी वेळेमध्ये आपले विचार व्यक्त करावेत. आता सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी आपल्या भाषणास सुरूवात करावी.

श्री.नरेंद्र पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला पहिली संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. राज्याच्या नवीन सरकारने आपला पहिला अर्थसंकल्प मांडण्याचा खूप प्रयत्न केला आहे. या अर्थसंकल्पामध्ये बऱ्याचशा गोष्टी या जुन्या आहेत. त्या नव्याने सादर करण्याचे काम येथे केलेले आहे. मी वेळेचे भान राखून काही मुद्यांवरच सरकारचे लक्ष वेधणार आहे.

महाराष्ट्र हे शेतकरी आणि कामगारांसाठी ओळखले जाणारे राज्य आहे. त्यात उद्योग व शिक्षण क्षेत्राचा देखील समावेश होतो. मेक इन इंडिया प्रमाणे मेक इन महाराष्ट्राची घोषणा करण्यात आली आहे. आता येथे माननीय मंत्री श्री.विनोद तावडे उपस्थित आहेत. आपण मेक इन महाराष्ट्राचा जो उल्लेख केला आहे तो मला काही बरोबर वाटत नाही. काल माननीय कामगार मंत्री सभागृहात उपस्थित होते तेव्हा मला संधी मिळेल असे वाटले होते. पण त्यावेळी मला संधी मिळाली नाही. दिनांक 30 जानेवारी 2015 रोजी कामगार आयुक्तांनी एक परिपत्रक काढले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील...

त्यात त्यांनी मेक इन महाराष्ट्र आणि डिजिटल इंडिया अंतर्गत आपल्याला कामगार कायद्यामध्ये काही बदल सुचवायचे असतील तर ते पत्राद्वारे सुचवावेत असे नमूद केले आहे. महाराष्ट्र आपल्याला घडवायचा असेल, महाराष्ट्रातील तरुणांना रोजगार द्यावयाचा असेल , लोकांना त्यांच्या पायावर उभे करावयाचे असेल तर मग हे कामगार कायदे रद्द करण्याचा मुद्याच कुठे येतो. एका बाजूला सरकारने महाराष्ट्र घडविण्यासाठी मेक इन महाराष्ट्राची घोषणा करायची आणि दुसऱ्या बाजूने महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या 20 कामगार कायदे बदलण्याच्या मुद्याला हात घालण्याचा प्रयत्न करणे हे काही उचित नाही. औद्योगिक सचिव यांच्या माध्यमातून एखाद्या समितीचे गठन होते. केंद्र शासनाचे देखील काही कामगार कायदे असून त्याची अंमलबजावणी राज्यात केली जाते. राज्याचे देखील कामगार कायदे आहेत. महाराष्ट्राचे शिल्पकार आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात कामगार कायदे अस्तित्वात आले. त्यातूनच माथाडी कामगार, घरेलू कामगारांसाठी कायदा करण्यात आला. पण या कायद्यामध्ये बदल करण्याचे काम सरकार करू पाहात आहे. जनतेला काही तरी दिल्याचे एका बाजूला भासवायचे आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातील तरुणांना बेरोजगार करण्याचे कटकारस्थान या सरकारच्या माध्यमातून होत आहे. तेव्हा मेक इन महाराष्ट्र आणि डिजिटल महाराष्ट्रामध्ये नेमका काय फरक आहे हे वित्त राज्यमंत्र्यांनी स्पष्ट करणे गरजेचे आहे. यामुळे कामगार चळवळींमध्ये मोठा असंतोष पसरलेला आहे.

सभापती महोदय, पणन विभागामध्ये राज्य सरकारने भरीव काम करणे गरजेचे आहे. राज्यात एपीएमसी कायदा एका विशेष उद्देशाने निर्माण केला आहे. पण आज त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. शेतकऱ्यांना बाजारभाव मिळावा म्हणून एपीएमसीची स्थापना करण्यात आली. त्यात काही शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना, अडत्यांना जागा मिळाल्या आहेत. एपीएमसी मार्केट सक्षम झाले पाहिजे. राज्य सरकारचा कुठलाही निधी एमपीएमसी मार्केटला दिला जात नाही. त्यांनी त्यांचा निधी निर्माण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करावयाचा आहे व त्यातून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारभाव मिळवून द्यावयाचा आहे. तत्कालीन कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी 100 स्वस्त भाजी केंद्र सुरू केली आहेत. आज त्याचा शहरी भागांमध्ये खूप फायदा होत आहे. बाजारपेठांमध्ये जो फळ-भाज्यांना भाव होता तोच भाव शहरी भागातील 100 आऊटलेटमध्ये मिळायला लागला आहे. त्यामुळे याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, आज आपल्या राज्यात विजेचा तुटवडा आहे. त्यामुळे विंड पॉवर एनर्जी, सोलर एनर्जीवर भर देणे आवश्यक आहे. या दोन्ही एनर्जीसाठी सरकार सबसिडी देत आहे व त्याद्वारे उद्योगपतींना सरकार मदत करीत आहे हे स्पष्ट होते. या शिवाय केंद्र सरकार त्यांना कार्बन क्रेडिट देखील देत आहे. त्याचा फायदा उद्योगपतींनाच झाला. यात सामान्य माणूसच भरडला गेला. आजही सामान्य माणसाला स्वस्त वीज मिळण्याऐवजी महाग वीज मिळत आहे. आता नियमात बदल करून नव्या सकारने कार्बन क्रेडिट देण्याची पद्धती सुरू केलेली आहे. राज्य सरकारने सबसिडी देण्यापेक्षा शासन या क्षेत्रात स्वतः का उतरत नाही हा माझा प्रश्न आहे. शासनाने स्वतःहून या क्षेत्रात गुंतवणूक केली पाहिजे. स्वतःची विंड पॉवर एनर्जी कंपनी सुरू केली तर नक्कीच शासनाला स्वत दरामध्ये वीज मिळू शकेल. यासाठी शासनाला कोणालाही सबसिडी द्यावी लागणार नाही. शेतकऱ्यांच्या जमिनीवर आपण हा प्रकल्प उभा केला तर त्या शेतकऱ्यांना आपण पार्टनर करून घ्यावे किंवा त्यातील काही वाटा त्यांना देण्यात यावा. अशाने शेतकरी देखील जगू शकतो, सरकार जगू शकते आणि ग्राहकांना स्वस्त दरामध्ये वीज उपलब्ध होऊ शकते. तेव्हा याकडे देखील सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय,मुंबई महानगरपालिकेमध्ये एलईडी दिवे बसविण्याचा विषय सध्या चर्चेत आहे.त्याचे स्पष्टीकरण माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील येथे दिलेले आहे.माननीय मुख्यमंत्र्यांनी या पुढे पदपथावर एलईडी दिवे बसविण्यात येतील असे सांगितले आहे.त्यांनी फक्त महानगरपालिकाच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A4

BGO/ AKN/ MMP/ 10:00

श्री.नरेंद्र पाटील...

नव्हे तर नगरपालिका, नगर परिषद क्षेत्रात देखील एलईडी दिवे बसविण्यात येतील असे सांगितले आहे. एलईडी दिवे बसवत असताना आपण सूर्यप्रकाशाच्या माध्यमातून निर्माण होणारी वीज बॅटरीमध्ये कन्व्हर्ट करू शकलो आणि त्याद्वारे सोलर पद्धतीने एलईडी दिवे प्रकाशमान केले तर विजेचा तुटवडा भासणार नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, येथे स्मार्ट सिटीजचा उल्लेख करण्यात आला आहे. महापालिकेत काम करणारा कामगार हा कष्टकरी आहे. महानगरपालिकेच्या क्षेत्रात गिरणी कामगार देखील आहेत. डबेवाला देखील कामगार आहे. महाराष्ट्रातील 288 विविध बाजार समितीच्या माध्यमातून माथाडी कामगार काम करीत आहे. तो विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण या भागात आजही काम करीत आहे. आपण या कामगारांचा विचार का करीत नाही ? विदर्भातील शेतकऱ्यांना शेतीमधून उत्पन्न मिळत नाही म्हणून तो आज हमाली करण्यासाठी जात आहे. हमालीचे काम करीत असताना तो तेथील झोपडपट्टीत राहतो. पुणे येथील गुलटेकडी मार्केटची हीच स्थिती आहे. येथे काम करणारा माणूस हा भोर, जुन्नर येथून आलेला असून आज तो तेथील झोपडपट्टीत राहात आहे. तो शनिवारी आणि रविवारी घरी जातो. उरलेल्या दिवशी तो झोपडपट्टीत राहून त्या एपीएमसीमध्ये काम करीत असतो. राज्य सरकारने एमपीएमसी मार्केट जवळच हमालीचे काम करणाऱ्या कामगारांसाठी 10X10 ची घरे उपलब्ध करून दिली तर बाजारपेठांमधील काम देखील लवकर होईल व कामगारांना स्वतःचे हक्काचे घर देखील मिळेल. तेव्हा स्मार्ट सिटी पेक्षा जे श्रमजीवी कामगार आहेत त्यांच्यासाठी काही तरी करावे अशी मी सूचना करीत आहे. डबेवाला हा देखील कामगार आहे. तो लंडनला जाऊन आला आहे. पण त्या डबेवाल्याला प्रॉव्हीडंट फंड मिळतो काय, ग्रॅज्युईटी मिळते काय, बोनस मिळतो काय, कायद्याद्वारे त्याला सर्व सुरक्षा मिळते काय, हे कोणीही पहायला तयार नाही. तेव्हा अशा दुर्लक्षित असलेल्या कामगारांना आपण न्याय द्यावा ही विनंती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, तीर्थक्षेत्र विकासासंबंधीचा मुद्दा बजेटमध्ये आहे. पश्चिम महाराष्ट्रात देखील मोठ्या प्रमाणावर तीर्थक्षेत्र आहेत. तुळजापूर येथे भवानी माता आहे, कोल्हापूरला महालक्ष्मी आहे. कोल्हापूरचे आराध्य दैवत ज्योतिबा मंदिर हे देखील पश्चिम महाराष्ट्रात आहे.

यानंतर श्री.जुन्नरे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील .....

वाई येथे मांढरादेवी आहे, जेजूररीचा खंडोबा आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात भक्त जात असतात, यात्रा भरत असतात. मांढरादेवी येथे काही वर्षापूर्वी सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे चेंगराचेंगरीत असंख्य भाविक मृत्युमुखी पडले होते. मागच्या सरकारने यामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला होता. आता मांढरादेवी येथे सुरक्षा म्हणून अन्न शिजवले जात नाही.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील आराध्य दैवत ज्योतिबा मंदिरावर अजूनही कोणत्याही प्रकारे सुविधा किंवा सुरक्षिततेकडे लक्ष दिले जात नाही.

सभापती महोदय, माननीय पणन मंत्री श्री. चंद्रकांत पाटील पश्चिम महाराष्ट्रातील आहे, ज्योतिबाच्या मंदिराजवळचेच आहेत. बजेटमध्ये ज्योतिबा मंदिराचा उल्लेख होईल असे वाटले होते परंतु तसे काही झाले नाही. पश्चिम महाराष्ट्रात ज्योतिबाचे एक चांगले तीर्थस्थान असून त्या ठिकाणी लाखो भाविक दर्शनासाठी जात असतात. दिनांक 3 एप्रिल रोजी ज्योतिबाची यात्रा भरणार आहे. या ठिकाणी किती भाविक येतात, वाहनांची काय सोय होते, सुरक्षा कशी केली जाते यासंदर्भात मंत्री महोदयांनी विभागाकडून माहिती घेऊन त्यामध्ये लक्ष घालावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आता तुम्ही शेतीचा इलेक्ट्रिक पंप सोलरवर करीत आहात. ही चांगली गोष्ट आहे. परंतु हा निर्णय मागच्या शासनाने घेतला होता. परंतु सोलर पंपावर या सरकारने लक्ष घातल्याबद्दल आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, ठिबक सिंचनाच्या संदर्भातील उल्लेख बजेटमध्ये दिसून आलेला नाही. मागच्या सरकारने ठिबक सिंचनाच्या अनुदानाच्या संदर्भात निर्णय घेतला होता. कमीतकमी जे ऊस उत्पादक शेतकरी आहेत त्यांच्यासाठी तरी ठिबक सिंचन कम्पलसरी केले गेले पाहिजे. परंतु ही योजना अजूनही अस्तित्वात आलेली नाही. आता पाणी कमी झालेले आहे. कमीतकमी पाण्यामध्ये जास्तीत जास्त शेतीचे उत्पन्न निघाले पाहिजे यासाठी सरकारने ठिबक सिंचनाच्या अनुदानात वाढ करण्याची गरज आहे. ठिबक सिंचन कम्पलसरी केले पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, धरणाच्या संदर्भातील चर्चा अजूनही या ठिकाणी झालेली नाही. युतीचे सरकार 1995 ते 1999 या दरम्यान होते. या सरकारच्या काळात पश्चिम महाराष्ट्रातील सातारा येथे धरणाच्या कामांना सुरुवात झाली होती परंतु त्यातील बऱ्याच धरणांची कामे अद्यापही पूर्ण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील .....

झालेली नाहीत. धरणे ज्या तालुक्यात बांधली जातात त्याच तालुक्यात त्या धरणातील पाण्याचा उपयोग होतो असे नसून त्या धरणातील पाण्याचा उपयोग शेजारच्या इतर भागानांही होत असतो. दुष्काळी भागातील तालुक्यांना पाणी मिळाले पाहिजे असे उद्दिष्ट राज्य सरकारचे असते. परंतु अनुशेषाच्या नावाखाली अजूनही धरणांची कामे पूर्ण झालेली नाहीत. काही ठिकाणी तर धरणग्रस्तांना जागा किंवा त्यांच्या जमिनीचे पैसे सुध्दा मिळाले नाहीत. त्यामुळे या अर्थसकंल्पात अर्थ मंत्र्यांनी लक्ष घालून धरणग्रस्तांना न्याय मिळवून द्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, आज शहरी भागात वाहनांमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण वाढलेले आहे. आपण सोलर एनर्जी, विंड पॉवरची नेहमी चर्चा करीत असतो. परंतु बॅटरी ऑपरेटेड व्हेईकलची चर्चा करीत नाही. त्यामुळे सरकारने बॅटरी ऑपरेटेड व्हेईकलच्या संदर्भात लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. आज बाजारपेठेमध्ये बॅटरी ऑपरेटेड व्हेईकलवर गाडया आल्या असून या गाडयांचे टॅक्सेशन सरकारने कमी केले किंवा रद्द केले तर शहरी भागात बॅटरी ऑपरेटेड व्हेईकलची संख्या वाढेल व आपोआप प्रदूषणाचे प्रमाण कमी होईल. महिंद्र कंपनीने बॅटरीवर चालणारी "रेव्हा"नावाची गाडी तयार केली असून या गाडीची किंमत 7 लक्ष रुपये आहे. जर 3 किंवा 4 लाखामध्ये डिझेल किंवा पेट्रोलवर चालणारी गाडी मिळत असेल तर बॅटरीवर चालणारी 7 लाखाची गाडी कोण घेईल ? बॅटरी ऑपरेटेड व्हेईकल चार्ज करण्यासाठी वीज सुध्दा कमी लागत असते. ही गाडी सोलर एनर्जीवर चार्ज होऊ शकते. या सरकारने क्लिन आणि ग्रीनची घोषणा केलेली असताना नॉन पोल्यूटेड सिटी करण्यामध्ये लक्ष घातले आणि बॅटरी ऑपरेटेड व्हेईकलवरील टॅक्स कमी करुन, सबसिडी देऊन प्रोत्साहन दिले तर शहरी भागातील नागरिक मोठया प्रमाणात बॅटरी ऑपरेटेड व्हेईकल खरेदी करतील व पर्यायाने शहरी भागात प्रदूषण कमी होईल. आता दर दिवशी बाजारामध्ये नवीन गाडया येत असतात, आपल्या येथील कंपन्यांशी परदेशी कंपन्या टायअप करुन गाडया बाजारात उतरवत असतात. दररोज वेगवेगळया गाडया येत असताना त्यांच्यातून किती प्रदूषण होईल याबाबतीत अजिबात विचार केला जात नाही. म्हणून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील .....

परदेशी वाहन कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत, महाराष्ट्रामध्ये गाडया आणावयाच्या असतील तर सरकारने यासंदर्भात बॅटरी ऑपरेटेड व्हेईकलवर भर दिला पाहिजे अशी माझी या निमित्ताने शासनाला सूचना आहे.

सभापती महोदय, मी मांडलेला कामगार विभागाचा मुद्दा फार महत्वाचा आहे. या अर्थसंकल्पाला मी पाठिंबाही देऊ शकत नाही. महाराष्ट्र राज्याला स्व.यशवंतराव यांनी नावारुपाला आणले, स्व.नरेंद्र तिडके यांनी कामगार कायदे तयार केले व स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या अतूट कष्टाने महाराष्ट्रामध्ये माथाडी कामगार कायदा तयार झाला अशा या राज्याला काळिमा फासण्याचे काम सुरु असल्यामुळे मी या अर्थसंकल्पाबाबत खेद व्यक्त करतो. यदाकदाचित मंत्री महोदयांचा महाराष्ट्र घडवायचा विचार झाला तर पहिल्या प्रथम महाराष्ट्रातील कामगारांना रोजगार द्या, कामगारांना घरे द्या, कामगारांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी शक्ती द्या, कामगारांना कामगार कायद्यापासून वंचित करुन बेरोजगार करु नका एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय अर्थसंकल्पावर विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, नवीन सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पामध्ये आमूलाग्र बदल दिसेल असे आम्हाला वाटले होते परंतु तशा प्रकारचा बदल आम्हाला या अर्थसंकल्पात दिसला नाही. ज्या अपेक्षेने या सरकारला जनतेने निवडून दिले ती अपेक्षा हा अर्थसंकल्प पूर्ण करु शकलेला नाही. मागच्या सरकारचा सन 2014-2015 वर्षातील मूल्यावर्धित कर 69 हजार कोटी रुपयांचा होता व या सरकारचा सन 2015-2016 वर्षाचे मूल्यावर्धित कर 74 हजार कोटी रुपये आहे. मागच्या शासनाचे सन 2014-2015 मधील राज्य उत्पादन शुल्क 1150 कोटी रुपये होते व या सरकारचे सन 2015-2016 वर्षाचा राज्य उत्पादन शुल्क 1350 कोटी रुपये आहे. या सरकारने मागच्या सरकारच्या फिगरमध्ये केवळ 5-7 टक्क्यांची वाढ केलेली आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने मागच्या वर्षी जो अर्थसंकल्प सादर केला होता तशाच प्रकारचा अर्थसंकल्प या शासनाने जाहीर केलेला आहे. या अर्थसंकल्पात या शासनाने नवीन कराची किंवा नवीन कर प्रणालीची घोषणा करावयास पाहिजे होती परंतु तशा प्रकारची कोणतीही घोषणा या अर्थसंकल्पात केलेली नाही. आमच्या शासनाने ज्या काही योजना सुरु केल्या होत्या त्या बंद करुन त्या ठिकाणी नवीन योजना या शासनाने सुरु करावयास पाहिजे होत्या परंतु तसे या अर्थसंकल्पात काहीही दिसून आलेले नाही. "अच्छे दिन आनेवाले" म्हणणाऱ्या या सरकारने काही तरी नवीन योजना सुरु करावयास पाहिजे होत्या परंतु तसे काही झाले नाही.

सभापती महोदय, पिंक बुकमधील पृष्ठ क्रमांक 5 वर क्षमतेच्या निर्धारणाचा केंद्राचा हिस्सा 2 लाख 60 हजार 137 कोटी रुपये दाखवलेला आहे. हे आकडे टाईप करताना टाईपिंग मिस्टेक झाली असावी असे मला वाटते. तसेच पिंक बुक मधील पृष्ठ क्रमांक 2 मध्ये केंद्राकडून मिळणारा हिस्सा 2906194 कोटी रुपये इतका दाखवला आहे. यावरुन आम्ही नेमके काय समजायचे ? अगोदर 14 व्या वित्त आयोगाच्या शिफारसीमध्ये आपल्याला सुरुवातीला 32 टक्के हिस्सा मिळत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हरिसिंग राठोड .....

होता आता तो या वेळेस 42 टक्के मिळणार आहे. या अर्थसंकल्पामध्ये केंद्राकडून आपल्याला कराच्या स्वाने पैसा मिळतो. परंतु त्यासंदर्भातील रिफ्लेक्शन मात्र बजेटमध्ये दिसून येत नसल्यामुळे माननीय अर्थ मंत्र्यांनी यासंदर्भात खुलासा करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या फायनांशिअल स्टेटमेंटमध्ये चुका काढायच्या म्हटल्या तर अर्धा तास निघून जाईल एवढया चुका आहेत. या सभागृहात माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अतिशय गंभीरतेने अर्थसंकल्प सादर केलेला आहे.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

महसुली भांडवली खर्चाच्या जमेवरील तपशीलामध्ये राखीव निधीची टक्केवारी 1770 दाखविण्यात आलेली आहे. मला वाटते ती टायपिंग मिस्टेक असावी.

सभापती महोदय, आपण मागील 42 वर्षापासून एक टॅक्स वसूल करीत नाही. आपणास या टॅक्समधून साधारणत: 7 हजार 174 कोटी रुपये मिळू शकतात. सन 1992 साली या सभागृहात Tax on consumption and sale of electricity असा एक टॅक्स आणला होता. ज्यांचे कन्झम्शन 1 लाख युनिटच्यावर असेल त्यांच्यासाठी हा टॅक्स होता. ग्रामीण भागामध्ये इलेक्ट्रीफिकेशन करावयाचे होते त्यासाठी मोठ्या वीज ग्राहकाकडून हा टॅक्स वसूल करुन तो एमएसईबीला द्यायचा असा या टॅक्सचा उद्देश होता. परंतु त्याचे व्यवस्थित इन्टरप्रिटेश झाले नसल्यामुळे मोठ्या वीजग्राहकाकडून तो टॅक्स वसूल करण्यात आला नाही. आता एमएसईबीने शासनाला पैसे देते आणि शासन पुन्हा ते पैसे एमएसईबीला देते, यामध्ये काही अर्थ नाही. त्यावेळी अलीहसन ममदानी आमदार होते. हे बिल सभागृहात चर्चेला आले होते त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, "Hon. Chairman, I am doubtful whether this tax will be recovered from the consumer or not? However, the Hon. Minister will transpire on this in his reply." त्यावेळी श्री. शंकरराव चव्हाण वित्त मंत्री होते. त्यांनी तो विषय सोडून दिला. मी त्यावेळी अकाऊन्टस ऑफिसर होतो. आपण जे इलेक्ट्रीसिटीचे बिल पाहतो त्याच्या मागे जे टॅरिफ असते ते मी तयार केलेले आहे. आपल्याकडे महाराष्ट्र शासनाचे आर्काव्ह विभाग आहे. आपल्या येथे जे कामकाज होते ते त्या ठिकाणी प्रिझर्व्ह केले जाते. आपल्या येथे जी माहिती मिळणार नाही ती माहिती तेथे मिळते. मी त्या ठिकाणी जाऊन जुनी भाषणे काढली. त्यावेळेस मला जाणवले की, हा टॅक्स अजूनही वसूल होत नाही. आपण तो टॅक्स लावला तर त्यातून 8 हजार कोटी रुपये मिळतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी टी.व्ही.वर सांगितले की, पहिल्यांदा केंद्र सरकारने राज्याला दोन हजार कोटी रुपयांची मदत केलेली आहे. यापूर्वी अशी मदत कधीच मिळाली नाही. परंतु त्यांनी दुसऱ्या क्षणाला सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांना 80 टक्के रक्कम दिलेली आहे, फक्त 20 टक्के रक्कम द्यायची आहे. याचा अर्थ ते दोन हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना देणार नाही, शासन ती मदत स्वत:कडे ठेवणार आहे.

तालिका सभापती (श्री.गोपीकिसन बाजोरिया): मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अजून 10 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आपण आपले भाषण लवकर पूर्ण करावे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही. केंद्र सरकारने पहिल्यांदाच दोन हजार कोटी रुपयांची मदत केली आहे असे माननीय मुख्यमंत्र्याचे म्हणणे चुकीचे आहे. यापूर्वीच्या केंद्र सरकारने यवतमाळ जिल्ह्याला 3 हजार 750 कोटी रुपये दिले होते, हे आपणास आठवत नाही काय ? केंद्र सरकारने जी रक्कम दिलेली आहे ती शेतकऱ्यांना न मिळता सरकारला मिळणार आहे. आपणास ज्या लोकांनी निवडून दिलेले आहे त्यांना इतक्या लवकर विसरु नका, एवढे बोलून मी वेळेअभावी माझे भाषण येथेच पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पाचे समर्थन करण्यासाठी आणि त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम मी या सरकारचे आणि वित्त मंत्री व वित्त राज्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. कारण राज्यातील सर्वसामान्य जनतेला डोळ्यासमोर ठेवून या सरकारने एक चांगला अर्थसंकल्प मांडलेला आहे. या सरकारला सर्वसामान्य जनतेचा आणि शेतकऱ्यांचा अत्यंत कळवळा आहे. या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांकरिता आणि ग्रामीण भागातील जनतेकरिता अनेक योजना घेतल्याचे दिसून येते. पण ज्यांनी वेड्याचे सोंग घेतलेले आहे, त्यांना या चांगल्या गोष्टी दिसणार नाहीत. त्यामुळे त्यांनी चष्मा बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आमच्या अनेक मित्रांनी येथे सांगितले की, अनेक जुन्या योजनांचे नवीन नामकरण केलेले आहे. मागील सरकारने फक्त घोषणा दिलेल्या आहेत, बाकी काही काम केलेले नाही. आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी हिम्मत लागते ती या सरकारने दाखविली आहे याचे आपण भान ठेवावे. आघाडी सरकार मागील 15 वर्षात जे करु शकले नाही ते काम या सरकारने केलेले आहे, त्यामुळे मी पूर्णपणे समाधानी आहे. मी या ठिकाणी पदासाठी आलो नाही, मी तत्त्वासाठी आलो आहे, राज्यातील समाजाच्या हितासाठी मी हा निर्णय घेतलेला आहे जो आपण अनेक वर्षामध्ये घेऊ शकला नाहीत. तेव्हा माझ्यासमोर तुम्ही या गोष्टी बोलू शकणार नाही, (अडथळा)तुम्ही मला या विषयाबाबत सांगू नका. आपण बसून बोलल्यास त्याचे मी उत्तर देऊ शकतो आणि उभे राहून बोलल्यास त्याचे उत्तर मी देऊ शकतो. आपण या विषयावर चर्चा न करता अर्थसंकल्पामध्ये ज्या चांगल्या बाबी मांडलेल्या आहेत त्यावर लक्ष केंद्रित करणे जास्त गरजेचे आहे. चांगल्या गोष्टींचे कौतुक करण्यासाठी मोठे मन लागते आणि तेवढे मोठे मन तुमच्याकडे नाही हा प्रश्न आहे. त्यामुळे आपल्यावर तिकडे बसण्याची वेळ आली. आपण मन मोठे करण्यास शिकावे एवढेच मी येथे सांगतो.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या बाबतीत सरकारचे अभिनंदन करीत असताना नम्रपणे सांगू इच्छितो की, या राज्यात 52 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. एवढ्या मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांची संख्या असताना सुध्दा त्यांना वंचित ठेवण्याचे काम आतापर्यंत झाले आहे. राज्यामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून एकच अर्थसंकल्प मांडला जात आहे. वास्तविक पाहता केंद्र सरकारमध्ये रेल्वेसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडला जातो. आपले राज्य हे पुरोगामी, सुधारणावादी आणि चांगल्या निर्णयांचे पायंडे पाडणारे राज्य आहे. माझी या चर्चेच्या माध्यमातून विनंती आहे की, राज्य सरकारने पुढील वर्षांपासून केवळ शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र कृषी विषयक अर्थसंकल्प मांडावयास पाहिजे. अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडून शेतकऱ्यांना पूर्णपणे दिलासा देण्याचे काम शासनाने करावे. असे केले तर शेतीशी निगडित ज्या बाबी आहेत त्या एकत्र करता येतील आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास परावृत्त करण्यापासून ते त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यापर्यंत अनेक बारीकसारीक गोष्टी आपल्याला करता येतील.

सभापती महोदय, या चर्चेवर बोलत असताना मी मागच्या सरकारमधील कृषी मंत्री माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांचे कौतुक करु इच्छितो. कारण त्यांनी अशाप्रकारे शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प मांडण्यासाठी प्रयत्न केला होता. परंतु मागच्या सरकारमध्ये कुरघोडीचे राजकारण केले जात असल्यामुळे माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांना डोके वर काढू दिले नाही.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी मुद्यावर बोलावे. आता आपली केवळ दोन मिनिटे बाकी आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून एक-एक सन्माननीय सदस्य तास-तास बोलले आहेत.

तालिका सभापती : मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, आज आपल्याकडे वेळ कमी आहे. अजून 10 सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. कृपया आपण समजून घ्यावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, हे सार्वभौम सभागृह आहे. त्यामुळे आपण या चर्चेवरील वेळ वाढवून द्यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

महोदय, मी शेतीचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याबाबत बोलत होतो. मागच्या सरकारमध्ये माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या संदर्भात केलेला प्रयत्न हाणून पाडला गेला. या निमित्ताने माझी मागणी आहे की, आताच्या सरकारने पुढील वर्षापासून शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर केला पाहिजे. असे केल्यास त्यामध्ये कृषी विषयक अनेक योजना अंतर्भूत करता येतील.

महोदय, गेल्या चार-पाच वर्षापासून आपल्या राज्यात सातत्याने कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस अशी नैसर्गिक संकटे येत आहेत. या संकटांपासून राज्यातील शेतकऱ्यांना आधार द्यावयाचा असेल तर त्यांच्यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करणे गरजेचे आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

सभापती महोदय, राज्य सरकारने "मोतीरामजी लहाने कृषी समृध्दी योजना" राबविण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी सरकारचे मनापासून कौतुक करतो. यवतमाळ जिल्ह्यापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु झाले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सदरहू योजना यवतमाळ जिल्ह्यात सुरु केली ही खरोखरच चांगली गोष्ट आहे.

महोदय, या सरकारने सावकारांचे कर्ज फेडण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय एका बाजूला चांगला म्हणता येईल आणि दुसऱ्या बाजूला असे केल्याने वाईट प्रथा पडेल असे म्हणता येईल. ज्या शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतलेले आहे त्यांचे कर्ज आणि व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी 171 कोटी रुपये अदा करण्याचा सुध्दा निर्णय घेतलेला आहे. महोदय, मी विचारु इच्छितो की, हे सावकार कोण आहेत, त्यांच्याकडे परवाना आहे काय, त्यांच्याकडून शेतकऱ्यांनी शेतीसाठीच कर्ज घेतले आहे का, असे अनेक प्रश्न यातून निर्माण होतील. एकूण सावकारांपैकी विदर्भामध्ये 75 टक्के सावकार आहेत. या सावकारांना वेसन घालण्याऐवजी शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले तर तो वाईट प्रघात पडेल, असे माझे वैयक्तिक मत आहे. मग याला पर्याय काय आहे ? महोदय, याला एक पर्याय म्हणजे शेतकऱ्यांनी जे पीक कर्ज घेतलेले आहे ते माफ करावयास पाहिजे. असे केले तर थेट सर्व शेतकऱ्यांना त्याचा फायदा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होईल. कदाचित ही रक्कम 171 कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल, ती रक्कम 500 कोटी रुपयांपर्यंत सुध्दा जाईल. परंतु शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ केल्यास त्याचा नक्की शेतकऱ्यांना लाभ मिळू शकेल. राज्यातील अनेक जिल्हा सहकारी बँका ठराविक लोकांनी बुडविल्या आहेत. त्या कोणी बुडविल्या किंवा त्यातून कोणाची घरे भरली, याबाबत मी आता काही सांगणार नाही. परंतु यातून मार्ग काढणे गरजेचे आहे. महोदय, सहकार विभागाला विश्वासात घेऊन, ज्या चांगल्या पतसंस्था किंवा अर्बन बँका आहेत त्यांना शेतकऱ्यांना कर्ज देण्यास बाध्य करु शकतो काय किंवा या कामी त्यांना सामील करुन घेऊ शकतो काय, तसेच या दृष्टीने कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याबाबत सरकारने निश्चितपणे विचार करावा.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता आपण भाषणाचा समारोप करावा. अजून 10 सन्माननीय सदस्यांना या चर्चेवर बोलायचे आहे. कोणत्याही परिस्थितीत आज ही चर्चा सकाळी 11.30 वाजेपर्यंत संपवावयाची आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला माझे भाषण संपविण्यासाठी अजून 15 मिनिटे लागणार आहेत. वास्तविक पाहता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर सर्वच सन्माननीय सदस्यांची बोलण्याची इच्छा असते आणि सर्वजण बोलत असतात. मला वाटते आपण सत्ताधारी आणि विरोधी बाजूच्या वेळेचे मूल्यमापन केले पाहिजे. माझी विनंती आहे की, आम्हाला या अर्थसंकल्पावरील चर्चेवर बोलण्यासाठी अधिक वेळ मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, राज्य सरकारने मोतीरामजी लहाने कृषी समृध्दी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. माझी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, इतर योजना करीत असतानाच शेतकऱ्यांच्या मुलांसाठी एक काम करणे गरजेचे आहे. कारखाने, सूतगिरण्या किंवा अन्य उद्योगांना शासन जसे भाग भांडवल पुरविते तशाच प्रकारे राज्यामध्ये ज्यांच्या नावावर 7/12 चा उतारा आहे त्यांच्या मुलाला किंवा मुलीला कृषी प्रक्रिया उद्योग उभा करण्यासाठी शासनाने भाग भांडवल पुरविले पाहिजे. प्रत्येक तालुक्यामध्ये एमआयडीसी करण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. अशाच प्रकारे कृषी प्रक्रिया वसाहती तालुका स्तरावर नव्हे, पण जिल्हा स्तरावर करण्यास सुरुवात केली आणि त्यास सरकारने भाग भांडवल पुरविले तर राज्यातील शेतकऱ्यांना समृध्द करता येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी दुधाच्या पर्यायी व्यवसायावर उभा राहिला आहे. परिणामी, त्या भागात मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांनी उभारलेल्या कृषी प्रक्रिया उद्योगांना शासनाने भाग भांडवल पुरविल्यास त्याचा फायदा शेतकरी बांधवांना होईल. माझी विनंती आहे की, शासनाने या बाबत योग्य तो विचार करावा.

सभापती महोदय, राज्य सरकारने "प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना" या नावाने योजना सुरु करण्याचे ठरविले आहे. या योजनेंतर्गत तरुणांना ते करीत असलेल्या किंवा त्यांचा कल असलेल्या रोजगारासाठी प्रशिक्षण तसेच स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. सदरहू योजनेची सांगड घालून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन ही योजना पूर्णत्वास नेऊ शकतो, असे माझे मत आहे. या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन देण्याचे सरकारचे जे ध्येय आहे ते पूर्ण होण्याच्या दृष्टीने सरकार अग्रेसर राहील, असे माझे स्पष्ट मत आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे ....

शेतीशी संबंधित सिंचनाचे प्रश्न आहेत. अनेक भागात कमी पाऊस पडत असल्यामुळे तेथे सिंचन कमी आहे. आपल्याला असलेल्या पाण्यातून सिंचन कसे करता येईल हे पाहिले पाहिजे. सूक्ष्म सिंचन, जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून सिंचन वाढविले पाहिजे. सदर योजनांच्या माध्यमातून पाणी अडविण्याचे धोरण योग्य आहे. शासनाने यासाठी चांगल्या प्रकारची आर्थिक तरतूद केली आहे. रखडलेल्या प्रकल्पांतून 38 प्रकल्प निवडले आहेत आणि याकरिता 7272 कोटी रूपयांची तरतूद केली आहे याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सर्व योजनांना मान्यता देऊन सर्वच प्रकल्प अपूर्ण ठेवण्यापेक्षा ते टप्प्याटप्प्याने पूर्ण केले तर त्या भागाला न्याय देता येऊ शकतो, त्यामुळे त्यांना फायदा होऊ शकतो. माझी अपेक्षा एवढीच आहे की, आमच्या 21 टीएमसीच्या पाण्याच्या प्रकल्पासाठी निधी दिला तर बरे होईल. सदर बाबतीत निर्णय घेतला तर बरे होईल. कृष्णा खोऱ्यातून 21 टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याचा प्रश्न आहे. रखडलेले प्रकल्प अर्थसंकल्पामध्ये येणे आवश्यक आहे. शासनाने चांगली योजना केली आहे. महाराष्ट्रात रेल्वेचे जाळे आणखी वाढणे गरजेचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन जॉईंट व्हेंचर, स्पेशल परपज व्हेईकल संदर्भात चर्चा केली. केंद्र शासन, रेल्वे प्रशासन व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने हे करावयाचे आहे. आपण त्यासाठी 68 कोटी रूपयांची तरतूद केली आहे ही अतिशय अभिनंदनाची गोष्ट आहे. त्यामुळे नक्कीच रेल्वेचे प्रकल्प मार्गी लागतील असा मला विश्वास आहे. दळणवळणही वाढेल. आमचा अहमदनगर-बीड-परळ रेल्वे मार्ग 30 वर्षे रखडलेला प्रकल्प आहे. देशातील पहिला प्रकल्प आहे की, केंद्र शासनाचे रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन दोघे मिळून 50-50 टक्के भागिदारीने करणार आहे. मी स्वतः या संदर्भात माननीय रेल्वे मंत्र्यांकडे शिष्टमंडळ घेऊन गेलो. माननीय रेल्वे मंत्र्यांनी आमच्या शब्दाचा मान राखून 144 कोटी रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली. आता त्या न्यायाने आपल्याकडून या प्रकल्पाला 144 कोटी रूपयांची तरतूद होणे गरजेचे होते. गेल्या आठवड्यामध्ये मी याच संदर्भातील लक्षवेधी सूचना आणली होती. आपण त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर दिले की, आम्ही या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे ....

अर्थसंकल्पात तरतूद करीत आहोत. परंतु असे असताना सुध्दा 144 कोटी रूपयाची तरतूद अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. आपण आपल्या उत्तरातून आमच्या रेल्वे प्रकल्पाला तरतूद देणे आवश्यक आहे. कारण ते बंधनकारक आहे. केंद्र शासनाने 144 कोटी रूपये दिल्यामुळे तुम्हालाही 144 कोटी रूपये त्या प्रकल्पासाठी द्यावे लागतील नाही तर आपला हा रेल्वे प्रकल्प रखडेल. 'माझी कन्या भाग्यश्री' ही योजना आणून आताच्या सरकारने चांगले काम केले आहे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण 2 मिनिटांत पूर्ण करावे. माझी आपणास विनंती आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना भाषण करायचे आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण मला विनंती करू नका, आदेश द्या. आम्हाला आमचे म्हणणे तरी मांडू द्यावे. मी 10 मिनिटांत भाषण संपवितो. 'माझी कन्या भाग्यश्री' ही योजना अत्यंत चांगली आहे. 2011 साली जणगणना झाली तेव्हा राज्यात मुलींचे प्रमाण 1000 मुलांच्या पाठीमागे 800 मुली असे होते. मुलींचे प्रमाण घटले होते. आपल्यासमोर हे आकडे आल्यानंतर आपले डोळे उघडले. आघाडी सरकारने त्या दृष्टीने काहीही काम केलेले नाही हे मी अधिकाराने सांगू शकतो. मी त्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. मी बीड मधून आलो आहे, तेथे तर 1000 मुलांच्या पाठीमागे 669 मुली असे प्रमाण खाली आलेले आम्हाला पहायला मिळाले. मी त्या काळात शासनाच्या पाठीमागे लागलो. आपण मुलींचे प्रमाण वाढण्यासाठी योजना सुरू करू असे सांगितले. पण मागच्या सरकारने काहीही केले नाही. मागच्या सरकारने मुलींच्या प्रमाणाच्या बाबतीत अतिशय अनास्था दाखविली. शासन काहीही करीत नही म्हणून आपण गप्प बसता कामा नये म्हणून मी 'अजित बालिका सुरक्षा योजना' या नावाने योजना करून शिरूर तालुका दत्तक घेतला आणि स्व. आर.आर.पाटील यांच्या हस्ते त्या योजनेचे उद्घाटन केले. आज हजारो मुली दत्तक घेतल्या असून त्यांच्या नावावर पैसे ठेवले आहेत. आता 669 मुलींचे प्रमाण 903 झाले आहे, हे त्या योजनेचे यश आहे. मागच्या सरकारने काहीही केले नाही. माझ्यानंतर फक्त माननीय मंत्री श्रीमती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे ....

पंकजा मुंडे यांनी ही योजना सुरू केली होती. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांना विचारू शकता. आपण फक्त यात्रा काढल्या. मी या संदर्भात बोलत नाही. मला राजकारणात जायचे नाही. मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाच्या संदर्भात 75 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, ते चांगले काम केले आहे. ग्रामीण भागातील अल्पसंख्याक समाजासाठी 25 कोटी रुपये दिले, तेही चांगले काम केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांच्या वडिलांच्या नावाने आम्ही, माननीय श्री. मनोहर जोशी, स्व. गोपीनाथ मुंडे साहेब असताना महामंडळ करून घेतले.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण पूर्ण करावे. मी आपल्याला 20 मिनिटे दिली. मला सर्व सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी द्यायची आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय होत आहेत. मला 10 मिनिटे बोलू द्यावे. आपण मला बोलू देत नसाल तर मी सभात्याग करतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य माननीय सभापतींना धमकी देऊन जात आहेत. हे काय चालले आहे, हा आपला अवमान आहे. मी सभागृहाच्या बाहेर जातो असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय होत आहे. आपण किती सन्माननीय सदस्यांना वेळ दिला आहे ते पहावे. आपण मला 10 मिनिटे वेळ देत आहात हे योग्य नाही. सत्ताधारी पक्षाला किती वेळ दिला आहे ते पहा. आमची संख्या कमी आहे म्हणून अन्याय करणे योग्य नाही.

तालिका सभापती : मी आपल्याला संधी दिली आहे. आपण 2 मिनिटांत भाषण संपवा. आपण बोलण्यास सुरुवात करावी.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य 1-1 तास बोलले आहेत. ठीक आहे. बाकी सर्व अल्पसंख्याक मंडळांना मदत दिल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे.....

स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला गेल्या 15 वर्षात 5 पैसे देखील तत्कालीन सरकारने दिलेले नाहीत. माझी या सरकारला अशी विनंती आहे की, येत्या वर्षी या महामंडळाला सरकारने 100 कोटी रुपये द्यावेत. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी आणि माननीय उप मुख्यमंत्री स्व.गोपीनाथजी मुंडे यांच्याकडे आम्ही मागणी केली होती आणि त्यांनीच हे महामंडळ स्थापन केले आहे. त्यांनी निश्चित केलेले उद्दिष्ट या सरकारने पूर्ण करावे, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी या सरकारने 100 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे, त्याबद्दल मी या सरकारचे मन:पूर्वक आभार मानतो. त्याप्रमाणेच स्व.डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्व.बाळासाहेब ठाकरे आणि स्व.गोपीनाथजी मुंडे यांचीही स्मारके अनुक्रमे मुंबई आणि औरंगाबाद येथे उभारण्यात येणार आहेत. त्याबद्दलही मी या सरकारचे अभिनंदन करतो. पण त्याबरोबरच मराठवाड्याचे सुपुत्र स्व.विलासरावजी देशमुख यांना महाराष्ट्र कधीही विसरु शकणार नाही. त्यामुळे पक्षभेद विसरुन त्यांचेही स्मारक उभारण्याबाबतचा निर्णय या सरकारने घ्यावा, अशा प्रकारची आग्रही मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, मला आणखी दोन-चार मुद्दे मांडावयाचे आहेत. परंतु, वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दत्तात्रय सावंत (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, समाजातील सर्व स्तरातील लोकांचे कल्याण करण्याच्या भूमिकेतून आजपर्यंतचे अर्थसंकल्प महाराष्ट्रात सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे हे राज्य संपूर्ण देशात अग्रभागी आले, क्रमांक एक वर आले, असे माझे स्वत:चे मत आहे. सर्वच विषयांना स्पर्श करण्यापेक्षा एका मर्यादित अशा शालेय शिक्षण विभागावर बोलण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात सर्वशिक्षण अभियानाच्या माध्यमातून सर्व शाळांमध्ये उपस्थिती नोंदविण्यासाठी बायोमेट्रिक कार्यप्रणाली अंमलात आणण्यात येणार असून त्यासाठी 1690 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केल्याचे दिसते आहे. बायोमेट्रिक प्रणालीमुळे सर्व शाळांमध्ये पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे. परंतु, यासाठी विजेचा अखंड पुरवठा असण्याची देखील आवश्यकता आहे आणि राज्यातील बहुतांश शाळांना विजेसाठी मागील 10 वर्षात कोणतेही अनुदान मिळाले नसल्यामुळे विद्युत जोडण्या बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे या शाळांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करणे, या पूर्वीची विजेची थकबाकी माफ करणे, बायोमेट्रिक मशिन्स सर्व शाळांना उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. शासनाने सर्व शाळांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करावा, अशा प्रकारची अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, एक छोटा परंतु, भविष्यात उग्र रुप धारण करु पाहणाऱ्या विनाअनुदानित शाळांच्या मुद्याकडे मी आपल्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. या शाळांसाठी या अर्थसंकल्पात सरकारने काहीही तरतूद केलेली नाही, हे बरोबर नाही. दिनाक 24 नोव्हेंबर, 2001 रोजी विनाअनुदानित शाळांचे धोरण सरकारने स्वीकारले आणि आज राज्यात साधारणपणे 5500 युनिटस् कार्यरत आहेत. यामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांचा समावेश आहे. या शाळांमध्ये सुमारे 10 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि पोषण आहार राज्य शासनाकडून पुरविला जात नाही. राज्यातील अनुदानित शाळातील 95 टक्के विद्यार्थ्यांना राज्य सरकार मोफत पाठ्यपुस्तके व पोषण आहार पुरवीत आहे. अशा प्रकारे राज्यातील 10 लाख विद्यार्थी सुमारे 12 वर्षांपासून शासनाकडून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दत्तात्रय सावंत.....

दुर्लक्षिले गेले आहेत. आजही ते या सुविधांपासून वंचित आहेत. या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांची पूर्णपणे वाताहत करण्याची भूमिका ठेवून या शाळांना अनुदानावर आणण्यासाठी गेल्या 6 वर्षांपूर्वी मूल्यांकनाची प्रक्रिया सुरु केलेली आहे. मागील सरकारने अशा प्रकारची भूमिका घेतली आणि याही सरकारने ती पुढे सुरु ठेवली आहे. आज मी या ठिकाणी विनाअनुदानित शाळांमधील सर्व घटकांच्या असंतोषाचा प्रतीक म्हणून या सभागृहात उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यातील विनाअनुदानित शाळा आणि त्यामध्ये राबणारे शिक्षक यांची आजची स्थिती अतिशय भयानक आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण त्या मानाने कमी आहे. मात्र शिक्षकांच्या आत्महत्यांच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्र देखील सुटू शकलेला नाही. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात शिक्षकांच्या आत्महत्या झाल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यात 7 शिक्षकांनी आत्महत्या केली आहे. मला या निमित्ताने शासनाला अशी आग्रहपूर्वक विनंती करावयाची आहे की, या शिक्षकांसाठी शासनाने या अधिवेशनात काही तरी आर्थिक तरतूद करावी.

सभापती महोदय, शासनाने राज्यातील 5500 विनाअनुदानित शाळांना अनुदानावर आणण्याची भूमिका घेतली पाहिजे. या शाळांच्या तपासण्या थांबविण्याचा आदेश 17 तारखेला निघाला आहे. त्यामुळे तपासण्या झालेल्या आणि अपात्र घोषित केलेल्या शाळांचा विचारही या शासनाने करणे गरजेचे आहे. या सर्व शाळांचे स्थांतर अनुदानित शाळांमध्ये केले पाहिजे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या नावाने आपण हे राज्य चालवितो. हे राज्य पुरोगामी आहे, असे आपण म्हणतो. त्या भूमिकेतून या सर्व शाळांचा, शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांचा विचार राज्य शासनाने करावा, अशी आग्रहाची मागणी मी करीत आहे.

सभापती महोदय, जिजाऊ सायकल योजना दारिद्र्य रेषेखालील मुलींसाठी सुरु करण्यात आली होती. परंतु, या योजनेसाठी चांगला प्रतिसाद नसल्यामुळे या अर्थसंकल्पात ही योजना बंद करण्याचे घोषित करण्यात आले आहे. या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी शासनाला ब्रिफिंग केले असेल किंवा माहिती पुरविली असेल त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दत्तात्रय सावंत.....

भागातील, डोंगराळ भागातील मुलींना दोन-चार किलो मीटर प्रवास करून शाळांमध्ये जावे लागते. त्यांच्यासाठी ही योजना अतिशय चांगली आहे. परंतु, प्रतिसाद मिळत नाही, असे कारण दाखवून ज्या अधिकाऱ्यांनी ही योजना सरकारला बंद करण्यास भाग पाडले आहे, त्यांची चौकशी करावी, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि थांबतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कालपरवा पासून आम्ही या चर्चेत भाग घेण्याची वाट बघत होतो. उशिरा का होईना आपण मला संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. अर्थसंकल्पावरील चर्चेत प्रत्येक सन्माननीय सदस्याला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या चर्चेत जशी अर्थसंकल्पाचा पुरस्कार करणारी भाषणे आम्ही ऐकली तशीच तिरस्कार करणारी भाषणे देखील आम्ही ऐकली आहेत. आम्ही राजकारणातील मंडळी असल्यामुळे आपापली बाजू लढवीत असताना राजकारणाबाहेरील व्यक्तींच्या अर्थसंकल्पाबाबत काय प्रतिक्रिया आहेत, याकडे मी आपल्या माध्यमातून या सरकारचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, श्री.चंद्रहास देशपांडे हे एक अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, "अर्थसंकल्पाच्या निमित्ताने सरकारने आपले लक्ष्य निर्धारित केले असते तर फार बरे झाले असते. परंतु, तसे झाल्याचे दिसून येत नाही. राज्याचा 70 टक्के महसूल विक्रीकर, मुद्रांक शुल्क, राज्य उत्पादन शुल्क या माध्यमातून जमा होत असतो. त्यामुळे उत्पादन क्षेत्राची वाढ झाली पाहिजे, याची काळजी या अर्थसंकल्पात घ्यावयास हवी होती, पण ती तशी घेतल्याचे दिसत नाही." या अर्थसंकल्पामधून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, राज्याच्या उत्पन्नातील 60 टक्के रक्कम वेतन, निवृत्ती वेतन आणि आस्थापना यावर खर्च होत असते आणि एक रुपया उत्पन्नातील फक्त 11 पैसे विकासावर खर्च केले जातात. मग आपण कोणत्या विकासाच्या गोष्टी करीत आहोत ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सभागृहात वाचून भाषण करण्याची पध्दत नाही. सन्माननीय सदस्य लिखित भाषण वाचून दाखवीत आहेत.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य संदर्भासाठी कागदपत्रे पहात आहेत. कृपया, त्यांच्या भाषणात अडथळा आणू नये.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, माजी केंद्रीय अर्थ मंत्री श्री.पी.चिदंबरम यांचा कालच लोकसत्तेमध्ये एक लेख प्रसिध्द झाला आहे. त्यांनी या लेखाच्या माध्यमातून मोठी शंका उपस्थित केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "केंद्र सरकारने सामाजिक न्यायासाठी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड.....

असलेल्या निधीमध्ये 75 हजार कोटी रुपयांचा कट लावला आहे." हा निधी राज्याकडे येत असतो. परंतु, अशा प्रकारे जर कट लावला असेल तर तो निघी राज्याकडे येणार नाही आणि राज्याच्या सामाजिक विकासाच्या किंवा सामाजिक न्यायाच्या योजना कशा राबविल्या जातील, अशा प्रकारची शंका मी या ठिकाणी व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यापासून एल.बी.टी. रद्द करण्याबाबतची घोषणा राज्य शासनाने या अर्थसंकल्पात केली आहे. ऑगस्ट पासून रद्द करण्याची घोषणा का करण्यात आली आहे, सरकारचा या संदर्भातील निर्णय पक्का झालेला नाही का, मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत नेमकी कोणती भूमिका या सरकारने घेतली आहे, मुंबईतील जकात कर रद्द होणार आहे का, असे अनेक प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण झाले आहेत. मुंबईतील जकात रद्द करण्याला शिवसेना समर्थन देईल, असे आम्हाला वाटत नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

एलबीटीबाबत काय निर्णय होणार आहे, याबाबत आमच्या मनात मोठी शंका निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहेत, परंतु बजेटमध्ये सरकार गंभीर असल्याचे दिसून येत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय गांभीर्याने घ्यावा असे सरकारला मुळीच वाटत नाही. जलयुक्त शिवार योजना अशा गोंडस नावाने योजना सुरु करण्यात आली असून त्यासाठी 1000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील अशी अपेक्षा आम्ही बाळगतो. शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यातील मालगुजारी तलावांचे नूतनीकरण करण्यासाठी 100 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी कल्पना या सरकारने केलेली आहे, या कल्पनेशी आम्ही सहमत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय अतिशय गंभीर आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन या विषयाचा विचार करण्याची गरज आहे, महाराष्ट्रात असे होताना दिसत नाही. आघाडी सरकारच्या काळात किती आत्महत्या झाल्या व या सरकारच्या काळात किती आत्महत्या झाल्या अशी चर्चा करण्यात येते, ही बाब महाराष्ट्र राज्याला भूषणावह नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांचे अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले. त्यामुळे मी अशी सूचना करतो की, शेडनेटच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळता येऊ शकते, यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्याची गरज होती, त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली नाही. या सरकारला धन्यवाद देताना काही गोष्टींचा उल्लेख करावा लागेल. अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महारांचे स्मारक करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. लंडन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान आहे. ते निवासस्थान विकत घेण्याचे सरकारने सूचित केले आहे. या गोष्टींचा निश्चित फायदा होणार नाही. यासाठी 35 कोटी रुपये लागणार आहेत. लंडन येथील घर विकत घेण्यासाठी तरतूद करण्यात आली नाही. त्यामुळे याबाबत असा प्रश्न उपस्थित होतो की, हे 35 कोटी रुपये अनुसूचित जातीसाठी करण्यात आलेल्या तरतुदीमूधन वळविण्यात येणार आहेत काय ? 35 कोटी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रुपयांची तरतूद बजेटमध्ये करणे आवश्यक होते. नागपूर येथेही स्मारक बांधण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आघाडी सरकारने माणगांव येथे 10 कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात माणगांव येथे स्मारक झाले नाही. छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारके होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करायला पाहिजे.

महोदय, वडाळा येथील वसतिगृहात 350 विद्यार्थी राहत होते. सदर वसतिगृह पाडण्यात आल्यामुळे विद्यार्थी रस्त्यावर आले आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी संक्रमण शिबिर उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्याचा अर्थसंकल्प अत्यंत निराशाजनक आहे. या बजेटमधून राज्यातील जनतेच्या व शेतकऱ्यांच्या अनेक अपेक्षा होत्या. राज्यात व केंद्राच्या सत्तेत मोठा बदला झालेला आहे. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील लोकांच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत. हा अर्थसंकल्प अत्यंत निराशाजनक आहे. लोकांना असे वाटले होते की, देशात नरेंद्र व राज्यात देवेंद्र आल्यामुळे खूप मोठा बदल होईल. परंतु खऱ्या अर्थाने राज्यात सगळीकडे आनंदी आनंद आहे. प्रत्येक क्षेत्राकडे या सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. शेतकऱ्यांना निराश करणारा अर्थसंकल्प सादर झाला आहे. गरीब व सामाजिक न्यायाकडे दुर्लक्ष करणारा अर्थसंकल्प आहे. मूठभर धनिकांचे भले करणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पाला आम्ही समर्थन देऊ शकत नाही. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यात काही चुकीचे प्रघात सुरु करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ निधी गोळा करण्यासाठी एफएसआय वाढविणे, प्रिमियमच्या माध्यमातून निधी गोळा करण्यात येणार आहे. तसेच जागेच्या वापरात बदल करणे या बाबी अत्यंत धोकादायक आहे. पुढील काळात जेव्हा जेव्हा राज्य अडचणीत येईल तेव्हा अशा पध्दतीने एफएसआयचा प्रिमियम वाढवून निधी गोळा करण्याचे काम सुरु केले जाईल.

सभापती महोदय, दुसरी बाब सावकाराचे कर्ज या सरकारने माफ केले आहे. अशा प्रकारे चुकीची पध्दत राज्यात पडत आहे. सावकारी बंद झाली पाहिजे तसे न होता सरकार थेट सावकाराला पैसे देत आहे, त्यामुळे राज्यात व देशात सावकारी पुन्हा फोफावल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे शेतकरी नागविला जाणार आहे. थोड्या पैशांसाठी सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी मागील काळात घेतल्या होत्या. त्या सावकारांच्या विरोधात मागील काळात राज्यात मोठे बंड उभे राहिले होते. या राज्यात सावकारी पुन्हा आणण्याचा प्रघात सुरु होत आहे असे आम्हाला वाटते. या बाबीचा आम्ही निषेध करतो.

सभापती महोदय, आपण शिक्षकांचे प्रतिनिधित्व करीत आहात, मला खात्री आहे की, या अर्थसंकल्पावर आपण देखील समाधानी असू शकत नाही. शिक्षकांचे किंवा पदवीधरांचे प्रतिनिधित्व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)

डॉ.सुधीर तांबे...

करणारा कोणताही सन्माननीय सदस्य या अर्थसंकल्पाबाबत समाधानी असू शकत नाही. राज्यातील ग्रामीण भागातील शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. माननीय शिक्षणमंत्री मघाशी उपस्थित होते, त्यांच्या समोर मला हा विषय मांडायचा होता. आज राज्यात शिक्षणाची काय अवस्था आहे, राज्यात प्रशासनाच्या माध्यमातून शिक्षणाची फार वाईट अवस्था झालेली आहे. जळगांव जिल्ह्यातील शिक्षण विभागात 500 जागा रिक्त आहेत. अहमदनगर जिल्ह्यात 700 जागा रिक्त आहेत. अशा प्रकारे राज्यात हजारो जागा रिक्त आहेत. या जागा भरण्यात येत नाहीत. त्या भरण्यासाठी परवानगी दिली जात नाही. ज्युनिअर कॉलेजमधील अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण कशा प्रकारे देता येईल. ग्रामीण भागातील शिक्षणाचा या सरकारने खेळ मांडलेला आहे, असा माझा स्पष्ट आरोप आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दत्तात्रय सावंत आता बोलले आहेत. काल सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत देशपांडे यांनी शिक्षणाचा विषय अतिशय तळमळीने मांडला आहे. प्रत्येक सदस्य तळमळीने विषय मांडत आहेत. आम्ही सत्ताधारी बाकावर असताना देखील हे विषय तितक्याच तळमळीने शासनाच्या विरोधात मांडत होतो. शासनाच्या विरोधात आम्ही वेळोवेळी आंदोलने केली आहेत. सन 2009 मध्ये माध्यमिक शाळेतील कायम शब्द काढून टाकण्यात आला आहे. सन 2015 हे वर्षे आले तरी ग्रामीण भागातील चार हजार शाळा कायम विनाअनुदानित तत्वावर होत्या. याबाबत अतिशय जाचक अटी लावण्यात आल्या आहेत, त्यातील 2000 शाळा कशा तरी टिकल्या होत्या. आणखी जाचक अटी लावून 100 ते 150 शाळा फक्त अनुदानास पात्र ठरविण्यात आल्या आहेत. या शाळांना देखील शासन अनुदान देत नाही. शिक्षण हक्क कायदा लागू केला आहे. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी शासन करणार नसेल तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. आमचे विचार अर्थ मंत्री महोदयांपर्यंत कळविण्यात यावेत. अशी मी सभापती महोदयांना विनंती करतो. विनाअनुदानित शाळांवर काही शिक्षक 15 वर्षे काम करीत आहेत, त्यांना आधुनिक राज्यात वेठबिगार म्हणून राबवून घेण्यात येत आहे. हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे, माझी अशी विनंती आहे की, कायम विनाअनुदानित शाळांना तातडीने अनुदान सुरु केले पाहिजे. त्याचप्रमाणे ज्युनिअर शाळांना देखील तातडीने अनुदान सुरु केले पाहिजे. शासनाने 6000 तुकड्यांना मान्यता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) G-5

VVK/ MMP/ KTG/ AKN/ AKN/ प्रथम श्री.रोझेकर... 11:00

डॉ.सुधीर तांबे....

दिली आहे. 10 ते 15 वर्षापासून शिक्षक कोणतेही वेतन न घेता या तुकड्यांवर काम करीत आहेत. विना अनुदान तुकड्यांवर काम करणाऱ्या शिक्षकांना मान्यता दिली आहे, त्या तुकड्या अनुदानास पात्र आहेत तर त्यासाठी तरतूद का करण्यात येत नाही ? मागच्या अधिवेशनात यासाठी तरतूद करण्यात आली नाही. या अधिवेशनात देखील तरतूद करण्यात आली नाही. रेटून न्यावा अशा पध्दतीचा हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. शिक्षक एकाच ठिकाणी चार ते पाच वर्षे काम करतात. परवा बीड मधील एका शिक्षकाने आत्महत्या केली आहे. हा प्रकार राज्याला लांच्छनास्पद आहे. एकीकडे आपण असे म्हणतो की, 'गुरु साक्षात परब्रम्ह', असे असताना शिक्षकांच्या न्याय्य मागण्या वारंवार मांडून देखील सरकार दुर्लक्ष करीत असेल तर या बाबीचे कोणीही समर्थन करु शकत नाही. शिक्षकांच्या आर्थिक मागण्या पूर्ण करण्यासाठी मंत्री महोदयांनी वाढीव तरतूद करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे.....

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, यासाठी प्रशासन खूप जबाबदार आहे. प्रशासनाकडून मंत्री महोदयांना योग्य ती माहिती दिली जात नाही. मग ते सचिव असतील किंवा आयुक्त असतील. मी परवा विभागीय आयुक्तांना आपण ज्युनिअर कॉलेजच्या पदांना मान्यता का देत नाही, या संदर्भातील माहिती घेण्यासाठी फोन केला होता. विभागीय आयुक्त त्या समितीचे प्रमुख आहेत. परंतु, जी व्यक्ती विभागीय आयुक्त आहे त्यांना ज्युनिअर कॉलेजच्या पदांना मान्यता देण्यासाठी समिती आहे याची देखील माहिती नाही. ही खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. शासनाने स्मारकांसाठी निधीची तरतूद केलेली आहे. स्मारके होणार आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. स्मारके झाली पाहिजेत. परंतु विचारांचे काय ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांची स्मारके होणार आहेत. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे, असे आपण म्हणतो. परंतु, देशात, राज्यात सामाजिक समतेचा विचार कोठे तरी गाडून टाकण्याचा अत्यंत पद्धतशीरपणे प्रयत्न सुरु आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारताना त्यांच्या विचारांना मात्र मूठमाती द्यावयाची, असे शासनाचे धोरण सुरु आहे. शासनाने याकडे लक्ष दिले पाहिजे की, ज्या ज्या वेळी या देशाने व्यापक विचार घेतला, ज्या ज्या वेळी मानवतेचा विचार घेतला, त्या त्या वेळी या देशाने जगात प्रगती केलेली आहे. परंतु ज्या ज्यावेळी आम्ही संकुचित विचार घेतले त्या त्यावेळी अधोगती झालेली आहे. म्हणून स्मारके उभारताना विचारांची देखील स्मारके उभारली पाहिजेत, अशी भावना व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आपण मला अर्थसंकल्पावर बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी शिक्षण विषयावर अतिशय तळमळीने आपले विचार मांडलेले आहेत. खरे तर मी वेगळा विषय मांडून माझ्या भाषणाची सुरुवात करणार होतो. मी सांगू इच्छितो की, आम्ही बजेटच्या 6 टक्के निधी शिक्षणावर खर्च करु आणि तशी घटनेत तरतूद आहे. परंतु, या तरतुदीकडे आपण कधीही पाहत नाही. आपण शिक्षणावर पैसा खर्च करतो, म्हणजे आपण तो पैसा येणारी पिढी घडविण्यासाठी खर्च करतो, याचा विचार कोठे तरी झाला पाहिजे. आम्ही शिक्षकांना पगार देतो किंवा शाळेला अनुदान देतो. म्हणजे आम्ही जगावेगळे काम करतो असे समजण्याचे काही कारण नाही. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, आपण शिक्षणासाठी जो पैसा देतो तो आपण विद्यार्थ्याला अनुदान म्हणून देतो. आपण राज्यात मोफत शिक्षणाची व्यवस्था स्वीकारलेली असल्यामुळे विद्यार्थ्यांकडून फी घेत नाही. म्हणून आपण हे अनुदान देतो आणि ते न दिल्यामुळे आपण विद्यार्थ्यांचेच नुकसान करीत आहोत. आज शिक्षक सरप्लस होत आहेत. ते तेथेच राहणार किंवा कसे अशी टांगती तलवार त्या शिक्षकांच्या डोक्यावर आहे. त्यामुळे तो शिक्षक शिकविण्यावर लक्ष केंद्रित करु शकत नाही किंवा इतर गोष्टींवर लक्ष केंद्रित करु शकत नाही. आम्ही विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देणार, विद्यार्थी केंद्रबिंदू मानून काम करणार, ही जी आपली संकल्पना आहे या संकल्पनेपासून आपण कोठे तरी दूर जात आहोत. आम्ही शाळांना वेतनेतर अनुदान कशासाठी देतो ? विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, यासाठी शाळांना वेतनेतर अनुदान दिले जाते. काल टी.व्ही. चॅनलवाल्यांनी काही जिल्हा परिषदेच्या शाळांना व खाजगी शाळांना भेट दिली. त्या शाळांची परिस्थिती टी.व्ही. चॅनलवर दाखविण्यात येत होती. त्या ठिकाणी लॅबची काय परिस्थिती आहे किंवा इतर सुविधा काय आहेत, हे सर्व टी.व्ही. चॅनलवर दाखविण्यात येत होते. परंतु, हे का घडत आहे, याचा देखील आपण विचार केला पाहिजे. त्या शाळेतील लॅब खराब आहे म्हणून त्या शाळेच्या मुख्याध्यापकाला किंवा शिक्षकाला नोटीस द्यावी, हे आमचे काम नाही. आम्ही शाळा कशासाठी चालवितो ? आम्ही विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून शाळा चालवित आहोत, विद्यार्थ्यांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अपूर्व हिरे.....

शिक्षण देण्यासाठी शाळा चालवित आहोत. म्हणून विद्यार्थ्यांचा विचार करुन आपल्याला ती लॅब कशी सुधारता येईल, तेथे चांगल्या दर्जाचे प्रयोग कसे होतील, चांगल्या दर्जाचे विद्यार्थी कसे घडतील, तेथे चांगले संशोधन कसे घडू शकेल, याबाबत विचार करणे हे आमचे काम आहे आणि त्यासाठीच आपण येथे बसलेलो आहोत. हा जो घोळ सुरु आहे तो तातडीने थांबवून चांगली खात्रीशीर शिक्षणाची योजना आणण्याची आवश्यकता आहे, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, शासनाने अत्यंत कमी दिवसात हे बजेट सादर केलेले आहे. हे बजेट सादर करण्यासाठी शासनाला फक्त 138 दिवसांचा कालावधी मिळालेला आहे. शासनाने अत्यंत कमी कालावधीत चांगले बजेट मांडलेले आहे. या बजेटमध्ये शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आहेत. मी सांगू इच्छितो की, आज शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. प्रत्येक महिन्याला गारपीट होते, अवकाळी पाऊस पडतो. वातावरण कसे असणार आहे, परिस्थिती काय असणार आहे हे शेतकऱ्यांच्या हातामध्ये नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना नेमके काय करावे, हेच कळत नाही. अशा प्रकारे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना बँकेपेक्षा जास्त त्रास जर कोणता होत असेल तर तो सावकारांचा आहे. बँकेची वसुली, व्याज कायद्यानुसार सुरु आहे. परंतु, सावकार कायद्यानुसार व्याजाची आकारणी करतात काय ? सावकारांची वसुली कशा प्रकारची असते याची आपल्याला कल्पना आहे.शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो अतिशय महत्वाचा निर्णय आहे. परंतु, त्याच बरोबर आम्हाला पीक कर्जासाठी देखील व्याज माफी देता येईल काय, याचा देखील विचार या निमित्ताने झाला पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने नेटशेड योजना जाहीर केलेली आहे. शासनाने नेटशेडची योजना जाहीर केल्याबद्दल मी नाशिक जिल्ह्यातील जनतेच्या वतीने शासनाचे आभार मानतो. द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांनी नेटशेड लावली तर द्राक्षाचा एकही दाणा खराब होत नाही. मागील वर्षी ज्यावेळी मुख्यमंत्री महोदय नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते त्यावेळी देखील आम्ही अनुभवले की, ज्या ठिकाणी नेटशेड लावलेली आहे तेथे द्राक्षाचा एक दाणा किंवा पान देखील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अपूर्व हिरे.....

खराब झालेले नव्हते. परंतु, ज्या ठिकाणी नेटशेड लावलेली नव्हती तेथे झाडाला द्राक्षच काय तर पाने देखील शिल्लक राहिलेली नव्हती. अवकाळी पाऊस, गारपीट झाल्यामुळे द्राक्ष बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. परंतु, ही नेटशेड भारतात तयार होत नाही. ती आयात करावी लागते आणि या आयातीवर जी इम्पोर्ट ड्युटी आहे ती खूप जास्त आहे. आम्हाला यासाठी एकरी तीन लाख रुपये टॅक्स भरावा लागतो. शासनाने हा टॅक्स माफ करावा, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, प्रत्येक महिन्याला शेतकऱ्यांवर नैसर्गिक आपत्ती येते. आपली जी पीक विमा योजना आहे ती कोठे तरी चुकीची आहे. शेतकरी पीक विमा काढतो. परंतु शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत नाही. विमा योजनेच्या अटी व शर्ती अशा असतात की, नैसर्गिक आपत्ती आली किंवा अवकाळी पाऊस पडला तर शेतकऱ्यांना विमा योजनेचा लाभ होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी नव्याने काही योजना आणल्या तर कोठे तरी शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल. आज शेतकरी अडचणीत आहेत, त्यांना मदत केली पाहिजे. परंतु, आपण जर शेतकऱ्यांसाठी काही चांगल्या योजना आणल्या तर प्रत्येक महिन्याला शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पैसे कोठून आणावयाचे असा जो प्रश्न आपल्या समोर निर्माण होतो तो निर्माण होणार नाही.

सभापती महोदय, सिंचनाच्या बाबतीत उत्तर महाराष्ट्राची परिस्थिती अतिशय वाईट आहे. उत्तर महाराष्ट्रातील कोणत्याही नदीला पाहिजे त्या प्रमाणात पाणी नाही. आज गोदावरी नदीतून नाशिक, औरंगाबाद अशा मोठ्या शहरांना पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे आमच्याकडे शेतीसाठी पाणी शिल्लक राहिलेले नाही. म्हणून नारपार सारखी योजना आणून आम्ही पश्चिम वाहिनी नद्यांमधील पाणी या नद्यांमध्ये टाकू शकलो, खोऱ्यांमधील पाणी वाढवू शकलो तर आमचा पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

सभापती महोदय, या बजेटमध्ये ग्रामीण भागाच्या दृष्टीने अनेक योजना आहेत. ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी शासनाने जी योजना आणलेली आहे ती खूप महत्वाची आहे. आज ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. वाढते शहरीकरण ही राज्यातील सर्वात मोठी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अपूर्व हिरे.....

समस्या आहे आणि हे वाढते शहरीकरण जर थांबवायचे असेल तर खऱ्या अर्थाने ग्रामीण भागामध्ये चांगले रस्ते, पिण्याचे स्वच्छ पाणी, चोवीस तास वीज पुरवठा, दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळा, चांगले दवाखाने इत्यादी सुविधा आपण उपलब्ध करून देऊ शकलो तर खऱ्या अर्थाने या योजनेचा फायदा होणार आहे.

सभापती महोदय, मी उद्योगांच्या संदर्भात बोलणार आहे. "मेक इन महाराष्ट्र" सारखी योजना शासनाने आणलेली आहे. मी यासाठी शासनाला धन्यवाद देतो. कारण, राज्यातील उद्योगांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. मी नाशिक जिल्ह्याचे उदाहरण देऊ इच्छितो. मागील 15 वर्षात नाशिक जिल्ह्यात एकही नवीन कारखाना, उद्योग सुरु झालेला नाही. उलट आज अशी परिस्थिती आहे की, महिंद्र ॲण्ड महिंद्र सारखा मोठा उद्योग तेथील कर्मचाऱ्यांना नोटीसा देत आहे. आमच्या कारखान्यासाठी नाशिक येथील वातावरण पोषक नाही, आमचा कारखाना येथे चालू शकत नाही. म्हणून आम्ही हा प्रकल्प चेन्नई येथे स्थलांतरित करीत आहोत. त्या कारखान्यात काम करणारे 3 हजार कर्मचारी चेन्नई येथील कारखान्यात आले तर आम्ही त्यांना नोकरीवर ठेवणार, अन्यथा त्यांची नोकरी जाईल, अशी भूमिका जर महिंद्र ॲण्ड महिंद्र सारखी कंपनी घेत असेल तर ते योग्य होणार नाही.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी व अर्थसंकल्पाला विरोध दर्शविण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, यापूर्वी आमच्या पक्षाच्या अनेक माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पाला जो विरोध दर्शविला आहे त्याला माझी सहमती आहे. हा अर्थसंकल्प 13 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक तुटीचा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, 18 ते 19 योजनांसाठी निधी चिन्हांकित केला आहे असे नमूद केले आहे. तो निधी किती आहे याचा उलगडा होत नाही. अर्थसंकल्पातील तूट 20 ते 21 हजार कोटी रुपयांवर जाईल असा माझा अंदाज आहे. अर्थसंकल्पातील तुटीमुळे जे प्रश्न भेडसावतात त्याचे आपल्याला दर्शन झाले आहे. गृह, शिक्षण, ऊर्जा, अन्न व नागरी पुरवठा, आरोग्य या विभागांमध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत, पायाभूत सुविधांची वानवा आहे. त्यामुळे समाजामध्ये कायदा व सुव्यस्थेचे प्रश्न निर्माण होत आहेत.

सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी ठाणे जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरीच्या घटना घडल्या. मी या संदर्भात आवाज उठविल्यानंतर पोलीस विभागाकडून अशी माहिती दिली गेली की, गुन्हे शोधण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये महिलांच्या पर्सवरील विक्री कर 12.5 टक्क्यावरुन 5 टक्के करण्याचे प्रस्तावित केले. दिवसाढवळया महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोनसाखळी खेचण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. त्यांना संरक्षण दिले पाहिजे. त्यासाठी पर्सवर अधिक कर लावला तरी चालेल. आरोग्याच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता आघाडी सरकारने 850 कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु युती सरकारने या योजनेसाठी फक्त 300 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. वास्तविक या योजनेची व्याप्ती लक्षात घेता 3000 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक होते. आघाडी सरकारच्या काळात दारिद्र्य रेषेखालील लोकांना हृदयविकार, किडनी ट्रान्सप्लान्ट वगैरे सारख्या दुर्धर आजारावरील उपचारासाठी या योजनेचा मोठया प्रमाणात लाभ देण्यात आला. परंतु या वर्षी फक्त 300 कोटी रुपयांची तरतूद केली असल्यामुळे उपचाराच्या दृष्टीने गरीब जनतेची हेळसांड होणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे.....

आहे. शेतकरी आत्महत्या करतात त्याची सरकारी दरबारी नोंद होत असल्यामुळे आपल्याला आकडेवारी कळून येते. परंतु गरीब रुग्ण उपचाराअभावी मरतात त्याची कुठेही नोंद होत नाही. महाराष्ट्रातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी दवाखाने या ठिकाणी डॉक्टर, नर्स, तंत्रज्ञांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत. पदे भरली असतील तर उपकरणे उपलब्ध नसतात. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये सर्वसामान्य माणसांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळत नाही. आज औषधोपचाराचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य गरीब माणसे सरकारी आरोग्य सुविधांकडे आशेचा किरण म्हणून पहात आहेत.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्री व माननीय आरोग्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली होती की, डायलिसीसचा खर्च 10 ते 12 हजार रुपये इतका येतो. ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे व जिल्हा रुग्णालयामध्ये डायलिसीसची सुविधा मोफत दिली जावी. युती सरकारला राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या नावाबद्दल आक्षेप असेल तर योजनेचे नाव बदलण्यात यावे, परंतु या योजनेसाठी यावर्षी किमान 3000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, जेणेकरुन सर्वसामान्य माणसांना या योजनेचा लाभ होऊ शकेल.

सभापती महोदय, राज्य सरकारला मोठया प्रमाणात वॅट, विक्री कर, मुद्रांक शुल्क या माध्यमातून उत्पन्न मिळते. सरकारने आपले उत्पन्न वाढावे याकरिता चटई क्षेत्रात वाढ करण्याचा व त्यावरील अधिमूल्याचे दर वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सुमारे 693 कोटी रुपये इतकी उत्पन्नामध्ये भर पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. आज शहरीकरणाचे प्रमाण 42 टक्क्यावर जाऊन पोहोचले आहे. नागरीकरण मोठया प्रमाणात वाढत असून शहरामधील लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्राथमिक सोयी सुविधा पुरविण्यावर मर्यादा येत आहेत. ठाणे शहराची लोकसंख्या 36 टक्क्यांनी वाढली असून मुंबई उपनगराची लोकसंख्या 7.6 टक्क्यानी कमी झाली आहे. त्यामुळे ठाणे जिल्हयावर मोठया प्रमाणात ताण येत आहे. पाणी, आरोग्य, रस्ते या प्राथमिक सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाहीत. माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे की महाराष्ट्रात ज्या महानगरपालिका आहेत त्यांना शासनाने अनुदान दिले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) I.3

SGB/ AKN/ KTG/ 11:20

श्री.जगन्नाथ शिंदे.....

सभापती महोदय, शासनाने स्थानिक संस्था कर 1 ऑगस्ट पासून रद्द करण्याचे घोषित केले आहे. हा कर रद्द केल्यास मुंबई व्यतिरिक्त इतर महापालिकांना नुकसान भरपाई म्हणून रु 6875 कोटी इतकी रक्कम द्यावी लागणार आहे. त्याकरिता 2 टक्के कर वाढविण्यात आला तरी ग्रामीण भागातील 3 ते 3.5 कोटी लोकांवर आर्थिक भार पडणार आहे. त्याचा परिणाम म्हणून महागाई वाढणार आहे.

सभापती महोदय, उत्पन्नाची साधने निर्माण करण्यासाठी "मेक इन इंडिया" या योजनेचा वापर केला पाहिजे. ऊर्जा, पाणी, आरोग्य या मूलभूत विषयाबाबत अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केलेली नाही. एमआयडीसी क्षेत्रासाठी 26 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. युती सरकारचा पहिला अर्थसंकल्प म्हणजे शासन पुढील पाच वर्षात काय करणार आहे याचे दिग्दर्शन आहे. शासन जर पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करुन देणार नसेल तर अपेक्षित रिझल्ट मिळणार नाही. चले थे राह पर, पर मंजिल भटक गए. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात थोर पुरुषांची स्मारके उभारण्याबद्दल सूतोवाच केले आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक उभारण्याचे काम अर्धवट स्थितीत असूनही त्याकरिता अर्थसंकल्पात काहीही तरतूद केलेली नाही याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. धनगर समाजाला आरक्षण दिलेले नाही. जर्मन विद्यापीठामध्ये अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने अध्यासन सुरु करण्यात आले आहे. तरी देखील शासन त्यांच्या स्मारकासाठी आर्थिक तरतूद करायला तयार नाही. सोलापूर विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव आणि पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याचा ठराव सभागृहाने मंजूर केला आहे. पुणे विद्यापीठाचे नामकरण झाले, परंतु सोलापूर विद्यापीठाचे नामकरण जाणीवपूर्वक केलेले नाही असे माझे मत आहे. सोलापूर विद्यापीठाला तातडीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने 1995 साली अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने पुरस्कार देण्यास सुरुवात केली होती. ती योजना खंडित झाली. आता पुन्हा ही योजना सुरु करावी अशी मी विनंती करतो. पूर्वी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी केली जात होती. ती बंद का करण्यात आली? जयंती आणि पुण्यतिथीच्या कार्यक्रमामध्ये त्यांचे नाव अंतर्भूत करण्यात यावे.

सभापती महोदय, खासदारांना स्थानिक विकास निधी 5 कोटी रुपये असून आमदारांसाठी स्थानिक विकास निधी फक्त 2 कोटी रुपये दिला जातो. आमदारांना सुध्दा दरवर्षी 5 कोटी रुपये स्थानिक विकास निधी निधी मंजूर करण्यात यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सामूहिक औद्योगिक विकास योजनेसाठी 25 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्यातील सर्व महामंडळांचा निधी वाढविण्यात आला असून शेळी मेंढी विकास महामंडळासाठी एक रुपयाची सुध्दा तरतूद केलेली नाही. या महामंडळाला भरभक्कम निधी उपलब्ध करुन द्यावा. भटक्या व विमुक्त समाजासाठी काहीही तरतूद केलेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती (श्री.गोपीकिसन बाजोरिया) : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ 15 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

नंतर जे.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर : सभापती महोदय, ऑगस्ट मध्ये एलबीटी रद्द करण्याचे गाजर आपण लोकांना दाखविलेले आहे. एलबीटी हा शहरातील लोकांवरचा टॅक्स आहे. व्हॅटचा भार हा ग्रामीण भागावर पडणार आहे. पूर्वीच्या सरकारला हे करणे सहज शक्य होते. पण त्यांनी हे केले नाही. कारण व्हॅट आकारणी केली तर तो ग्रामीण भागाला देखील लागू झाला असता. तसे होता कामा नये. आपण व्हॅटवरील कर वाढविणार आहात असे सरळ सरळ म्हणत आहात ते चुकीचे आहे. तसे आपल्याला करता येणार नाही.

सावकारांकडे किती कर्ज होते हे आपण पाहिले आहे. सावकारांना कर्ज देण्याची आवश्यकता नाही असा स्पष्ट आदेश श्रीमती इंदिरा गांधी यांनी काढला होता. आता सावकारांचे कर्ज सरकार फेडणार आहे. अशाने सावकारीला प्रोत्साहन मिळेल असे माझे मत आहे.

कुशल कामगार तयार केल्या शिवाय इंडस्ट्री वाढत नाही. आपण कॉर्पोरेट क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न करणार आहात. त्यासाठी कुशल कामगार कुठून आणणार आहात ? आज राज्यातील सर्व आयटीआय कॉलेजेस बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. सरकारने खूपच जाचक अटी टाकल्यामुळे खाजगी आयटीआय आज कोणीही चालवू शकत नाही. आज आपण खाजगी आयटीआय कॉलेजेसना कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नाही. आयटीआयला उत्तेजन देण्यात येईल असे मोठ्या प्रमाणावर सांगायचे आणि काहीही करायचे नाही असे या सरकारचे धोरण दिसते आहे. यासाठी देखील आपण काही तरी आर्थिक तरतूद केली पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय,ज्यांना दहा वर्षापूर्वी सातवी पर्यंत आश्रमशाळा दिलेली आहे त्यांना आठवीचा वर्ग दिलेलाच नाही म्हणून मी अर्थसंकल्पाला विरोध करतो आणि वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, या राज्याचे बजेट पारित होत असताना त्यावरील अनेक मान्यवरांची भाषणे आम्ही ऐकली. माननीय वित्त मंत्र्यांनी जवळपास दोन लाख कोटी रूपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे. माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. त्यांच्या शेरोशायरीने संपूर्ण सभागृह अवाक झाले होते. या सभागृहात सन्माननीय वित्त राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे. ते काही तरी नवीन घेऊन येतील असे वाटले होते. नवीन घोषणा करतील असे वाटले होते. काही घोषणा झाल्या, पण माणसाला जगण्यासाठी ज्या घोषणा करायला पाहिजे होत्या त्या करण्यात आलेल्या नाहीत. मी कवितेच्या माध्यमातून असे सांगू इच्छितो की,

"समुंदर भी तेरी तरह खुदगर्ज निकला,
समझते थे कि बजट कुछ नया होगा,
लेकिन फुसका बम निकला,
विदर्भ का यहां होगा सम्मान,
लेकिन पिटारा खाली निकला,
मराठवाड़ा-कोकण का किया अपमान,
लगता था कि किसानों का पूरा कर्ज माफ होगा,
लेकिन देखा कि आत्महत्याओं के बगैर कुछ नहीं निकला"

सभापति महोदय, मैंने कल श्री भास्कर जाधव जी का स्टेटमेंट पढ़ा, निश्चित तौर पर कोकण पर अन्याय हुआ है. यहां पर इस समय वित्त मंत्री जी नहीं हैं, इसका हमें बहुत खेद है.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये...

बजेट सादर करीत असताना आपण आपल्या राज्याची इतर राज्यांशी देखील तुलना करीत असतो. बजेट सादर करीत असताना आपण राज्याला कुठल्या क्षितिजावर नेणार आहोत याचा देखील विचार करतो. तसेच आपल्या राज्यातील दरडोई उपन्न कसे वाढेल याचा विचार देखील करीत असतो. यासाठी आपण नवीन योजना देखील आखतो. या सर्व बाबी ज्यात असतात त्यालाच बजेट म्हणतात. त्याला अंदाजपत्रक म्हणतात. अंदाज हा संपूर्ण राज्याचा असतो. राज्यातील कोणताही माणूस होरपळता कामा नये अशा प्रकारचे बजेट आपण सादर करायला पाहिजे होते. आज आपल्या राज्यावर 3 लाख 60 हजार 823 कोटी रूपयांचे कर्ज आहे. आज राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर 32 हजार रूपयांचे कर्ज आहे. आघाडी सरकार गेल्यानंतर युती सरकार आले. त्यावेळी 42 हजार कोटी रूपयांचे कर्ज होते. त्या कर्जावरील व्याजाचा हप्ता देत देत दुसऱ्या योजना आणून आपले राज्य पहिल्या क्रमांकावर नेण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

आपण एरिगेशनसाठी रूपये 7262 कोटींची तरतूद केली आहे. आपण मोठ्या वल्गना करून अल्प अशी तरतूद केली आहे. राज्यातील 80 टक्के जनता खेड्यात राहते. मुंबई शहराच्या तुलनेत ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न हे फार कमी आहे. जेव्हा शहरी आणि ग्रामीण भागातील माणसाचे दरडोई उत्पन्न एक होईल तेव्हाच समसमान वाटप होईल. एवढे बोलून मी वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो

....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या राज्यातल्या दीनदुर्बल, शोषित, पीडित, अंध, अपंग, निराधार, आदिवासी, दलित, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, अल्पसंख्याक जनतेला हे राज्य त्यांचे आहे असे वाटावे त्या दृष्टीने हे सरकार अर्थसंकल्प सादर करीत आहे असे माननीय अथ मंत्र्यांनी मोठा आव आणून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्रातील सामान्य माणूस, दीनदुबळा माणूस, शेतकरी, शेतमजूर यांची घोर निराशा झाली आहे. अर्थसंकल्प या शब्दामध्येच मोठा अर्थ सामावलेला आहे. वर्षभरामध्ये करावयाचा संकल्प व त्याला आवश्यक असलेली अर्थाची जोड यास अर्थसंकल्प म्हणतात. या नव्या सरकारने पहिला अर्थसंकल्प मांडत असताना फक्त संकल्पच केलेला दिसतो आहे. त्याला अर्थाची जोड दिलेली दिसत नाही. त्यामुळे या अर्थसंकल्पाचा तीव्र निषेध करण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे .....

सावकाराकडून शेतकऱ्यांनी घेतलेले 156 कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याची मागणी कोणी केली होती ? आम्हाला सावकार हा शब्द सुध्दा आठवत नव्हता. पुरलेले मढे उकरुन काढून 156 कोटी रुपयांचे सावकाराचे कर्ज या माफ करण्याचा निर्णय या शासनाने घेतला आणि पुन्हा अर्थसंकल्पाच्या पहिल्या पानावर लिहिता की, सावकाराचे 156 कोटी रुपयांचे कर्ज आम्ही माफ करीत आहोत. ज्या सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याचा निर्णय आमचे स्व.आर.आर.पाटील साहेबांनी घेतला होता त्याच सावकारांचे कर्ज माफ करण्याचे काम तुम्ही या ठिकाणी केलेले आहे. या सावकारांची कोठे नोंद आहे, या सावकाराकडून कोणी कर्ज घेतले होते ? या सरकारमध्ये बसलेले काही लोक सावकारीला प्रोत्साहन देण्यासाठी किंवा त्यांच्यातील कोणी सावकार आहेत की, काय अशी शंका आम्हाला येत आहे. हा निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताचा नाही, सामान्य जनतेच्या दृष्टीने हिताचा नाही. त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांना जे पीक कर्ज लागते ते पीक कर्ज माफ करण्याचा निर्णय या पुढे घेतला पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार, सूक्ष्म सिंचन योजनांसाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. सूक्ष्म सिंचन योजना पुढे आणण्यासाठी शासनाला भरीव अशी तरतूद करावी लागणार आहे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात कोणतीही मागणी या शासनाने मान्य केली नाही. शिक्षणाला झीरो बजेट करण्यात आलेले आहे. राज्यातील लाखो शिक्षक अर्थसंकल्पाकडे डोळे लावून बसले होते. ज्या शाळा अनुदानावर आल्या आहेत, ज्या शाळांना 1 मार्च रोजी अनुदान घोषित करण्यात येईल यासंदर्भात यादी जाहीर करण्यात आली तसेच शाळांमध्ये काम करणारे हजारो शिक्षक या अर्थसंकल्पाकडे डोळे लावून बसले होते परंतु या अर्थसंकल्पामुळे या शिक्षकांची घोर निराशा झालेली आहे. शिक्षणाच्या संदर्भात या अर्थसंकल्पात एक रुपयाची सुध्दा तरतूद करण्यात आलेली नाही. म्हणून या अर्थसंकल्पाचा मी तीव्र विरोध करतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्प वाचल्यानंतर तो केवळ उद्योजकांसाठी, कॉर्पोरेट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे.....

जगतासाठी निर्माण केला की, काय अशा प्रकारची शंका वाटू लागल्यामुळे मी या अर्थसंकल्पाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

तालिका सभापती : वेळ कमी असल्यामुळे उर्वरित सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण एका एका मिनिटात पूर्ण करावे अशी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर): सभापती महोदय, हा अर्थसंकल्प आहे की, चिन्हांकित अर्थसंकल्प आहे असा माझ्या सारख्या सदस्याच्या मनात प्रश्न येतो.

सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांच्या भाषणात 99 परिच्छेदामध्ये 24-25 बाबींमध्ये हा प्रस्ताव चिन्हांकित स्वरूपात आहे असे सातत्याने म्हटले गेले आहे.

सभापती महोदय, वित्त मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मराठी प्रतीमधील पृष्ठ क्रमांक 15 व 16, परिच्छेद क्रमांक 56 च्या तिसऱ्या परंतुकामध्ये उद्योजकता विभागासाठी यावर्षी 161.48 कोटी रुपये इतका नियतव्यय उपलब्ध केलेला आहे असे म्हटले आहे. सदरचा अर्थसंकल्प अद्याप मंजूर व्हावयाचा आहे. पुढे असे म्हटले आहे की, उद्योजकता विभागासाठी यावर्षी नियतव्ययाची रक्कम उपलब्ध केलेली आहे. परंतु सभागृहाच्या परवानगीशिवाय ही रक्कम उपलब्ध करून देता येते काय ? त्यामुळे यासंदर्भात माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात माहिती द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या मराठी प्रती बरोबर इंग्रजी प्रत सुध्दा सन्माननीय सदस्यांनी हाताळली असेल. इंग्रजी अर्थसंकल्पात फार स्पेलिंग चुका आहेत. यामध्ये "मेरीटाई बोर्ड,टेक्नॉलॉजी, ट्रान्सपरन्सी" अशा इंग्रजी शब्दांच्या स्पेलिंग मध्ये चुका आहेत.

सभापती महोदय, सर्वात मोठी चूक हिंदूहृदय सम्राट माननीय बाळासाहेब ठाकरेंच्या आडनावामध्ये सुध्दा चूक आहे त्यामुळे ही चूक वित्त राज्यमंत्र्यांनी कशी मान्य केली हे कळत नाही.

सभापती महोदय, नागपूर आणि पुणे मेट्रो रेल्वेचा अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु ठाणे मेट्रो रेल्वेचा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. ठाणे मेट्रो रेल्वे पूर्वीपासूनच प्रस्तुत आहे परंतु त्यासंदर्भात एका अक्षरानेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात स्मार्ट सिटीचा उल्लेख आहे परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात यासंदर्भात स्टडी ग्रुप नेमला जाईल असा उल्लेख आहे परंतु अद्यापि स्टडी ग्रुपची नेमणूक झालेली नाही. स्टडी ग्रुपसाठी 268 कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे परंतु हा नियतव्यय कसा आणि कोणत्या गोष्टीवर आधारित केला आहे यासंदर्भातील उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे अशी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे.....

सभापती महोदय, केंद्रीय नागरी परिक्षांर्थ्यांसाठी प्रोत्साहन म्हणून 20 कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या संदर्भातील योजनेसाठी टीम महाराष्ट्र असा उल्लेख आहे. परंतु टीम महाराष्ट्र कोठेही दिसून येत नाही. या अर्थसंकल्पात एकही योजना मा.बाळासाहेब ठाकरेंच्या, माँ साहेबांच्या नावाने, प्रमोद नवलकर साहेबांच्या नावाने, दत्ताजी नलावडे किंवा धर्मवीर आंनद दिघेंच्या नावाने करण्यात आलेली नाही. या नावांचा त्यांना पूर्णपणे विसर पडलेला आहे. सर्व योजना भाजपाच्या नेत्यांच्या नावानेच आखलेल्या आहे. तसेच या योजनेमध्ये बऱ्याचशा त्रुटी असल्यामुळे मी या अर्थसंकल्पाचा तीव्र निषेध करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.
धन्यवाद.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ मी पाच मिनिटांसाठी म्हणजे 11.50 पर्यंत वाढवित आहे.

....5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, निवडणुकीच्या जाहीरनाम्या सारखाच हा अर्थसंकल्प असल्याने मी त्याचा विरोध करण्यासाठी उभा आहे.

शेतकऱ्यांचे कर्ज या अर्थसंकल्पातून माफ होईल, शेतकऱ्यांची विजेची बिले माफ होतील असे सर्वसामान्य शेतकऱ्यांना वाटत होते परंतु या सरकारने शेतकऱ्यांच्या संदर्भात कोणतीही भूमिका या अर्थसंकल्पात घेतल्याचे दिसून येत नाही. या अर्थसंकल्पात केवळ शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसण्याचे पाप या अर्थसंकल्पात झालेले आहे हे यावरून सिध्द होते.

सभापती महोदय, कालच केंद्रशासनाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी 2000 कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. शासनाने गारपीटग्रस्तांसाठी मदत केली परंतु अवकाळी पावसामध्ये ज्या हजारो शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना पाच रुपयाची सुध्दा मदत या शासनाने दिलेली नाही. केंद्र सरकारने जी 2000 कोटी रुपयांची मदत जाहीर केलेली आहे ती अवकाळी पावसामुळे महाराष्ट्रातील ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्यांना हे अधिवेशन संपण्याच्या आत मदत पोहचेल याची काळजी सरकार घेईल अशी अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करतो.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने आदिवासी विभागासाठी 5 हजार कोटी रुपयांची तरतूद दर वर्षीच्या अर्थसंकल्पात केली जाते. परंतु या अर्थसंकल्पात आदिवांसीसाठी केवळ रस्ते आणि इंदिरा आवासाचे घर या व्यतिरिक्त कोणतीही योजना या शासनाने आदिवासींच्या कल्याणासाठी घेतली आहे असे मला तरी वाटत नाही. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी या शासनाने केलेले दुर्लक्ष हे आदिवासी भागातील जनता कदापि विसरणार नाही.

सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्रात तापी खोरे आहे. तापी खोऱ्याच्या माध्यमातून या परिसराचा विकास फार उशिराने झालेला आहे. तापी नदी उलटया बाजूने वाहत असल्यामुळे तापीचे पाणी कॅनॉलच्या माध्यमातून शेतामध्ये जात नाही हे आमचे दुर्दैव आहे. तापीवर असलेल्या उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणे ही येथील लोक प्रतिनिधींची गेल्या चार पाच वर्षापासूनची मागणी आहे. परंतु ही मागणी सुध्दा या अर्थसंकल्पात मान्य झाल्याचे दिसून येत नाही. आम्ही ज्यावेळेस सत्तेमध्ये होतो त्यावेळेस आमचे नेतृत्व करणारे मा. खडसे साहेबांच्या हातामध्ये हे सर्व असताना आजही तापी खोऱ्यातील उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी या शासनाने कोणतीही तरतूद केलेली नाही. ...6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी.....

सभापती महोदय, मा.वित्त राज्यमंत्री श्री. केसरकर हे शहरी भागातून आलेले आहेत. 226 महापालिका महाराष्ट्रात असून त्यात 23 महानगरपालिका आहेत व 13 नगरपंचायती आहेत. या सर्वांना मिळून केवळ 600 कोटी रुपये ठेवले आहे.एकीकडे शहरीकरण वाढलेले असताना सुध्दा शहरी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी 3 महानगरपालिकांना 600 कोटी रुपये देण्यात आले आहेत व 226 महापालिका महाराष्ट्रात असून त्यात 23 महानगरपालिका आहेत व 13 नगरपंचायतीसाठी केवळ 600 कोटी रुपये ठेवले हे आमचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी एलबीटीच्या संदर्भात विचार व्यक्त केले आहेत. एलबीटीच्या संदर्भात शासनाने पुनर्विचार करावा अशी माझी विनंती आहे. एलबीटी माफ करण्यासाठी तुम्ही जर ग्रामीण भागातील लोकांवर व्हॅट लावत असाल तर तुम्ही 1995 ते 1999 मध्ये केलेले राज्य विसरलात असे मला वाटते. मुंबईच्या उड्डाण पुलासाठी, पुण्याच्या एक्सप्रेस हायवेसाठी तुम्ही महाराष्ट्रभर पेट्रोल आणि डिझेलवर सेस लावला होता.याची शिक्षा महाराष्ट्राच्या जनतेने तुम्हाला 1999 मध्ये दिली होती. शहरी भागाच्या विकासासाठी तुम्ही ग्रामीण भागातील जनतेकडून पैसे वसूल करीत असाल तर ग्रामीण भागातील माणूस हे कदापिही सहन करणार नाही. ज्या ग्रामीण भागातील माणसाने कधी मुंबई पाहिली नाही तो माणूस मुंबईसाठी पैसे देईल, हे कदापिही शक्य होणार नाही.

सभापती महोदय, टोलमुक्त महाराष्ट्राची तुम्ही निवडणुकीत घोषणा केली होती. परंतु तुम्ही या अर्थसंकल्पात टोलमुक्त महाराष्ट्रासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. टोलमुक्त महाराष्ट्राच्या नावाने तुम्ही घोषणा करुन महाराष्ट्राला फसवले आहे.

सभापती महोदय, या शासनाने सावकारांचे कर्ज माफ केले असून जगातील सात आश्चर्यापैकी ते एक आश्चर्य आहे. खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करीत आहे. सभापती महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.50 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

कारखाना कायदा 1948, मध्ये 54 दुरूस्त्या करण्यात आल्यामुळे कामगारांवर होणा-या दुष्परिणामाबाबत

(1) * 2845 डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.राजेंद्र मुळक, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कारखाना कायदा 1948, मध्ये 54 दुरूस्त्या करण्यात आल्यामुळे विजेचा वापर करणाऱ्या कारखान्यात 20 कामगार आणि विजेचा वापर न करणाऱ्या कारखान्यात 40 कामगार असतील तर हा कायदा लागू होईल, यामुळे जास्तीत जास्त कामगार स्वच्छता, सुरक्षा, पिण्याचे पाणी, कामाचे तास, साप्ताहिक सुट्टी, ओव्हर टाईम, बाळंतपणाची रजा इ. सुविधांपासून वंचित राहणार असल्याचे तसेच वार्षिक भरपगारी रजा साठविण्याची मर्यादा 290 दिवसांवरून 30 दिवस करण्यात आल्याने यासारखे अनेक दुष्परिणाम होत असल्याबाबतचे सविस्तर निवेदन भारतीय कामगार सेना (पुणे विभाग),पुणे यांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी दिनांक 15 ऑक्टोबर 2014 रोजी वा त्यासुमारास मा.कामगार मंत्री यांना दिले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने या दुरूस्त्यांसंदर्भात कोणते निर्णय घेतले आहेत,

(3) अद्याप, या संदर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.विजयकुमार देशमुख, श्री. प्रकाश महेता यांच्याकरिता : (1), (2) व (3) कारखाने अधिनियम, 1948 या केंद्र शासनाच्या अधिनियमातील काही कलमांमध्ये बदल करण्यासाठी, संविधानातील तरतुदी विचारात घेऊन, त्याबाबतचा प्रस्ताव मा.राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन होता. तथापि, प्रस्तुत अधिनियमामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असून त्या संदर्भातील विधेयक अलीकडेच संसदेत सादर करण्यात आलेले आहे.उपरोक्त वस्तुस्थितीत, सदर अधिनियमातील कलमांमध्ये बदल प्रस्तावित करण्यासंबंधीचा राज्य शासनाचा प्रस्ताव सद्य:स्थितीत तूर्त स्थगित ठेवण्याचा विषय विचाराधीन आहे. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने उक्त कायद्यात बदल करण्यात येऊ नयेत अशा आशयाची निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अनेक कायद्यांमध्ये बदल करण्याच्या बाबतीत केंद्र शासनाच्या अधिनियमामध्ये बदल करण्यासाठी काही प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन होते. संसदेमध्ये सुध्दा आज अनेक कायद्यांमध्ये बदल प्रस्तावित केले आहेत. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2845....

डॉ.नीलम गोऱ्हे....

नमूद केले आहे की, "राज्य शासनाचा प्रस्ताव सद्यःस्थितीत तूर्त स्थगित ठेवण्याचा विषय विचाराधीन आहे." याचाच अर्थ केंद्र सरकारकडून या संदर्भातील निर्णय जोपर्यंत घेतला जात नाही तोपर्यंत हा निर्णय स्थगित ठेवण्यात येणार आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, केंद्र सरकार कायद्यांमध्ये जे बदल करु इच्छित आहे त्या बाबत राज्य सरकारचे मत काय आहे आणि ते कायदे राज्यामध्ये लागू करताना राज्य सरकारची भूमिका नेमकी काय राहणार आहे ? महोदय, कायद्यांमध्ये बदल करण्याच्या बाबतीत भारतीय कामगार सेनेने नापसंती व्यक्त केली आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, आस्थापना बंद करण्यासाठी कामगारांची मर्यादा 100 वरुन 300 वर नेण्यात आली आहे. तसेच कंत्राटी कामगार कायदा हा 20 कामगारांच्या वर लागू होत होता. 20 कामगारांच्या आत कंत्राटी कामगार असतील तर त्यासाठी वेगळ्या प्रकारची मुभा होती. परंतु आता ही मर्यादा 50 पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच हळूहळू कामाची व्याख्या सुध्दा व्यापक करण्यात आली आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, कामगार संघटना, दोन्ही सभागृहाचे सदस्य आणि सरकार या सर्वांना विश्वासात घेऊन ट्राय पार्टी स्वरुपाची व सातत्याने निरंतर पध्दतीने या बदलांचा आढावा घेण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल काय, तसेच या बदलासंदर्भात राज्य सरकारची काय भूमिका आहे किंवा या बाबतीत राज्य शासनाने निर्णय घेतला आहे काय ?

सभापती : माननीय मंत्र्यांनी या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, काल प्रश्नोत्तराच्या यादीतील केवळ 5-6 प्रश्नांवर चर्चा झाली. माझी विनंती आहे की, ही संख्या कमीत कमी 10 वर जाण्यासाठी दोन्ही बाजेने सहकार्य करावे.

श्री.विजयकुमार देशमुख : सभापती महोदय, कारखाने अधिनियम, 1948 या केंद्र शासनाच्या अधिनियमातील काही कलमांमध्ये बदल करण्यासाठी, संविधानातील तरतुदी विचारात घेऊन, माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन होता. तथापि, प्रस्तुत अधिनियमामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असून त्या संदर्भातील विधेयक अलीकडे संसदेत सादर करण्यात आलेले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2845....

श्री.विजयकुमार देशमुख....

आहे. त्यामुळे राज्य सरकारचा जो प्रस्ताव होता तो आता विचाराधीन नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केंद्र सरकारच्या कायद्यातील प्रस्तावित बदल दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्य आणि कामगार संघटना यांना विचारात घेऊन करण्याबाबत सुचविले आहे. मी सांगू इच्छितो की, या बाबत सर्वांची बैठक आयोजित करण्यात येईल आणि सर्वांच्या सहमतीने आवश्यक ते बदल स्वीकारण्यात येतील.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, या संदर्भातील अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष हे उद्योग विभागाचे प्रधान सचिव आहेत. त्यांना कामगार कायदे बदलण्याचा काय अधिकार आहे ? ज्या समितीमध्ये कामगार कायद्यात बदल करण्याबाबत चर्चा झाली त्या समितीमध्ये एकाही पक्षाच्या कामगार नेत्याचा समावेश नाही. कामगार विभागाच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून जबरदस्तीने त्यांच्याकडून सकारात्मक अहवाल मागविला जात आहे. महोदय, विविध कामगार कायद्यामध्ये बदल करीत असताना कारखान्यामध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगार कायद्याला कारखाने अधिनियमातून वगळण्याचे कटकारस्थान रचले गेले आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, या संपूर्ण विषयाबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, उद्योग विभागाकडून वेगवेगळ्या कायद्यांच्या बाबतीत आढावा घेण्यात आला ही वस्तुस्थिती आहे. एखादा कायदा बदलावयाचा की नाही, या बाबतचा निर्णय विभाग घेत नाही. त्याबाबत शासन निर्णय घेत असते. शासनाने या संदर्भातील आपली भूमिका यापूर्वीच स्पष्ट केलेली आहे. सरसकट 20 कायद्यांमध्ये बदल करण्यासंदर्भातील बातम्या आम्हीही वर्तमानपत्रातून वाचल्या आहेत. परंतु या निमित्ताने मी सांगतो की, अशाप्रकारे 20 कायद्यांमध्ये बदल करण्याचा शासनाचा कोणताही मानस नाही. काही कायद्यांमध्ये बदल करण्याचा शासनाचा जरूर मानस आहे. परंतु त्यासाठी सर्वांना विश्वासात घेऊन व त्यांच्यासोबत बैठक आयोजित करून, या बाबतीत राज्य सरकारची काय मनीषा आहे हे जाहीर करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2845....

श्री.देवेंद्र फडणवीस....

त्यानंतरच कायद्यामध्ये आवश्यक तो बदल केला जाईल. मी पुन्हा एकदा सांगतो की, कायद्यांमध्ये सरसकट बदल करण्याचा शासनाचा कोणताही मानस नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, केंद्र सरकारने जो कायदा प्रस्तावित केला आहे त्याचे स्वरूप काय आहे ? सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, 20 कामगारांची मर्यादा 50 पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अशा बदलाच्या बाबतीत राज्य सरकारचे धोरण काय राहणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या कायद्यातील बदलासंदर्भात राज्य सरकारकडे अजून तरी कोणतीही विचारणा झालेली नाही. प्रस्तावित बदलाबाबत राज्य सरकारचे काय मत आहे या बाबत बैठक घेण्यात येईल. मागच्या सरकारच्या काळात एका कायद्यामध्ये बदल करण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. त्या बाबतचा उल्लेख सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केला. 100 कामगारांची मर्यादा 300 वर नेण्याचा निर्णय मागच्या सरकारने घेतला होता. सदरहू बदल केंद्र सरकारच्या परवानगीसाठी पाठविण्यात आला होता आणि केंद्र सरकारने त्यास परवानगी दिली आहे. या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही परवानगी मागितली नाही. मी पुन्हा सांगतो की, कायद्यातील बदलांबाबत केंद्र सरकारने राज्य सरकारकडे विचारणा केलेली नाही. महोदय, हा विषय संवेदनशील आणि कामगारांशी संबंधित असल्यामुळे केंद्र सरकारने जे बदल सुचविले आहेत त्या बाबत राज्य सरकारची काय भूमिका आहे या बाबत एक बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी उद्योग विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीसंदर्भात एक प्रश्न विचारलेला आहे. त्या अनुंषंगाने मी विचारतो की, राज्य सरकारच्या स्तरावर प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती काय, असल्यास, त्या समितीचे कोणते निष्कर्ष सरकारपुढे आले आहेत? तसेच केंद्र सरकारने प्रारूप स्वरूपात विधेयक संसदेमध्ये सादर केले आहे ते विधेयक त्यांच्याकडून मागवून वेबसाईटवर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2845....

श्री.सुनील तटकरे....

अपलोड करावे, जेणेकरुन त्या बाबतीत माहिती सर्व संबंधितांना आणि कामगार क्षेत्रातील लोकांना मिळेल. महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "उपरोक्त वस्तुस्थितीत, सदर अधिनियमातील कलमांमध्ये बदल प्रस्तावित करण्यासंबंधीचा राज्य शासनाचा प्रस्ताव सद्य:स्थितीत तूर्त स्थगित ठेवण्याचा विषय विचाराधीन आहे." ही स्थगिती कायमस्वरुपी ठेवण्याचे जाहीर करण्यात येईल काय आणि प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जो अहवाल दिला आहे त्याचे एकंदरीत स्वरुप काय आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल अजून प्राप्त झालेला नाही. "मेक इन महाराष्ट्र" हा कार्यक्रम हातामध्ये घेतला त्यावेळी उद्योग क्षेत्रातील वेगवेगळ्या असोसिएशन आणि वेगवेगळ्या कामगार संघटनांनी जी निवेदने दिली होती त्यांचा साकल्याने विचार करुन, उद्योग आणि कामगारांसमोरील मुख्य अडचण काय आहे यावर चर्चा करण्यात आली. आपले जे वेगवेगळे कायदे आहेत त्या संदर्भात अनेक ठिकाणी असे लक्षात आले की, ते कायदे उद्योग आणि कामगारांच्या फायद्याचे नाहीत. तत्संदर्भातील अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे सुरु आहेत आणि त्यातून कोणताही निर्णय होत नाही. त्यामुळे या गोष्टींचा आढावा घेण्यासाठी समिती गठीत केली होती. त्या समितीचा अहवाल अजून राज्य सरकारकडे आलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील हे सुध्दा या विषयी मला भेटले होते. त्यांना मी सांगितले की, माथाडी कामगार कायदा रद्द करण्याबाबत राज्य सरकारचा कोणताही विचार नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2845....

श्री. देवेंद्र फडणवीस ....

मी त्यांना सांगितले की, आज माथाडी कायद्याचा दुरूपयोग करून माथडींचे दलाल बनले आहेत, त्यांना क्रॅक डाऊन करण्याचा उद्देश आपल्यासमोर आहे. आपल्यालाही कल्पना आहे की, मागच्या काळात या संदर्भात आदरणीय श्री. शरद पवार साहेबांशी देखील चर्चा झाली होती. पुण्याच्या संदर्भात त्यांनी देखील चिंता व्यक्त केली होती. विशेषत: पुण्यात काही लोकांनी या कायद्याचा दुरूपयोग करून काम सुरू केले आहे. कायदा अतिशय चांगला आहे, त्यामध्ये फार काही बदल करण्याची गरज आहे असे माझे मत नाही. आज कायद्यातील काही गोष्टींचा दुरूपयोग करून काही दलाल तयार झाले आहेत. ते स्वत: कामगार नाहीत. ते जे खरे कामगार आहेत त्यांना माथाडीचा फायदा मिळू देत नाहीत. केवळ उद्योगांना ब्लॅकमेल करून स्वत: पैसे घेतात, त्यामुळे काम करणाऱ्या कामगारांना माथाडीचा फायदा मिळत नाही. दलालांना फायदा होत आहे. अशा दलालांना क्रॅक डाऊन करण्याकरिता काय करता येईल या संदर्भात आढावा घेण्याकरिता सांगितले आहे. कामगारांना निश्चितपणे सुरक्षितता दिली जाईल. मी सन्माननीय सदस्यांना त्याही वेळी सांगितले आणि आजही आश्वस्त करतो की, सदर बाबतीत माथाडी क्षेत्रात काम करणारे सर्व संघटनांची एकत्रित बैठक घेतली जाईल.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील पोलिसांसाठी नवीन घरबांधणी व जुन्या वसाहतींची दुरुस्ती करणेबाबत

(2) * ३७८२ श्री.विजय गिरकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात पोलिसांसाठी गेल्या २० वर्षात फक्त २० हजार घरे बांधली गेल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(2) तसेच, पोलिसांच्या गृहप्रकल्पांसाठी प्रत्येक वर्षी ४०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जात होते परंतू मागील दोन वर्षात सदर मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही तसेच प्रशासकीय मंजुरीही न मिळाल्याने पोलीस गृहनिर्माणाचे काम ठप्प झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे ही आहे काय,
(3) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन का देण्यात आला नाही व प्रशासकीय मंजुरीला विलंब का होत आहे,
(4) तसेच, मुंबईमध्ये पोलिसांसाठी असलेल्या वसाहती पूर्णपणे जीर्ण झालेल्या असून अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, सध्या पोलीस राहत असलेल्या जीर्ण झालेल्या वसाहतींच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा. राम शिंदे, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. मागील 20 वर्षांत एकूण 19,051 इतकी निवासस्थाने बांधली आहेत.

(2) व (3) हे खरे नाही. पोलिसांच्या निवासस्थाने व कार्यालयीन इमारतींसाठी मागील तीन वर्षांत खालीलप्रमाणे निधी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

वर्ष	महामंडळाला उपलब्ध करून देण्यात आलेला निधी रुपये (कोटीत)
2012-13	234.78
2013-14	165.65
2014-15	134.61
एकूण	535.04

बांधकाम सुरू असलेल्या तसेच मंजूर झालेल्या कामांचे आर्थिक दायित्व अधिक असल्याने नव्याने प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेल्या नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3782....

प्रा. राम शिंदे ....

(4) व (5) मुंबईतील बऱ्याचशा पोलीस वसाहती व निवासस्थाने ब्रिटिशकालीन असल्याने मोडकळीस आलेल्या असून ज्या वसाहतींची दुरुस्ती शक्य आहे त्यांची दुरुस्ती करण्याची व ज्या वसाहती दुरुस्ती करण्यायोग्य नाहीत, त्यांचा पुनर्विकास करण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री संवेदनशील आहेत, त्यांनी सफाई कामगार व पोलीस यांच्यासाठी 4 एफएसआय देऊन त्यांना घरे देण्याचे घोषित केले आहे. गेल्या अर्थसंकल्पाच्या वेळी भाजपचे मुंबईचे सरचिटणीस श्री. सुनील राणे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पत्नींचा एक प्रचंड मोर्चा आझाद मैदानावर आला होता. स्व. गोपीनाथ मुंडे व सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार त्या मोर्चाला सामोरे गेले होते. पोलिसांच्या पत्नींची त्यावेळी घराची मागणी होती. दुर्दैवाने पोलिसांच्या पत्नींना घरासाठी रस्त्यावर यावे लागले. आमचे पोलीस पती देशाची, नागरिकांची सुरक्षा करतात. मात्र आम्हाला कित्येक वर्ष घर नाही, असे त्या सांगत होत्या. पोलिसांच्या पत्नींनी घर मिळण्याच्या संदर्भात मोर्चा काढला होता. माननीय मुख्यमंत्री सुध्दा एका मेळाव्याला गेले होते.

सभापती महोदय, पोलिसांना मुंबई शहरात घरे नाहीत. वरळी, डिलाईड रोड, नायगाव, शिवडी येथील बीडीडी चाळीत त्यांच्यासाठी 3 हजार घरे दिली आहेत. ब्रिटिशकालीन असलेल्या बीडीडी चाळी कोसळण्याच्या स्थितीत आहेत. बीडीडी चाळीमध्ये राहणाऱ्या इतर लोकांना 17-18 रुपये भाडे आहे. परंतु पोलिसांना मात्र चार, साडे चार हजार भाडे बीडीडी चाळीतील 160 चौ.फू. घरासाठी द्यावे लागतात. एका खोलीत वडील पोलीस, मुलगा पोलीस, मुलगी पोलीस राहत असले तरी प्रत्येकाचे चार, साडे चार हजार रुपये घरभाडे भत्ता म्हणून कापला जातो. माझा प्रश्न असा आहे की, बीडीडी चाळींची दुरुस्ती करून पोलिसांसाठी ज्या 3 हजार खोल्या आहेत, त्या पोलिसांना मालकी हक्काने देणार का ? सभापती महोदय, सुधारित उत्तर आले आहे. प्रश्न विचारण्यात आला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3782....

श्री. भाई गिरकर ....

होता की, गेल्या 20 वर्षांत फक्त 20 हजार घरे बांधण्यात आल्याची बाब खरी आहे का ? प्रशासनातर्फे सांगितले आहे की, हे खरे नाही. मागील 20 वर्षांत 19051 इतकी निवासस्थाने बांधली आहेत. मला वाटले की, हे खरे नाही असे म्हटल्यावर 40 हजार घरे बांधली आहेत असे सांगितले पाहिजे होते किंवा 20 हजार घरे बांधली हे खरे आहे असे म्हटले पाहिजे होते. परंतु सुधारित उत्तरात सांगितले आहे की, हे खरे नही. 19051 इतकी घरे बांधली आहेत.

सभापती महोदय, पोलिसांना संघटना करता येत नाही. पोलिसांवर कामाचा ताण पडत असतो. पोलिसांना घर दिले तर जागेचा प्रश्न मिटू शकेल. माझा प्रश्न असा आहे की, बीडीडी चाळीतील पोलिसांना पडण्यास आलेल्या इमारती लवकरात लवकर दुरूस्त करून किंवा पुनर्बांधणी करून मालकी हक्काचे घर देणार का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पोलिसांच्या निवासस्थानाच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाबाबत राज्य शासन अतिशय गंभीर आहे. राज्य शासनाने अगोदर या संदर्भात घोषणा केली आहे की, 4 चटईचेत्र दिले जाणार आहे. मी सदनाला सांगू इच्छितो की, शासनाने सन 2013-14 मध्ये 165.65 कोटी रूपये दिले आहेत, सन 2014-15 मध्ये 134.61 कोटी रूपये दिले आहेत. शासन पोलिसांच्या निवासस्थानासंबंधी गांभीर्यपूर्वक विचार करीत आहे. शासनाने सन 2015-16 च्या अर्थसंकल्पात 298.67 कोटी रूपये एवढ्या निधीची तरतूद केली आहे. शासनाने पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनच्या संदर्भात 500 कोटी रूपयांचे कर्ज उभारू पण पोलिसांना निवासस्थाने देण्याची व्यवस्था करू अशी धारणा केली आहे. तो प्रश्न सुध्दा विचाराधीन आहे, त्यामध्ये 2215 निवास्थानाची योजना आहे. सरकार पोलिसांच्या निवासस्थानाच्या संदर्भात अत्यंत गंभीरपणे पाहत आहे. दोन्ही योजनेत जवळपास 800 कोटी रूपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, उत्तरात सन 2012-13, सन 2013-14, सन 2014-15 ची पोलिसांच्या गृह प्रकल्पाच्या संदर्भातील आकडेवारी दिली आहे. मागील 2 वर्षे सोडता पूर्वी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3782....

श्री. धनंजय मुंडे ....

पोलिसांच्या घर प्रकल्पासाठी 400 कोटी रूपयांची तरतूद केली जायची. मात्र मागच्या 2 वर्षांत ती तरतूद कमी करण्यात आली आहे. आजही सांगण्यात आले आहे की, अर्थसंकल्पात 298 कोटी रूपयांची या संदर्भात तरतूद केली आहे. सभापती महोदय, उत्तरात सांगितले आहे की, बांधकाम सुरूअसलेल्या तसेच मंजूर झालेल्या कामांचे आर्थिक दायित्व अधिक असल्याने नव्याने प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेल्या नाहीत. पहिल्याच कामाचे देणे जास्त आहे म्हणून या वर्षीच्या अर्थसंकल्पात अधिकची रक्कम ठेवणे आवश्यक होते आणि तरच पोलिसांचे गृह प्रकल्प मंजूर झाले असते. माझी विनंती आहे की, 298 कोटी रूपयांच्या ऐवजी अधिकची रक्कम ठेवली तर पोलिसांचे गृह प्रकल्प लवकर पूर्ण होतील आणि त्यांना याचा फायदा मिळू शकेल. सरकार हे करणार आहे का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेली सूचना योग्य आहे. अग्रेसिव्हपणे पूर्ण प्रकल्प हातात घेऊन मोठ्या प्रमाणात पोलिसांकरिता घरे तयार करण्याच्या संदर्भात 3-4 इनिशिएटिव्ह घेतल्या आहेत. आपण स्वत: मंडळ तयार केले आहे, त्या मंडळाने बांधकाम करायचे आहे आणि त्याकरिता आपण तरतूद दिली आहे, त्याच्या व्यतिरिक्त त्यांना 500 कोटी रूपये उभारण्याची मान्यता देत आहोत. 500 कोटी रूपये त्यांना हुडकोच्या माध्यमातून उपलब्ध होतील, त्याची परवानगी आपण त्यांना दिली आहे. त्यामुळे ॲडिशनली आता जी सूचना केली आहे ती या 500 कोटी रूपयांमध्ये कव्हर होईल. आपण त्या व्यतिरिक्त त्यांच्याकरिता योजना तयार केली आहे, 4 एफएसआय दिला आहे. त्यांना या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात रि-डेव्हलपमेंट किंवा नवीन प्रकल्प करण्यात येत असतील तर व्हायेबिलिटी प्राप्त होणार आहे. बऱ्याच दिवसांपासून पोलिसांच्या गृहनिर्माण महामंडळाची मागणी होती, ती पूर्ण केली आहे. आपण त्यांना सांगितले आहे की, केवळ मुंबईतच नव्हे तर राज्यभर त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रकल्प तयार करावेत. शासनाकडून सर्व प्रकल्पांना मान्यता देण्यात येईल. निधी देण्याची आवश्यकता आहे तेथे सरकारकडून किंवा आपण जे कर्ज उभारतो त्यातून निधी देऊ. काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3782....

श्री. देवेंद्र फडणवीस ....

ठिकाणी 4 एफएसआय किंवा काही ठिकाणी 3 एफएसआय दिला आहे, त्याचा उपयोग करून ज्या ठिकाणी हाऊसिंग डेव्हलप करता येते त्या ठिकाणी तशा इनिशिएटिव्हने करावे, अशाप्रकारे दोन्ही बाबींतून मोठ्या प्रमाणात पोलिसांकरिता घरे तयार करणार आहोत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, पोलिसांच्या गृह निर्माणासाठी शासनाने घेतलेली भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी विशद केली आहे. अतिशय उत्तम पध्दतीने करण्याच्या संदर्भात ते नियोजन करीत आहेत त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आपण सांगितलेली वस्तुस्थिती आहे. परंतु, हा मुंबईपुरता प्रश्न सीमित नाही. राज्यभरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहती इतक्या नादुरूस्त आहेत की, तेथे राहणे अशक्यप्राय आहे. उत्तरात सांगितले आहे की, पुनर्विकास करण्याची बाब विचाराधीन आहे. 4 एफएसआय देऊ. मुंबई शहरात ते होईल असे सांगितले आहे.

सभापती महोदय, मुंबई शहराच्या व्यतिरिक्त इतर परिसरामध्ये सुध्दा इतक्या प्रमाणात करण्यात येईल, तेव्हा त्याची उपलब्धता होईल. 500 कोटी रूपयांचे कर्ज मिळत असताना मुंबई व राज्यातील इतर ठिकाणचे गृहनिर्माण प्रकल्प एकाच वेळी हातामध्ये घेणे आवश्यक आहे. आपण तसे नियोजन करून तसा 3 वर्षांचा आराखडा केला पाहिजे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3782.....

श्री.सुनील तटकरे.....

एका वर्षात हे काम संपणारे नाही. पंचवार्षिक आराखडा तयार केला तर 5 वर्षात हे काम होऊ शकते. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय अशा प्रकारचा अंतिम निर्णय घेतील का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, जरूर या संदर्भातील तीन वर्षाचा आराखडा आपण तयार करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले ते खरे आहे की, केवळ मुंबईपुरते हे करून चालणार नाही. अन्य शहरांमध्ये देखील अशीच परिस्थिती आहे. आपण अर्थसंकल्पात नागपूर येथे स्मार्ट पोलीस स्टेशन घोषित केले आहे. त्या ठिकाणी चार एकर जागा उपलब्ध आहे. तेथे केवळ स्मार्ट पोलीस स्टेशनच नाही तर प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त एफएसआयमधून खूप मोठ्या प्रमाणावर गृहबांधणी आपण करणार आहोत. त्याप्रमाणेच इतर शहरांमध्ये गृह विभागाच्या ज्या जागा आहेत, त्यांना अतिरिक्त एफएसआय दिला तर मोठ्या प्रमाणावर घरे आपल्याला उपलब्ध होऊ शकतील. तोही आपला प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जी सूचना केली आहे, त्याबाबत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाचा मूळ विषय बीडीडी चाळीशी संबंधित आहे. त्या ठिकाणी भाडे आकारणीमध्ये फार मोठी तफावत आहे. पोलिसांना चार ते साडेचार हजार रुपये आणि सर्वसामान्यांना सतरा ते अठरा रुपये भाडे आकारले जाते. एवढे भाडे घेऊन सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतीची दुरुस्ती केली जात नाही. त्या ठिकाणी एकूण 3000 घरे आहेत. ही घरे पडावयास आलेली आहेत, पाण्याच्या टाक्या गळत आहेत. शासन या पोलिसांना कोणता दिलासा देणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाचा प्रश्न राज्य सरकारसमोर आहे. त्यासंदर्भातील धोरण राज्य सरकार तयार करीत आहे. या इमारतींचा तातडीने पुनर्विकास करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा पुनर्विकास करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याचा धोरण ठरविताना निश्चितपणे विचार केला जाईल. आपण जो काही कार्यक्रम निश्चित केला आहे, त्यानुसार शासकीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3782.....

श्री.देवेंद्र फडणवीस.....

निवासस्थाने उपलब्ध करून देणार आहोत. परंतु त्याबरोबरच सरकारचा हाही प्रयत्न आहे की, पोलिसांना सॉफ्ट लोन देऊन स्वतःच्या मालकीची घरे घेता आली पाहिजेत. त्या संदर्भातील इनिशिएटिव्ह सरकारने घेतलेला आहे. शासकीय निवासस्थाने आणि सॉफ्ट लोनच्या माध्यमातून स्वतःची घरे, असे कॉम्बिनेशन करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आहे आणि तशा प्रकारे इन्सेटिव्ह देण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राजकीय कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींवरील सन २००५ पर्यंतचे राजकीय खटले काढून टाकण्याबाबत

(३) *२९०९ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजकीय कार्यकते व लोकप्रतिनिधींवरील सन २००५ पर्यंतचे राजकीय गुन्हे काढून टाकण्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हजारो कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींवर त्यानंतरच्या कालावधीतही अनेक खटले दाखल झाले असून दिवसेंदिवस ह्या संख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर खटले प्रलंबित असल्यामुळे लोकप्रतिनिधींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रलंबित खटले तातडीने काढून टाकण्याबाबत शासननस्तरावर कोणती कार्यवाही करण्यातत आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) शासनाने दि. ०७/०७/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये राजकीय व सामाजिक आंदोलनातील दि. ०१/०५/२००५ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले खटले मागे घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केली होती. त्यानंतर दि. १३/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजकीय व सामाजिक आंदोलनामध्ये दि. ०१/११/२०१४ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले आणि ज्या घटनेत जीवित हानी झालेली नाही आणि खाजगी सार्वजनिक मालमत्तेची रु. ५ लक्ष पेक्षा जास्त रकमेची हानी झालेली नाही असे खटले मागे घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर शासन निर्णयानुसार अशा प्रकरणी खटले मागे घेण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रासाठी, पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे. तसेच उर्वरित भागासाठी जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, मागील 10 वर्षात संपूर्ण राज्यभरात लाखोंच्या संख्येने सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी शेतकरी, कामगार, उद्योगांसाठी अनेक आंदोलने केली आहेत. या आंदोलनकर्त्यांवर मोठ्या प्रमाणावर गुन्हे दाखल झाले असून ही सर्व प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. आंदोलनकर्त्यांना सातत्याने तारखांवर तारखा मिळत आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2909.....

श्री.गोपिकिशन बाजोरिया.....

न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे, न्यायालयांची, न्यायाधीशांची संख्या वाढविणे, तेथील कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे, अशा प्रकारच्या उपाययोजना करण्याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. आज हजारो खटले न्यायालयात प्रलंबित आहेत.

सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाला सकारात्मक उत्तर दिल्याबद्दल मी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करणार आहे. दिनांक 13 जानेवारी, 2015 रोजी शासनाने असा निर्णय घेतला आहे की, दिनांक 1/11/2014 पूर्वीचे सर्व गुन्हे मागे घेण्यात येतील. त्यासाठी दोन समित्याही गठीत करण्यात आल्या आहेत. पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रासाठी पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचा समावेश असलेली समिती आहे तर उर्वरित भागासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे. या समितीचे अधिकारी अकोला सारख्या छोट्या शहरात कधी येणार, समित्याच्या बैठका कधी होणार, असा प्रश्न आहे. त्यामुळे या सर्व प्रक्रियेला खूप विलंब लागण्याची शक्यता आहे. या समित्यांना चालना देण्याकरिता प्रत्येक महिन्यामध्ये समितीचे अधिकारी अकोला सारख्या शहरांमध्ये येऊन बैठका घेतील की, या बैठका मुंबई येथेच होणार आहेत आणि प्रत्येक महिन्यामध्ये या समित्यांच्या बैठका होणार आहेत का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, शासनाने जो नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे, त्यानुसार दिनांक 1 नोव्हेंबर, 2014 पूर्वीचे सर्व खटले मागे घेण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रासाठी पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचा समावेश असलेली समिती आहे तर उर्वरित भागासाठी जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे. या संदर्भात मी स्वत: आढावा घेतलेला आहे. जवळ जवळ सर्व जिल्ह्यांच्या बैठका झालेल्या आहेत व त्यांनी काही शिफारशीही केल्या आहेत. परंतु, फार मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2909.....

श्री.देवेंद्र फडणवीस.....

आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जो पर्यंत सर्व प्रकरणांचा निपटारा होत नाही तोपर्यंत प्रत्येक महिन्यात समित्यांच्या बैठका घ्याव्यात आणि किती बैठका घेण्यात आल्या, किती प्रकरणांबाबत शिफारशी केल्या, याबाबतचा प्रत्येक महिन्याचा अहवाल सादर करावा, अशा प्रकारच्या सूचना तातडीने देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय योग्य असून तशा प्रकारे संबंधितांना निदेश देण्यात येतील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, दिनांक 1/11/2014 पूर्वीचे सर्व खटले मागे घेण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. माझा प्रश्न असा आहे की, त्याच निकषात बसणारे जे गुन्हे दरवर्षी घडतील त्यांचा आढावा घेण्याबाबत या समित्यांना सूचना देण्यात येतील काय आणि ते गुन्हे मागे घेतले जातील का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, अशा प्रकारे ब्लँकेट निर्णय शासनाला घेता येणार नाही. आता तरी अशा प्रकारचा निर्णय शासनाच्या विचाराधीन नाही. सुस्वातीला आपण दिनांक 1/11/2014 पूर्वीचे गुन्हे परत घेऊ. भविष्यात अशा प्रकारचे गुन्हे आपण करु नयेत, अशी अपेक्षा आहे. आता तरी शासनाने हा निर्णय घेतला आहे की, 1/11/2014 पूर्वीचे गुन्हे परत घेण्यात यावेत. त्या पुढील प्रॉस्पेक्टिव्ह स्वरूपाचा निर्णय आपल्याला घेता येणार नाही.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, किमान भविष्यातील खटल्यांचा आढावा ही समिती घेईल का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आता तरी तसा निर्णय आपल्याला घेता येणार नाही. तथापि, दिनांक 1/11/2014 पूर्वीचे खटले मागे घेण्यासंबंधीचा निर्णय झालेला आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी गेल्या 15 वर्षातील सर्व राजकीय खटले मागे घेण्यासंबंधी उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली ते खटले जरी पुढील कालखंडातील असले तरी आंदोलन हा विषय राज्यात नियमितपणे चालत असतो. असे खटले निकषात बसणारे असतील तर त्याबाबत विचार करण्यास काही हरकत नाही. 5 वर्षांनी जेव्हा आम्ही सत्तेवर येऊ त्यावेळी त्याबाबत काय करायचे, हे ठरविता येईल.

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2909.....

श्री.सुनील तटकरे.....

सभापती महोदय, हा मुद्दा असा आहे की, राजकीय खटले आपण मागे घेतो. पण अनेकवेळा अशा काही घटना घडतात की, स्वाभाविकपणे समाजात प्रतिक्रिया उमटतात. आता आपण राजकीय आंदोलनासंदर्भातील निर्णय घेतला आहे. लोणावळा येथे एका 9 वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाला आणि तिचा खून करण्यात आला. त्यानंतर स्वाभाविकपणे लोकांच्या प्रतिक्रिया उमटल्या. ही मुलगी रायगड जिल्ह्यातील इंदापूर येथील होती. परंतु, लोणावळा येथील नागरिकांनीही आंदोलन केले आणि ते रिसॉर्टवर धावून गेले. हे आंदोलन म्हणजे समाजावर झालेल्या अन्यायाची स्वाभाविक सामाजिक प्रतिक्रिया होती. त्यामुळे माझी मुख्यमंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, आता त्यांनी राजकीय खटल्यांबाबत ज्या संवेदना दाखविल्या आहेत, त्या योग्यच आहेत. तशा प्रकारे लोणावळा येथे अतिशय दुर्दैवी घटना घडल्यानंतर जे आंदोलन झाले त्यामधील नागरिकांवर कलम 395 अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्या गुन्ह्यांचा पुनर्विचार आपण करणार आहात का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या घटनेचे दोन भाग आहेत. लोणावळा येथे वेगवेगळी आंदोलने झाली. काही लोकांनी शांततेने आंदोलन केले, त्यांचा निश्चितपणे विचार केला जाईल. परंतु, सीसीटीव्ही फुटेजमध्ये असे दिसून येत आहे की, काही लोकांनी ड्रॉवर फोडून रोख रकमा लुटल्या, टी.व्ही.संच काढून नेले. अशा आंदोलकांवरील खटले परत घ्यावेत, अशा प्रकारची मागणी कुणीही करणार नाही. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे, त्यानुसार मेरिटप्रमाणे तपासून, जे निकषात बसतील त्यांच्यावरील गुन्हे परत घेण्यात येतील. परंतु, ड्रॉवर फोडून रोख रकमा लुटणे, टी.व्ही.संच काढून नेणे, अशा सारख्या आंदोलकांवरील गुन्हे परत घेता येणार नाहीत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या उत्तरात असे नमूद केले आहे की, "सार्वजनिक मालमत्तेची रुपये 5 लक्ष पेक्षा जास्त रकमेची हानी झालेली नाही, असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2909.....

श्रीमती विद्या चव्हाण.....

खटले मागे घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केली आहे." आज आंदोलनांबाबत अशी परिस्थिती आहे की, मीडियाला बोलवायाचे, तोडफोड करायची आणि मिरवायचे. 5 लक्ष रुपयांपेक्षा जास्त रकमेची हानी झालेली नाही, असे म्हणून जे खटले मागे घेण्यात येणार आहेत, त्यामुळे चुकीचा पायंडा पडण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2909...

श्रीमती विद्या चव्हाण...

एस.टी.महामंडळाच्या बसेस जाळणे व त्यांची तोडफोड करणे अत्यंत चुकीचे आहे. गाडी उलटी करणे, दुधाचे टँकर उलटे करणे हे अत्यंत चुकीचे आहे. शुटिंग करण्यासाठी ही आंदोलने केली जातात. अशा लोकांवरील गुन्हे माघे घेण्याची चुकीची प्रथा पाडण्यात येत आहे. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी फेरविचार करावा अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे सेक्शन 498-अ महिला अत्यांचाराबाबत आहे, यामध्ये अनेक प्रकारे म्हातारे सासू सासरे यांच्यावर केसेस नोंदविल्या जातात. याबाबत देखील व्हेरिफिकेशन करण्यात येणार आहे काय ? आंदोलन करायचे असेल तर ते सच्चाईने केले पाहिजे. दगड हातात घेणे, हिंसा करणे, मारहाण करणे अशा प्रकारच्या गुन्ह्यातील केसेस मागे घेतल्या तर या प्रकाराला आंदोलन म्हणता येणार नाही. हल्ली मीडियासमोर शोबाजी करण्यासाठी आंदोलने केली जात आहेत. अशी आंदोलने करण्यासाठी आपण प्रोत्साहन देत आहात याचे भान सरकार ठेवणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी अतिशय चांगली सूचना मांडली आहे. 2005 मध्ये शासन निर्णय काढण्यात आला होता तेव्हा पासून 5 लाख रुपयांची मर्यादा आहे. ही मर्यादा या शासनाने वाढविली नाही. पाच लाख रुपयांची मर्यादा असताना त्या पेक्षा कमी नुकसान झाले असेल तर त्या आंदोलकांना तसेच सोडण्यात येणार नाही. त्यामध्ये अशी तरतूद आहे की, त्यांच्याकडून हे पैसे वसूल केले जाणार आहेत, पैसा वसूल केल्यावर संबंधितांवरील गुन्हे परत घेतले जाणार आहेत. पाच लाख रुपयाच्या आतील गुन्हे परत घेत असताना त्यांच्याकडून पैसे वसूल करुन घेतल्यावर गुन्हे काढून घेण्यात येतील. पाच लाख रुपयाच्यांवर नुकसान असेल तर गुन्हे परत घेतले जाणार नाहीत.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, लोकप्रतिनिधीवर काही गुन्हे दाखल झाले आहेत, हे लोक गुन्हेगार नाहीत. त्यांच्या प्रतिक्रिया उमटलेल्या असतात. हे गुन्हे किती दिवसात मागे घेण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2909...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, गुन्हे मागे घेण्याची पध्दत तयार करण्यात आली आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात मी सांगितले आहे की, शासन निर्णय निघाल्यानंतर हे गुन्हे तातडीने मागे घ्यावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत, याबाबत कार्यवाही सुरु झाली आहे. पुन्हा सूचना देऊन प्रत्येक महिन्याला या विषयी आढावा घेतला जाईल.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुणे शहरामध्ये नदी सुधार योजनेंतर्गत सुयश ट्रिटमेंट प्लान्टबाबत

(४) * ३२०३ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे: सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये नदी सुधार योजनेंतर्गत सुयश ट्रिटमेंट प्लान्टसाठी अंदाजे ८०० कोटी रुपयांची योजना राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यात आली असून नॅशनल रिव्हर डेव्हलमेंट कॉर्पोरेशनने जपानच्या जायका कंपनीसोबत अत्यल्प व्याजदराने कर्ज मिळविण्यासाठी चर्चा सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा प्रकल्प मंजूर होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार आहे काय,
(३) असल्यास, ही योजना कधी पर्यंत मंजूर होईल तसेच याबाबत राज्य शासन व पुणे महानगरपालिकेने काही कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय,
(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस :

(१) पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरातील संपूर्ण मैला पाण्यावर प्रक्रिया करुन ते नदीत सोडण्यासाठी रुपये ७१५.०५ कोटीची योजना तयार करण्यात आली. सदर योजना पर्यावरण विभागाच्या शिफारशीसह दिनांक २१.५.२०१२ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मान्यतेसाठी सादर केलेली आहे.
सदरच्या योजनेकरीता केंद्र शासनाचे EFC (Expenditure & Finance Committee) ची मंजुरी अंतिम टप्प्यात असून, या योजनेअंतर्गत मान्य प्रकल्पीय रक्कमेच्या ८५ % टक्के रक्कम जपान सरकारच्या जायका या संस्थेकडून केंद्र शासनास अल्पशा दराने कर्ज स्वरुपात उपलब्ध होणार आहे. सदरची संपूर्ण रक्कम केंद्र शासनाकडून पुणे महानगरपालिकेला अनुदान स्वरुपात मिळणार आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पास जायका या संस्थेतर्फे फॅक्ट फायडींग मिशन अंतर्गत दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ ते दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत भेट देण्यात आली. त्यावेळी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे बरोबर जायका संस्थेच्या प्रतिनिधीसोबत समक्ष भेट व चर्चा झाली.
(२) होय. प्रकल्प मंजूर होण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरु आहे.
(३) सदरच्या योजनेकरिता केंद्र शासनाचे EFC (Expenditure & Finance Committee) ची मंजुरी अंतिम टप्प्यात असून, माहे मार्च २०१५ अखेर भारत सरकार व जपान सरकार यांचे दरम्यान करारावर स्वाक्षरी होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पुणे शहर पेन्शनर लोकांचे समजले जाते. पुणे शहराला विद्येचे माहेरघर म्हणतात. पुणे शहराला आता आयटी हब म्हटले जाते. पुणे शहरातील नदीत मैला मिश्रित पाणी सोडल्यामुळे तेथील लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. गेल्या 10 ते 12 वर्षापासून 800 कोटी रुपयांचा सिवरेज ट्रीटमेंट प्लान्ट प्रलंबित होता. नदी सुधार योजनेमध्ये हा प्लान्ट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3203...

श्रीमती दिप्ती चवधरी...

घेण्यात आला होता. ही योजना केव्हा होणार असा प्रश्न मी विचारला होता. केंद्र शासनाने एक्स्पेडिंचर व फायनान्स कमिटीकडे अंतिम मंजुरीसाठी प्लान्टचा प्लॅन दिलेला आहे, असे आपण उत्तरात नमूद केले आहे. या प्लान्टला सरकारने मंजुरी दिली असून जपानकडील जायका या कंपनीकडून कर्ज घेण्यात येणार आहे. 85 टक्के रक्कमेचे अनुदान पुणे महानगरपालिकेला देण्यात येणार आहे. 15 टक्के हिस्सा महानगरपालिकेचा राहणार आहे. पुणे शहरातील लोकांचा प्रश्न मार्गी लागणार असल्यामुळे मुख्यमंत्री महोदयांचे मी आभार मानते. या कामाची प्रत्यक्ष सुरुवात केव्हा होणार आहे, या योजनेमुळे 100 टक्के पाणी स्वच्छ होणार आहे कायख या योजनेसाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यासंदर्भातील डीपीआर तयार करण्यात आला आहे. भारत सरकार व जायका कंपनीकडून ॲग्रीमेंट करण्यात येणार आहे. जायका ही जपानची फंडिंग एजन्सी आहे. 30 मार्च रोजी सकाळी 11 वाजता ॲग्रीमेंट करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. जायका कंपनीकडून केंद्र सरकार कर्ज घेणार आहे, प्रोजेक्ट किंमतीच्या 85 टक्के अनुदान पुणे महानगरपालिकेला दिले जाणार आहे. यासंदर्भातील प्रत्यक्ष कामाला सुरुवात डिसेंबर 2015 मध्ये करण्यात येईल असे डीपीआर नुसार ठरविण्यात आले आहे. या प्रोजेक्टचा कालावधी तीन वर्षाचा आहे, डिसेंबर 2018 पर्यंत हे काम पूर्ण करायचे आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नदी सुधार योजनेअंतर्गत अतिशय महत्वाचा पथदर्शी प्रकल्प महाराष्ट्रात होणार आहे. पुणे शहरातील कामाच्या खर्चासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळणार आहे. त्याचप्रमाणे इतर महानगरपालिकांच्या हद्दीतून जाणाऱ्या नद्यांच्या प्रदूषणाबाबत शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. राज्य पातळीवर सर्व नद्यांच्या प्रदूषणासाठी काही विशेष योजना तयार करण्यात येईल काय ? स्थानिक महानगरपालिकांच्या सहभागातून ही योजना करण्यात यावी. माझ्यासमोर आता नाशिक येथील गोदावरी नदीचा प्रश्न आहे. पुणे शहरासाठी जसा प्रकल्प तयार करण्यात आला आहे तसे महाराष्ट्रातील सर्वच महत्वाच्या शहरांसाठी योजना करण्याचा शासन विचार करणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3203...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नदी कृती कार्यक्रमा अंतर्गत अनेक नद्यांचे प्रदूषण दूर करण्यासाठी केंद्र शासनाकडे विनंती करण्यात येणार आहे. त्या संदर्भातील कार्यक्रम केंद्र सरकारने हातात घ्यावा. आता ज्या नद्या प्रदूषित होत आहेत याचे कारण 90 टक्के प्रदूषण आहे. नगरपालिकांमधील सिवरेज त्यामध्ये जात असल्यामुळे नद्या मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहेत. महानगरपालिका, नगरपालिका किंवा शहरांच्या सांडपाण्यावर जोपर्यंत प्रक्रिया करणार नाही तोपर्यंत नद्या स्वच्छ करु शकत नाही. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत या कामावर भर देण्यात आला आहे. घनकचरा व्यवस्थापनासोबत सांडपाण्यावर प्रक्रिया करावयाची आहे. आता पुणे शहराचा प्रश्न आपल्या समोर आहे, यामध्ये फक्त पुणे महानगरपालिकेचा समावेश नसून या महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर प्रदूषण होत आहे. मुठा नदीच्या अप स्किमला कोपरे, खडकवासला, शिवनेर, नांदेड, किरकिटवाडी कोंडवा, कोंडवे-भागडे, अहिरे या गावातून मोठे प्रदूषण होत आहे. अशाच प्रकारे गोदावरी नदीचे देखील आहे. वेगवेगळ्या ठिकाणावरुन प्रदूषित पाणी नदीत येते. त्यामुळे गोदावरी नदीच्या संदर्भात देखील अशा प्रकारचा कार्यक्रम पर्यावरण विभागाच्या विचाराधीन आहे. नदी कृती कार्यक्रमाच्या अंतर्गत हा कार्यक्रम केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल. राज्य सरकार देखील अशा प्रकारच्या योजनेचा विचार करीत आहे. यासाठी जास्त निधी लागणार आहे. सुस्थातीला महत्वाच्या नद्यांसाठी कार्यक्रम आखण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेसंदर्भात हा प्रश्न असला तरी पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महानगरपालिकांसह मुख्यमंत्री महोदयांनी उल्लेख केल्याप्रमाणे अनेक गावांचे पाणी उजनी नदीत जाते त्यामुळे त्या मार्गावरील सर्व गावांना प्रदूषित पाणी प्यावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. हा प्लान्ट करीत असताना मुख्यमंत्री महोदयांनी ग्रामीण भागाचा उल्लेख केला आहे. तसेच पिंपरी-चिंचवडमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सरकारने काय पावले उचलली आहे. असे केले नाही तर अर्धवट स्वरुपात जल शुध्दीकरणाचा कार्यक्रम राबविला जाईल याकडे शासन लक्ष देईल का असा माझा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3203...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आता डीपीआर तयार करण्यात आला आहे. यामध्ये 396 एमएलडी क्षमता तयार करण्यात येत आहे. यावर शुध्दीकरण केंद्र आहे, बॉटनिकल गार्डन येथे 10 एमएलडी, बानेर येथे 25 एमएलडी, वारजे येथे 28 एमएलडी, वडपे येथे 26 एमएलडी, तानाजी वाडी येथे 15 एमएलडी, नायडू येथे 127 एमएलडी, धानोरी येथे 33 एमएलडी भैरवाल येथे 75 एमएलडी, मुंढवा येथे 20 एमएलडी, खराडी येथे 30 एमएलडी व मत्स्यबीज केंद्राच्या ठिकाणी 7 एमएलडी अशा प्रकारचा हा डीपीआर आहे. पुणे महानगरपालिकाचा विचार करता या शहरात एकूण सांडपाणी 744 एमएलडी तयार होत आहे. पुणे महानगरपालिकेची एकूण प्रक्रिया क्षमता 567 एमएलडी इतकी आहे. सन्माननीय सदस्या यांनी पिंपरी-चिंचवडबाबत प्रश्न उपस्थित केला आहे.सर्वच महानगरपालिकांना अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी सिवरेज ट्रीटमेंटच्या संदर्भात क्षमता उभी करावी, राज्य सरकार यासाठी मदत करणार आहे. केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या योजना आहेत. या योजनेअंतर्गत अशा प्रकारे प्लॅन तयार करता येतील. पिंपरी-चिंचवड येथे देखील अशा प्लान्टबाबत पुढील कार्यवाही करावी, अशा प्रकारचे निदेश देण्यात येतील.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3203.....

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, या प्रकल्पाची किंमत 800 कोटी रुपये आहे. हा प्रकल्प सादर होऊन आता बरेच दिवस झालेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आता या प्रकल्पाची किंमत किती झालेली आहे ? तसेच, अनेक छोट्या शहरांनी भुयारी गटार योजना आणि पाणी शुद्धी करणाचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केलेले आहेत. केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु शहर पुनर्निर्माण अभियान सुरु केले होते. आता हे अभियान बंद झालेले आहे काय आणि असल्यास ते अभियान पुन्हा सुरु करण्यात येणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आता या प्रकल्पाची पुनर्गणित किंमत 1181.20 कोटी इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. जवाहरलाल नेहरु मिशन अंतर्गत ज्या योजना मंजूर होत्या त्या योजनांसाठी निधी मिळालेला आहे. त्यानंतर हे मिशन बंद झालेले आहे. आता त्यातील ज्या योजना पूर्ण झालेल्या नाहीत त्या संदर्भात आपण केंद्रीय नगर विकास मंत्री महोदयांना विनंती केलेली आहे की, तेवढ्या योजनांपुरते मिशन हाती घेऊन त्या योजना आम्हाला पूर्ण करुन द्याव्यात. त्यांनी आपल्याला सांगितलेले आहे की, कोणत्या तरी योजनेच्या अंतर्गत त्या योजना बसविण्यात येतील. आता केंद्र शासन नवीन योजना तयार करीत आहे. त्या योजनेच्या अंतर्गत अशा प्रकारचे कार्यक्रम घेता येतील.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आरे कॉलनी (गोरेगांव, मुंबई) येथे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यासाठी मोठ्या प्रमाणात करावी लागणारी वृक्षतोड

(५) * ३८११ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी, ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यासाठी कुलाबा ते सीप्झ या भुयारी मेट्रोचा कार डेपो आरे कॉलनी (गोरेगांव, मुंबई) येथे उभारण्याची बाब मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावाकरिता ३२९२ झाडे तोडावी लागणार असल्याचे मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील एकूणच झाडांची संख्या कमी होत असतांना आरे कॉलनीसारख्या हिरव्यागार पट्टयाचा विनाश होऊ नये म्हणून स्थानिक नागरिकांनी तसेच वनशक्ती संस्थेने झाडे तोडण्यास विरोध करून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर झाडाचे जतन व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सदरहू ठिकाणी कार डेपोच्या प्रस्तावित विकासातंर्गत २२९८ झाडे बाधित होत असून केवळ २५४ झाडे तोडणे व उर्वरीत २०४४ झाडांचे पुनर्रोपण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर झाडांचे जतन व्हावे यासाठी एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीने सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करुन त्यांचा शिफारस अहवाल शासनास सादर करण्याचे अपेक्षीत आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आता मुंबई शहर दिवसेंदिवस कॉंक्रीटचे जंगल होत चालले आहे. आपण बघतो की, काही जुन्या झाडांना कीड लागते आणि ती झाडे मरतात. आपण एमएमआरडीए क्षेत्रात आणि वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स क्षेत्रात देखील हे बघितले आहे. मेट्रो-3 हा महत्वाचा प्रकल्प आहे. परंतु, या प्रकल्पाच्या कारशेडसाठी आपण जवळपास 2,298 झाडांची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3811.....

श्री.प्रकाश बिनसाळे.....

कत्तल करणार आहोत. माझा प्रश्न असा आहे की, जी 254 झाडे कायम स्वरूपी नष्ट होणार आहेत ती झाडे किती वर्षे जुनी आहेत, त्या झाडांचे वयोमान किती आहे याचे सर्व्हेक्षण झालेले आहे काय ? तसेच, ज्या 2044 झाडांचे पुनर्रोपण करण्याचे ठरविण्यात आले आहे ते पुनर्रोपण कोठे करण्यात येणार आहे आणि त्यासाठी जागा उपलब्ध आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, आता पर्यंत मुंबई शहरात महानगरपालिकेच्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टसाठी ट्री ॲथॉरिटीच्या परवानगीने जी झाडे काढण्यात आली त्या झाडांचे पुनर्रोपण करण्यात येईल, असे सांगण्यात आले. मग अशी किती झाडे काढण्यात आली, त्या झाडांचे पुनर्रोपण कोठे केले गेले, ते पुनर्रोपण किती यशस्वी झाले आणि त्याची टक्केवारी काय आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मेट्रोचे जे कारशेड तयार करावयाचे आहे त्यामध्ये एकूण 2298 झाडे बाधित होत आहेत. त्यापैकी 2044 झाडांचे पुनर्रोपण करावयाचे आणि 254 झाडे तोडावयाची, असा कार्यक्रम आहे. जी 254 झाडे पूर्णपणे तोडावयाची आहेत त्या झाडांचे वयोमान किती आहे, याबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु त्या संदर्भात जे ट्री ॲथॉरिटी प्राधिकरण आहे त्यांच्याकडे त्याबाबत प्रस्ताव सादर करून त्यांनी सुचविल्याप्रमाणे 254 झाडांच्या ऐवजी त्याच ठिकाणी 800 झाडे लावावयाची असा निर्णय झालेला आहे. दुसरे म्हणजे, 2044 झाडांचे पुनर्रोपण करावयाचे आहे. जो मूळ प्रस्ताव आहे त्या प्रस्तावाप्रमाणे त्या झाडांचे पुनर्रोपण देखील तेथेच करावयाचे आहे आणि साधारणपणे सेम सॉईलमध्ये पुनर्रोपण केले तर त्या झाडांचा जवळपास 90 ते 100 टक्के जगण्याचा रेश्यो असतो. त्या झाडांचे बाहेर पुनर्रोपण केले तर तो रेश्यो थोडासा कमी होतो. परंतु, हे सर्व होत असताना मुंबईतील जनतेची अपेक्षा अशी आहे की, ज्या ग्रीन स्पेस आहेत ती मुंबईची फुफ्फुसे आहेत. त्यामुळे येथील झाडे तोडली जाऊ नयेत. म्हणून सध्या हा संपूर्ण प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला आहे आणि एक तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्या तज्ज्ञ समितीला जे मॅन्डेड दिलेले आहे, त्यामध्ये हा कार डेपो अन्यत्र

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करता

ता.प्र.क्र.3811.....

श्री.देवेंद्र फडणवीस.....

येईल काय, या संदर्भातील जागा त्यांनी शोधावी अशा प्रकारचे देखील मॅन्डेड त्यांना देण्यात आलेले आहे. त्यांच्याकडून ज्या सूचना येतील त्या सूचना आल्यानंतर या संदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाला दिलेले लेखी उत्तर वेगळे आहे आणि आता मुख्यमंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे. लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे की, ही तज्ज्ञ समिती केवळ झाडांच्या संदर्भात आहे आणि आपण आता सांगितले की, ही झाडे अन्यत्र हलवायची किंवा नाही, याचे मॅन्डेड त्यांना दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, तेथील कार डेपोसाठी मुंबईतील जनतेचा विरोध आहे तो आपण मान्य करणार आहात काय आणि हा कार डेपो रेस कोर्स, गोदी किंवा नो डेव्हलपमेंट झोनमध्ये हलविण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, समितीला अतिशय स्पष्टपणे मँडेड दिलेले आहे की, हा कार डेपो अन्यत्र कोठे होऊ शकतो काय याची देखील पडताळणी या समितीने करावयाची आहे. आपण ज्या तीन जागा सुचविलेल्या आहेत त्या तीन जागांची देखील तडताळणी करण्यात येईल. त्या व्यतिरिक्त समितीला आणखी कोणती जागा आढळली तर ती शोधावी. कारण, हे कारशेड कोठे होऊ शकते या संदर्भात आता बऱ्याच सूचना आलेल्या आहेत. आपण मेट्रो कोठून कोठपर्यंत नेऊ शकतो आणि कारशेडची आवश्यकता कोठे आहे, हे तांत्रिक दृष्ट्याच ठरवावे लागेल. म्हणून यासाठी समितीने पर्यायी जागा सुचवावी, असे त्या समितीला सांगण्यात आले आहे. आपण ज्या जागा सुचविल्या किंवा अन्य लोकांनी ज्या सूचना दिलेल्या आहेत त्या प्रत्येक जागेची पडताळणी केली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, मी आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, आपण आरे कॉलनीतील जी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जागा डिमार्क केली होती त्या ठिकाणी आता भरणीचे काम सुरु होत आहे. त्या ठिकाणी आपण जी

ता.प्र.क्र.3811.....

श्री.भाई जगताप.....

जागा डिमार्क केली त्या जागेवर आता बांधकाम सुरु आहे. असे असताना आपण सांगत आहात की, आम्ही दुसरी जागा बघत आहोत तर ते कसे काय ? आपल्याला हे ज्ञात असेलच. कारण अधिकारी आपल्याला माहिती देतात. परंतु, अधिकारी पूर्णपणे माहिती देत नाहीत, असा आमचा नेहमी आरोप असतो. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की, आता पर्यंत पुनर्रोपण केलेली झाडे किती जगली ? आपण त्याचे उत्तर असे दिले की, पुनर्रोपण केलेली झाडे 90 ते 95 टक्के जगतात. परंतु, त्या उलट पुनर्रोपण केलेली 90 ते 95 टक्के झाडे मेलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्याच ठिकाणी त्या झाडांचे पुनर्रोपण करण्यात येईल, असे आपण सांगितले. मी त्या भागातून निवडणूक लढविली. मी त्या भागात काम करतो. त्यामुळे मी दिलेली माहिती अधिकृत समजून आपण यामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे. माझा प्रश्न असा आहे की, 3 एकर जागेच्या पट्टयात 2044 झाडांचे पुनर्रोपण कसे काय होणार आहे ? ही सर्व झाडे मोठी आहेत. ही झाडे छोटी नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी या झाडांचे वयोमान किती आहे, असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. कारण, एकेकाळी तेथे जंगलच होते. तो आदिवासी भाग आहे. म्हणून 3 एकर जागेत 2044 झाडांचे कशा प्रकारे पुनर्रोपण करण्यात येणार आहे ? मुख्यमंत्री महोदय, हे खूप गांभीर्याने घेतले पाहिजे. कारण, आपण ज्या फुफ्फुसाचा उल्लेख करतो त्या झाडांचे जर कागदोपत्रीच पुनर्रोपण झाले तर ते योग्य होणार नाही. म्हणून या संदर्भात आपण काही पावले उचलणार आहात काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले की, सेम सॉईलमध्ये झाडांचे पुनर्रोपण केले तर ती झाडे जगण्याचा रेश्यो जास्त असतो. यापूर्वी सेम सॉईलमध्ये झाडांचे पुनर्रोपण झाले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नाही. म्हणून मी या अगोदरच्या झाडांच्या पुनर्रोपणाच्या संदर्भात 90 टक्के झाडे जगण्याचा क्लेम

ता.प्र.क्र.3811.....

श्री.देवेंद्र फडणवीस.....

केलेला नाही. आपण जी वस्तुस्थिती सांगितली ती देखील तपासून पाहण्यात येईल. परंतु, आता माझ्याकडे जी माहिती आहे त्या माहितीनुसार जो प्लॅन ट्री ॲथॉरिटीकडे सादर होत आहे त्या प्लॅनमध्ये त्या झाडांचे तांत्रिक दृष्ट्या कसे पुनर्रोपण करावयाचे, त्यासाठी किती जागा लागेल या सर्व गोष्टींचा आढावा घेण्यात आलेला आहे. तरी देखील आपण जे सांगितले ते देखील तपासून पाहण्यात येईल. मी त्याही पलीकडे जाऊन सांगितले की, यासाठी पर्यायी जागा कोठे मिळू शकते काय या संदर्भात आपण समितीला स्पष्टपणे निदेश दिलेले आहेत. त्या समितीचा जो काही अहवाल येईल त्यानंतरच यावर चर्चा करणे योग्य ठरेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी जो प्रश्न विचारला त्याला माझा पूर्णपणे विरोध आहे. ज्या ठिकाणी प्रोजेक्ट होतात तेथील झाडे तोडावीच लागणार आहेत. तुम्ही त्या झाडांचे पुनर्रोपण करा, वृक्षारोपण करा, हा वेगळा विषय आहे. मुंबई-गोवा महामार्गासाठी जी झाडे तोडावयाची आहेत त्यासाठी वन विभागाकडून मागील 6 वर्षापासून परवानगी मिळत नाही. ज्या ठिकाणी शासकीय योजना करावयाची आहे, शासकीय इन्फ्रास्ट्रक्चर चे प्रोजेक्ट करावयाचे आहेत आणि जे दैनंदिन गरजेचे प्रोजेक्ट आहेत म्हणजे रस्ते, वीज यासाठी झाडे तोडावयाची असतील तर ती झाडे तोडण्यासाठी परवानगी घेण्याची आवश्कता नाही, असा धोरणात्मक निर्णय राज्य शासन घेणार आहे काय ?

यांनतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3811.....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, असा निर्णय घेणे योग्य होणार नाही. माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे ती विचारात घेता मी हे सांगू इच्छितो की, आज जगामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर क्रिएट करीत असताना पर्यावरणाचे संवर्धन करण्याकरिता वेगवेगळ्या पध्दतीचा अवलंब केला जातो. त्यामुळे सहा-सहा वर्षे प्रकल्प प्रलंबित राहू नये यासाठी कसा पाठपुरावा करता येईल, काय व्हायबल होईल, जगाने कशा प्रकारचा मार्ग स्वीकारला आहे त्या दृष्टिकोनातून या प्रकल्पाला चालना देण्यात येईल.

सभापती : ठीक आहे.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुणे शहराच्या प्रस्तावित रिंगरोडचे काम अतिशय धीम्या गतीने सुरू असल्याबाबत

(6) *३२९२ **श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहराच्या प्रस्तावित रिंगरोडचे काम अतिशय धिम्या गतीने सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पुणे येथील उच्च क्षमता द्रुतगती प्रकल्पांतर्गत वर्तुळाकर मार्गाच्या (एच.सी.एम.टी.आर.) आखणीची सुमारे ३२ किलोमीटर मार्गाची प्रक्रिया पूर्ण झाली असून या रस्त्यासाठी लागणाऱ्या सुमारे ७६ हेक्टर जागेपैकी केवळ ३० टक्के जागा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत, या प्रकल्पासाठी संरक्षण व कारागृह विभागाने जागा देण्यास नकार दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, रिंगरोडचे काम जलद गतीने सुरू करण्यासाठी भूमी संपादन करून प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे शहराच्या उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू असून, पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर टप्याटप्याने रस्ता विकसित करण्याचे काम सुरू आहे.

(2) उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) या प्रकल्पासाठीच्या सुमारे ३३.८० किलोमीटर मार्गाची आखणीची प्रक्रिया पूर्ण झालेली असून, या रस्त्यासाठी लागणा-या सुमारे ६८.०३ हेक्टर जागेपैकी २१ टक्के जागा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

या प्रकल्पासाठी संरक्षण व कारागृह विभागाने जागा देण्यास नकार दिल्याने, सदर भागातील रस्त्याचे अलाईनमेंट बदलण्यासाठीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या नियोजन समितीकडे दाखल केलेला आहे.

(3) उच्च क्षमता द्रुतगती मार्गासाठीच्या एकूण ६८.०३ हेक्टर क्षेत्रापैकी १४.०७ हेक्टर क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असून, त्यावर रस्ता विकसित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

२८.४७ हेक्टर जागा शासनाच्या विविध विभागाशी संबंधीत असून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागांकडे पाठविण्यात आलेले आहेत. सदर क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरू आहे.

तसेच २५.४९ हेक्टर जागा खाजगी असून त्यापैकी १५.८१ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचे कडे सादर केले असून त्यांच्या कार्यालयामार्फत सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही सुरू आहे. सदर खाजगी क्षेत्रापैकी ९.६८ हेक्टर क्षेत्राचे टप्याटप्याने भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू आहे.

(4) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, पुण्यामध्ये जे रिंग रोड प्रस्तावित आहेत त्यापैकी हा एक रिंग रोड आहे. वृत्तपत्रात अशा बातम्या प्रसिध्द झाल्या की, हा रिंग रोड रद्द करण्यात येत आहे. या प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरु आहे हे खरे आहे काय? उत्तरामध्ये याबद्दल काहीही भाष्य केलेले नाही. फक्त आकडेवारी देण्यात आली आहे. फक्त 21 टक्के जागा महापालिकेच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) R.3

SGB/ KTG/ MMP/ AKN/ AKN/ 12:50

ता.प्र.क्र.3292.....

श्री.अनंत गाडगीळ.....

ताब्यात आलेली असून 68 हेक्टर जागेपैकी 14 हेक्टर महापालिकेकडे आणि 28 हेक्टर जागा सरकारी विभागांकडे आहे. ही संपूर्ण जागा केव्हा संपादित केली जाईल आणि हा प्रकल्प केव्हा पूर्ण होईल?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण हा प्रश्न राखून ठेवावा. याचे कारण असे की, दुर्दैवाने माझ्याकडे सहाव्या क्रमांकासाठी जे ब्रिफिंग आले ते दुसऱ्याच प्रश्नाचे आहे. या प्रश्नाचे उत्तर मी माझ्या बुध्दिचातुर्यानुसार देऊ शकतो. पण ते योग्य होणार नाही. चुकीचे उत्तर माझ्याकडे का आले याची मी चौकशी करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

भगवानगडावर (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील दर्शनासाठी आलेले महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांच्या वाहनांच्या ताफ्यावर झालेली दगडफेक

(७) * **३४०७ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतीश चव्हाण, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भगवानगडावर (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथे दर्शनासाठी आलेले महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांच्या वाहनांच्या ताफ्यावर काही जणांनी दगडफेक करुन हल्ला केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दगडफेक करुन हल्ला करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.राम शिंदे, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता : (१) महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांचे वाहन ताफ्यावर काही अज्ञात इसमांनी दगडफेक केली होती.

(२) व (३) होय, तपासात दगडफेक करणाऱ्या अज्ञात इसमांवर पाथर्डी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ३/२०१५ भादंवि कलम ३३६, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ते निष्पन्न करण्यासाठी तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते भगवानगडावर दर्शनासाठी गेले होते. विरोधी पक्षनेता कोण आहे यापेक्षा त्या पदाला अधिक महत्व दिले जाते. आजपर्यंत या घटनेतील आरोपींना अटक झालेली नाही. घटनेच्या दुसऱ्या दिवशी माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले होते. त्यांच्याकडून जी संवेदना दाखविली जाणे अपेक्षित होते ती त्यांनी दाखविली नाही. त्यांनी खेद सुध्दा व्यक्त केला नाही. तेथे राजकीय सभा नव्हती. दर्शन घेण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेते गेले होते. विरोधी पक्षनेता पदाला या राज्यामध्ये विशेष महत्व आहे. तीन महिन्याचा कालावधी होऊनही अद्याप आरोपींना अटक झालेली नाही. विरोधी पक्षनेत्यांचा जबाब सुध्दा नोंदविण्यात आलेला नाही. या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करुन संबंधित दोषी पोलीस अधीक्षकांना निलंबित करणार आहात काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, दिनांक 5 जानेवारी, 2015 रोजी ही घटना घडली होती. भगवानगडावर सप्ताहाचे आयोजन केले होते. तेथे पुरेसा पोलीस बंदोबस्त दिला होता. माननीय विरोधी पक्षनेते भगवानगडावर जात असताना तेथे 20 ते 25 हजाराचा जमाव आला होता. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) R.4

SGB/ KTG/ MMP/ AKN/ AKN/ 12:50

ता.प्र.क्र.3407.....

प्रा.राम शिंदे.....

घटनेची सर्वतोपरी चौकशी करण्यात आली. विरोधी पक्षनेत्यांनी जरी केस दाखल केलेली नसली तरी सरकारच्या माध्यमातून केस दाखल करण्यात आली आहे. मॉबकडून झालेल्या प्रकारामुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही, धक्काबुक्की झालेली नाही. सगळी कसून चौकशी सुरु आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री अतिशय विसंगत पध्दतीचे उत्तर देत आहेत. त्यांनी सांगितले की, पुरेसा बंदोबस्त ठेवला होता. 20 ते 25 हजाराचा मॉब आला होता, त्यामुळे त्यांना नियंत्रित करता आले नाही. चोख बंदोबस्त ठेवला म्हणजे काय केले होते? कोणत्याही पध्दतीची धक्काबुक्की झाली नाही असे सांगण्यात आले. माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या गाडीवर दगडफेक झाल्याचे मान्य केले आहे. धक्काबुक्की झाली नाही याचे जर समर्थन करणार असाल तर ते योग्य आहे असे वाटत नाही. या राज्यामध्ये सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, स्व.गोपीनाथ मुंडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, एकनाथराव खडसे हे विरोधी पक्षनेता होते. श्री.धनंजय मुंडे हे सुध्दा या सार्वभौम सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेता आहेत. त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी सरकारची आहे. विरोधी पक्षनेत्यांचा आवाज दाबण्यासाठी कट कारस्थान होते की काय अशी लोकांच्या मनामध्ये शंका निर्माण होत आहे. कारण तीन महिने उलटूनही या घटनेतील आरोपींना अटक झालेली नाही. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करावे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते भगवानगडावर गेल्यानंतर जी घटना घडली त्याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणी नारेबाजी झाली. एक दगड देखील फेकण्यात आला, तो दगड विरोधी पक्षनेत्यांच्या गाडीच्या मागील काचेवर आदळला आणि काच क्रॅक झाली. त्यानंतर मी स्वत: विरोधी पक्षनेत्यांशी बोललो. मी पोलीस अधीक्षक, आय.जी. यांच्याशी बोललो. तेथील वातावरण बिघडू नये या दृष्टीने त्यांना तातडीने आदेश दिले. कारण नारेबाजी झाली तर ॲक्शन रिॲक्शन होऊन परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ शकते. म्हणून पोलिसांनी इव्हॅक्यूएशनचा रूट तयार केला होता, तेथून विरोधी पक्षनेत्यांना बाहेर काढले. मात्र या सगळ्या घटनेमध्ये मॉबमधून दगड आलेला असल्यामुळे नेमकी व्यक्ती आयडेंटीफाय होऊ शकलेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नाही. पोलीस अधीक्षकांना स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, या संदर्भात कारवाई करावी. माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या सुरक्षेची जबाबदारी राज्य शासनाची आहे. राज्य शासन त्यामध्ये कोणतीही

...5..

कमतरता पडू देणार नाही. राज्य शासन आवश्यक असेल तेवढी पूर्ण सुरक्षा विरोधी पक्षनेत्यांना देईल, हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, दगड कोणी फेकला ही व्यक्ती आयडेंटीफाय झालेली नाही. त्या काळात या घटनेकरिता प्रोत्साहन देणारे भाषण सोशल मीडियावर झळकत होते. त्यानंतरच ही घटना घडली आहे. सोशल मीडियावर भाषण झळकत होते, त्यामुळे किमान जबाब नोंदवून घेऊन चौकशी केली जाईल काय? माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आरक्षणाच्या संदर्भात सभागृहात उल्लेख केला म्हणून त्यांच्या मोबाईलवर फोन करुन त्यांना तुमचा मुडदा पाडू अशी धमकी देण्यात आली. तो मोबाईल नंबर कळूनही अद्याप संबंधिताची चौकशी झालेली नाही. आदेश देऊनही माननीय विरोधी पक्षनेत्यांना सुरक्षेच्या कारणास्तव एस्कॉर्ट किंवा पायलट कार पुरविण्यात आलेली नाही. मी स्वतः आय.जी. आणि एस.पी.यांना लेखी विनंती केली. सदरचा घटनाक्रम पाहता विरोधी पक्षनेत्यांना झेड दर्जाची सुरक्षा पुरविण्यात यावी.

नंतर एस.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3407...

श्री.अमरसिंह पंडित....

हा विषय फार गंभीर आहे. त्यामुळे माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, सगळा घटनाक्रम पाहता माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अधिकची सुरक्षा वाढवून देण्यासंबंधी तातडीने कारवाई करणार आहात काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या सुरक्षेचे पुन्हा ऑडिट करण्यासंबंधी सांगण्यात येईल. सुरक्षा देण्यासंबंधात गाईडलाईन्स आहेत. तत्पूर्वी सुरक्षेचे ऑडिट करावे लागते. आता पुन्हा नव्याने ऑडिट केले जाईल व जे थेट परसेपशन असेल त्यानुसार जे देय असेल त्याप्रमाणे 100 टक्के सुरक्षा ही दिली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा राजकीय प्रश्न नाही. विरोधी पक्ष नेता हे घटनात्मक पद आहे. त्या पदावर व्यक्ती कोण बसली आहे हा प्रश्न नाही. तत्संबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी केला आहे. आपण पुन्हा विरोधी पक्ष नेत्याच्या सुरक्षेचे ऑडिट करणार आहात त्याचे आम्ही स्वागत करतो. येथे सोशल मीडियाचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. फोन नंबर सहित त्यांना धमकी देण्यात आली आहे. त्याची चौकशी देखील अद्यापपर्यंत झालेली नाही. त्याचे काय झाले हे देखील समजले नाही. त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. त्यांच्या सुरक्षेचे ऑडिट होई पर्यंत त्यांच्या जिवाचे कमीजास्त झाले तर त्याची जबाबदारी शासन घेणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आज देखील सुरक्षा पुरविलेली आहे. त्यांना सुरक्षा पुरविली नाही अशातला भाग नाही. त्यांना अधिकची सुरक्षा दिली पाहिजे अशी सभागृहाची भावना आहे. त्यासंबंधात ऑडिट केले जाईल. आपण एक गोष्ट समजून घेतली पाहिजे. मी काल पर्यंत एका पक्षाचा प्रदेश अध्यक्ष होतो. तेव्हा मला एक साधा बॉडीगार्ड देखील नव्हता. मी गेली 15 वर्षे या सदनाचा सदस्य असून वेगवेगळ्या पदांवर काम देखील केलेले आहे. मी मुख्यमंत्री होई पर्यंत मला साधा बॉडीगार्ड देखील नव्हता. कारण मला तेवढे थेट परसेपशन नव्हते. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर मला झेड दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आल्यानंतर मला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्याची आवश्यकता नाही असे सांगितले. तेव्हा मला लेखी कळविण्यात आले की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना थेट परसेपशन असल्यामुळे सुरक्षा ही घ्यावीच लागेल. आजही जुन्या काळातील मंत्री मला भेटतात आणि सांगतात की, आम्हाला मोठी सुरक्षा होती. आता आमची सुरक्षा कमी झाली आहे. ते आमचे मित्र असून त्यांच्या सोबत आम्ही कामे केली आहेत. त्यांच्या जीवनाचे रक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. यात थेट परसेपशन आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी राज्य सरकारने एक व्यवस्था उभी केली आहे. एवढचे नव्हे तर कोर्टाने देखील कोणाला सुरक्षा पुरवायची कोणाला नाही यासंबंधी देखील निर्णय दिलेला आहे. सिक्युरिटीचे पूर्ण ऑडिट केल्यानंतर त्या आधारावर दर्जा ठरविला जातो. त्या अनुसार सुरक्षा पुरविली जाते. ही सुरक्षा मुख्यमंत्री काढतात किंवा देतात अशातला देखील भाग नाही. यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली आहे. यात ॲडिशनल डी.जी.(इंटिलिजन्स), सी.पी., डी.जी., एसीएस (होम) यांचा समावशे आहे. ही समिती सुरक्षेचे ऑडिट करते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सुरक्षा पुरविण्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. यात राज्य सरकार कुठेही मागे राहणार नाही. त्यांच्या सिक्युरिटीचे येत्या तीन दिवसात पुन्हा तातडीने ऑडिट केले जाईल आणि त्या अनुसार योग्य ती सुरक्षा पुरविली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सामान्य प्रशासन विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळ निहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये वित्त विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळ निहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे (सांस्कृतिक कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

प्रा.राम शिंदे (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळ निहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये गृह विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळ निहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील (पर्यावरण राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी केंद्र शासनाने गारपीटग्रस्त,दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदतीच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सदरील विषय नियम 289 अन्वयेचा कसा होतो यासंबंधी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अवकाळी पाऊस, गारपीट व दुष्काळ यामध्ये राज्यातील ग्रामीण भागातील जनता सापडली आहे. यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाला रूपये सात हजार कोटी रूपयांची मदत करण्यासंबंधी विनंती केली होती. केंद्र शासनाने राज्य शासनाला फक्त दोन हजार कोटी रूपयांची मदत जाहीर केली आहे. यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाला स्पष्टपणे सांगितले पाहिजे होते की, आम्ही सात हजार कोटी रूपयाची मदत मागितली असताना आपण दोन हजार कोटी रूपयांची दिलेली मदत ही फार कमी आहे. केंद्र शासनाने ऐतिहासिक मदत दिली आहे असे सांगून माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. केंद्रात काँग्रेस आघाडीचे सरकार असताना देशातील शेतकऱ्यांचे 71 हजार कोटी रूपयांचे कर्ज माफ केले होते. त्यातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे 7 हजार कोटी रूपयांचे कर्ज तत्कालीन काँग्रेस-आघाडी सरकारने माफ केले होते. आज संपूर्ण महाराष्ट्रावर दुष्काळाची छाया आहे. 24 हजार गावांना दुष्काळ, अवेळी पाऊस, गारपीट याचा फटका एका वेळा नव्हे तर वर्षातून तीन वेळा बसलेला आहे. असे महाराष्ट्रात यापूर्वी कधीही घडले नव्हते. रूपये दहा प्रमाणे साडेचार हजार कोटी रूपयांची मदत महाराष्ट्रासाठी लागेल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. केंद्रीय कृषी मंत्री नाशिक येथे आले असताना त्यांनी अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मदत करण्यात येईल असे सांगितले होते. पण ती मदत अद्याप पर्यंत तेथील शेतकऱ्यांना मिळालेली नाही. आता त्यांनी सांगितले की, अवकाळी पाऊस आणि गारपिटीची मदत राज्य शासनाने करावी. आता राज्य शासन शेतकऱ्यांना कोणती मदत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

करणार आहे ते सांगावे. शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडत आहे. राज्याच्या जनतेच्या दृष्टिकोनातून हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे गांभीर्य सरकारला नाही. दोन हजार कोटी रूपयातून राज्यातील शेतकऱ्यांना पुरेशी मदत करता येणार नाही.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .....

या गांभीर्याच्या मुद्यावर सभागृहासमोरील सर्व कामकाज थांबवून नियम 289 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करावी अशी विनंती आहे. गारपीट व अवकाळी पावसात सापडलेल्या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारने जास्त मदत दिली पाहिजे असे या सभागृहाच्यावतीने सांगितले गेले पाहिजे. हे शासन शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम या राज्याचे माननीय मुख्यमंत्री करीत असल्यामुळे त्याचा आम्ही निषेध करतो. नियम 289 च्या प्रस्ताव चर्चेला घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबी संबंधी प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर कामकाज स्थगित करण्याच्या सूचनेबाबत सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी दिलेल्या सूचनेचा विषय कामकाजात समाविष्ट नसल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांची सूचना अमान्य करीत आहे. आता सन्माननीय आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांना निवेदन करावयाचे असून त्यांनी ते करावे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी केंद्र सरकारने 2000 कोटी रुपये दिल्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. आतापर्यंत गारपीट, अतिवृष्टीला केंद्र सरकारकडून किती मदत मिळाली होती याची संपूर्ण आकडेवारी माझ्याकडे आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात.)

आम्ही आपले म्हणणे शांतपणे ऐकले होते आता आमचे म्हणणे तुम्ही शांतपणे ऐकावे अशी विनंती आहे. आपण 15 वर्षे सत्तेमध्ये होता. परंतु तुम्ही आता विरोधी पक्षात बसल्यामुळे तुम्हाला कसे तरी वाटते याची मला जाणीव आहे. अगोदरच्या केंद्र सरकाने राज्याला यापूर्वी 300 कोटी, 400 कोटी रुपयांच्यावर मदत दिलेली नाही. मागच्या वेळी यांनी केंद्र सरकारकडे 12000 कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु त्यावेळी केंद्र सरकारने राज्याला एक दमडीसुध्दा दिली नव्हती असा मागचा इतिहास आहे. पहिल्यांदा केंद्र सरकारने आपल्या राज्याला 2000 कोटी रुपयांची मदत दिलेली आहे. ही मदत जास्त आहे असे आम्ही म्हणत नाही. या दिवाळखोर सरकारला 2000 कोटी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे .....

रुपयांची मदत सुध्दा मोठी आहे. आधीच्या सरकारने राज्य गहाण टाकले होते. आता तिजोरीमध्ये दमडी सुध्दा नाही. राज्याचा सर्व पैसा यांनी भ्रष्टाचारामध्ये जिरवला. असे असताना 2000 कोटी रुपये मिळाले हे काही कमी नाही. या रु. 2000 हजार कोटीचा राज्याला मोठा आधार आहे. आधीच्या सरकारने राज्याचे दिवाळे वाजवले आहे. तुम्ही आमच्या हातात पूर्ण दिवाळखोर राज्य दिले आहे. तुम्ही या राज्याला कर्जबाजारी राज्य करुन ठेवले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात.)

राज्य चालवताना आमच्यावर तुम्ही कटोरा धरण्याची, भीक मागण्याची वेळ आणलेली आहे. केंद्र सरकारने 2000 कोटी रुपये दिल्याबद्दल व अधिकची रक्कम देऊ केल्याबद्दल मी केंद्र शासनाचे अभिनंदन करतो. केंद्र सरकारने जी मदत दिली आहे तो मदतीचा पहिला टप्पा आहे. या रक्कमेपेक्षा अधिक रक्कम अजून केंद्र सरकार देणार आहे.

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आता मी विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांना विचार मांडण्याची संधी देत आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना नाकारल्यानंतर त्यावर चर्चा होत नाही. प्रस्ताव नाकारल्यानंतर सरकार सुध्दा चर्चा करु शकत नाही. आपली चर्चा करण्याची तयारी असेल तर आमचीही त्यावर चर्चा करण्याची तयारी आहे. चर्चा करण्याची वेळ दिली तर उद्या किंवा परवा सुध्दा यावर आपण चर्चा करु शकतो. सभापती महोदयांनी नियम 289 च्या प्रस्तावावर निर्णय दिल्यानंतर त्यावर कोणालाही बोलता येत नाही. सभापती महोदयांनी निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाचा अवमान होता कामा नये. सभापती महोदयांनी निर्णय दिल्यानंतर शासनाला त्यावर काहीही बोलता येत नाही. हा विषय आता येथे संपला आहे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती : या विषयाच्या संदर्भातील तांत्रिक बाबीवर जाणे योग्य नाही. माननीय आरोग्य मंत्र्यांना एक निवेदन करावयाचे असून या अगोदर सुध्दा मी त्यांचे नाव पुकारले होते. आरोग्य मंत्र्यांनी निवेदन करण्यास सुरुवात करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ...

श्री. माणिकराव ठाकरे : अवकाळी व गारपिटीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर माननीय मुख्यमंत्र्यांनी व या शासनाने मीठ चोळल्याबद्दल निषेध करून आम्ही बर्हिगमन करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातमीशी संबंध नसताना फोटो छापून येणे

मु.शी.: लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातमीशी संबंध नसताना फोटो छापून येणे यासंबंधी माननीय आरोग्य मंत्र्याचे निवेदन

डॉ. दीपक सावंत (आरोग्य मंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, मी प्रथम आरोग्य मंत्री असलो तरी मी प्रथम या सभागृहाचा सदस्य आहे. मी आपल्या निदर्शनास पुढील बाब आणू इच्छितो. आज बुधवार दिनांक 25/3/2015 रोजी दैनिक "लोकसत्ता" या वर्तमानपत्रामध्ये एक बातमी छापून आली आहे. या बातमीमध्ये जो उल्लेख झालेला आहे तो अतिशय खोडसाळपणाचा आहे. या बातमीमध्ये माझा फोटो छापण्यात आला आहे. या बातमीशी माझा सूतराम संबंध नसताना देखील दुर्दैवाने माझा फोटो छापण्यात आला आहे. अधिवेशन सुरु असताना, या बातमीशी माझा काही एक संबंध नसताना, माझा फोटो छापणे हे अत्यंत चुकीचे आहे. आपण आमचे गार्डीयन असल्यामुळे, आपण आमचे कस्टोडियन असल्यामुळे या बातमीच्या संदर्भात "लोकसत्ता" या दैनिकाची आपण दखल घेण्याची आवश्यकता आहे. या बातमीमुळे माझ्या संदर्भात राज्यामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून या बातमीच्या संदर्भात अनेक लोकांनी मला फोन करुन तुमचा या बातमीशी काय संबंध आहे, तुमचा बातमीमध्ये फोटो का आला, अशी विचारणा केली आहे. या बातमीमध्ये माझा फोटो दिलेला आहे परंतु फोटोच्या खाली चुकीचे नाव छापण्यात आले आहे.

सभापती महोदय, या बाबतीमुळे माझी बदनामी झाली असल्याने मला हक्कभंगाची सूचना मांडण्यासाठी परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो. या बातमीच्या संदर्भात आपण सुमोटो चौकशी करावी व यामध्ये जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर आपण कारवाई करावी, अशी मी आपल्याला नम्रपणे विनंती करतो.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांनी हक्क भंगाच्या संदर्भात परवानगी मागितली आहे. ही बाब आज सकाळीच माझ्या निदर्शनास आलेली आहे. "लोकसत्ता" हे आपल्या राज्यातील प्रमुख

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.....

वृत्तपत्र आहे. त्यामुळे यासंदर्भात मी असा निर्णय देतो आहे की, लोकसत्ता वृत्तपत्राचे संपादक आणि बातमीदार श्री. मधू कांबळे यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल. त्यांच्याकडून खुलासा आल्यानंतर या विषयाच्या बाबतीत मी निर्णय देईन. आवश्यकता वाटली तर मी स्वत: या विषयाच्या संदर्भात चौकशी करतो. माननीय आरोग्य मंत्र्यांनी बातमीच्या संदर्भात जे काही कथन केले आहे ते सत्य आहे. चुकीच्या पध्दतीने चारित्र्यहनन होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेण्याची आवश्यकता आहे.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

टोलच्या संदर्भात आमदारांची बदनामी करणारी चित्रफीत मराठी चॅनलवरुन दाखविल्याबाबत

श्री. अनंत गाडगीळ : सभापती महोदय, गेल्या शुक्रवारी मी टोलच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला असताना एका मराठी चॅनलने सर्व आमदारांची बदनामी करणारी चित्रफीत रात्री 12 वाजेपर्यंत दाखविली आहे. त्यामुळे यासंदर्भात मी आपल्याकडे आज संध्याकाळपर्यंत तक्रार दाखल करतो.

सभापती : ठीक आहे.

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती: आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येईतील.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. राज्यातील 7768 ग्रामपंचायतीच्या 1728 ग्रामपंचायतीमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी दिनांक 22 एप्रिल, 2015 रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

ही घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केलेली आहे. या निवडणुकीसाठी दिनांक 31 मार्च ते 7 एप्रिल या कालावधीत नामनिर्देशन पत्र दाखल करावयाची आहेत. राज्य घटनेतील तरतुदीनुसार ग्रामपंचायती निवडणुकीसाठी अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती इत्यादी राखीव प्रवर्गातील उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत जातीचे दाखले देणे आवश्यक आहे. सध्या राज्यामध्ये जात प्रमाणपत्र देण्याबाबत महसूल विभाग आणि सामाजिक न्याय विभाग या दोन्ही विभागांमार्फत जात प्रमाणपत्र निर्गमित करणे व जात पडताळणी करणे या संदर्भात वाद निर्माण झाल्यामुळे जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्णपणे थांबलेली आहे.

सभापती महोदय, महसूल विभागामध्ये जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेला अर्ज देखील तो विभाग स्वीकारत नाही. ग्राम विकास विभागाने जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत वाढवून दिली असली तरी उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर त्याला उमेदवारी अर्ज दाखल करता येत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, या संदर्भात शासनाने तत्काळ निवेदन करावे. जात वैधता प्रमाणपत्राचे अर्ज स्वीकारून ते प्रमाणपत्र लवकर उपलब्ध करून देण्याची तत्काळ कार्यवाही करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेला विषय अतिशय गंभीर आहे. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायती तसेच महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर केलेल्या आहेत. उमेदवारांना जातीच्या दाखल्याशिवाय अर्ज दाखल करता येणार नाही अशी तरतूद आता अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये आहे. महसूल विभाग आणि समाज कल्याण विभागातील विवाद आता सुटलेला आहे. परंतु उमेदवाराजवळ जातीचे दाखले नसतील तर ते निवडणुकीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभापती महोदय, उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही म्हणून त्यांचा अर्ज नाकारला जाणार नाही. उमेदवाराला सहा महिन्यापर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत देण्यात येईल. आपण अशा स्वरूपाचा कायदा या अधिवेशनात आणत आहोत. आपण ते विधेयक आज मंजूर केल्यास तो कायदा उद्यापासून लागू होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदत देत आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, त्यांना मूळ जात प्रमाणपत्र मिळत नाही. जात वैधता प्रमाणपत्र हा वेगळा विषय आहे. उमेदवाराला मूळ जात प्रमाणपत्र देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, नियमानुसार जातीचे दाखले देण्याबाबतच्या सूचना तत्काळ महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात येतील. निवडणुकीच्या काळापुरता तरी जातीचा दाखला उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात येतील. जर एखादा अधिकारी यामध्ये हलगर्जीपणा करीत असेल तर त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवडणुकीच्या संदर्भातील हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. या संदर्भातील विधेयक मंजूर केल्यास तो कायदा लागू होईल असे महसूल मंत्री महोदयांनी सांगितले. माझी सभागृहाला विनंती आहे की, दोन महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. त्या संदर्भात देखील अशीच अडचण निर्माण होणार आहे. आजच्या कामकाजपत्रिकेतील विधेयक क्रमांक 2 हे याच संदर्भातील आहे. तेव्हा आपण हे विधेयक आताच मंजूर केल्यास तो कायदा लगेच लागू होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी.:महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा)विधेयक

L.A.BILL NO II OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACTS AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIP ACT, 1965)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 2 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 2 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 2 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आम्हाला विधेयकाच्या प्रती मिळालेल्या नाहीत. असे असताना आपण विधेयक कसे मंजूर करता ? सदस्यांना प्रती मिळाल्याशिवाय आपण हे विधेयक मंजूर करीत असाल तर तो या सभागृहाचा अपमान आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्यांना विधेयकाच्या प्रती मिळालेल्या नाहीत, हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांच्या पीजन होलमध्ये विधेयकाच्या प्रती टाकण्यात आलेल्या आहेत असे मला कार्यालयाकडून सांगण्यात आलेले आहे, ते मी आपल्या माहितीसाठी सांगत आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आम्हाला विधेयकाच्या प्रती देण्यात याव्यात हे सांगितल्यानंतरही आम्हाला विधेयकाच्या प्रती मिळालेल्या नाहीत. आता प्रती देण्यामध्ये काय अर्थ आहे ? विधेयक मांडण्यापूर्वी विधेयकाच्या प्रती देण्याचे सौजन्य दाखविणे आवश्यक होते. हे कायदेमंडळ आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, विधेयक चर्चेला घेण्याच्या आणि संमत करण्याच्या बाबतीत कोणाचीही हरकत नाही. परंतु या सभागृहातील निम्म्यापेक्षा जास्त सन्माननीय सदस्यांना विधेयकाची प्रत मिळाली नसेल तर या बाबतीत आपण निर्देश दिले पाहिजे.

उप सभापती : मला विधिमंडळ सचिवालयाने दिलेल्या माहितीनुसार सदरहू विधेयकाच्या प्रती सन्माननीय सदस्यांच्या पीजन होलमध्ये वितरित केलेल्या आहेत. दिनांक 16 मार्च, 2015 रोजी सदरहू विधेयकाच्या प्रती वितरित करण्यात आलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ.माधवराव गाडगीळ यांना प्रतिष्ठेचा जागतिक 'टेलर' पुरस्कार मिळाल्याबद्दल औचित्याचा मुद्दा

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

"आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ.माधवराव गाडगीळ यांना प्रतिष्ठेचा जागतिक 'टेलर' पुरस्कार प्राप्त झाला आहे. पर्यावरणाचा सर्जनशीलतेने अभ्यास करणाऱ्या गाडगीळांनी वनस्पतीपासून प्राणी-पक्ष्यांपर्यंत अनेक घटकांचा विचार मांडला आहे. जैववैविध्य टिकून राहणे निसर्गाच्या संतुलनासाठी तर पृथ्वीवरील मानव जातीच्या अस्तित्वासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. या संशोधनाला कवीचे हृदय आणि लेखकाचे मन असल्यामुळे त्यांचे संशोधन ही एक कलाकृती होते. त्यांना इरावती कर्वे आणि डॉ.सलीम अली यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांची प्राध्यापक म्हणून बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स' येथील कारकीर्द खूप गाजली. स्वच्छ चारित्र्याच्या या संशोधकाचे या सभागृहाने अभिनंदन करावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मागणी करीत आहे."

महोदय, डॉ.माधवराव गाडगीळ हे कै.धनंजयराव गाडगीळ यांचे सुपुत्र असून आज ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पर्यावरण तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, सभागृहाने त्यांचे अभिनंदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एक लाख रुपये उत्पन्न मर्यादा असल्याचे प्रमाणपत्र वितरित केले जात नसल्याबाबत

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, राज्यात जेवढी कृषी महाविद्यालये आहेत त्या ठिकाणी ईबीसी प्रमाणपत्र असल्याशिवाय विद्यार्थ्यांना सवलती मिळत नाहीत. प्रवेशाच्या वेळीच ईबीसी प्रमाणपत्राची विद्यार्थ्यांकडे मागणी केली जाते. महाराष्ट्रातील एकही तहसीलदार महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या मुलाला 1 लाख रुपये उत्पन्नाचे प्रमाणपत्र देत नाही हे सत्य आहे. त्यामुळे सदरहू उत्पन्न मर्यादेचे प्रमाणपत्र वितरित करण्याबाबत तहसीलदारांना सूचना द्याव्यात अशी मी विनंती करतो.

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, सर्व संबंधित कागदपत्रे तपासून 1 लाख रुपयापर्यंत उत्पन्न असेल तर त्या बाबतचे प्रमाणपत्र दिलेच पाहिजे. त्यामुळे या संदर्भातील सुधारित सूचना प्रत्येक तहसीलदारांना देण्यात येतील. ज्या ठिकाणी ही प्रमाणपत्रे दिली जात नसतील आणि त्या बाबत तक्रार आली तर संबंधितांवर नक्कीच कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : आरे कॉलनीतील तबेलेधारकांची थकबाकी माफ करण्याची आवश्यकता, याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.एकनाथराव खडसे (पशुसंवर्धन मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-54 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, तबेलेधारकांकडे 35 ते 40 लाख रुपयांची नियमित शुल्काची थकबाकी आहे. तसेच व्याज व दंडाची रक्कम 7 कोटी रुपये आहे. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना स्पेसिफिक विचारतो की, तबेलेधारकांनी थकबाकीची रक्कम भरल्यास शासन त्यांना उर्वरित व्याज व दंडांची रक्कम माफ करेल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, यापूर्वी सुध्दा त्यांचा दंड आणि व्याजाची रक्कम सरकारच्या वतीने माफ करण्यात आलेली आहे. त्यामुळे आता ही रक्कम माफ करता येणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्यासह सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे, जयंत पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, राजेंद्र मुळक, डॉ.नीलमताई गोऱ्हे, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, मितेश भांगडिया, श्रीमती विद्याताई चव्हाण, सर्वश्री श्रीकांत देशपांडे, माणिकराव ठाकरे, महादेव जानकर, आनंदराव पाटील, नरेंद्र पाटील, हरिसिंग राठोड, दत्तात्रय सावंत, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.रामहरी रूपनवर, सर्वश्री प्रकाश गजभिये, विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी इत्यादी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले व वेगवेगळ्या सूचना केल्या.

सभापती महोदय, सुरुवातीला मी दोन गोष्टी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. महोदय, अनेक सन्माननीय सदस्य या अर्थसंकल्पावर बोलण्याऐवजी माझ्या भाषणशैलीवर बोलले. मी त्यांना सांगतो की, सॉफ्ट बोलणे म्हणजे कमजोरी नाही. समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी वारंवार महाराष्ट्रावर किती कर्ज आहे, किती व्याज आहे या बाबत विचारणा केली. मी तर म्हणेन की, ते सन्माननीय सदस्य स्वत:च्याच उत्तर पत्रिकेवर प्रश्न विचारत होते. आपल्या सर्वांना माहीत आहे की, शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रगती पुस्तक दिले जाते. त्यामुळे आपल्या प्रगती पुस्तकावर मी उत्तर देणे चुकीचे आहे. मला या बाबतीत कोणाशी वाद घालायचा नाही.

महोदय, महाराष्ट्राची प्रगती करावयाची असेल, महाराष्ट्राचा गाडा जर जागेवर आणावयाचा असेल तर हे काम तुम्ही-आम्ही, दोघांनी मिळून केले पाहिजे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, राज्यात आर्थिक तूट आहे. एका बाजूला आपण म्हणायचे की, पगारावरील खर्च 61 टक्क्यांपर्यंत वाढला आहे आणि दुसऱ्या बाजूला नवीन नोकर भरती करावी हे देखील आपणच म्हणायचे. त्यामुळे आपणच ठरविले पाहिजे की, आता कोठे तरी थांबण्याची वेळ आली आहे की नाही ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर....

महोदय, मी विधानसभेमध्ये सदस्य म्हणून पहिल्यांदा प्रवेश केल्यानंतर प्रश्न विचारला होता की, मी नवीन सदस्य आहे. पण मला हे कळत नाही की, सरकारने एखादी योजना जाहीर केल्यानंतर त्या योजनेला विरोध केलाच पाहिजे काय ? वास्तविक पाहता त्या योजनेच्या बाबतीत आपण दुरुस्ती सुचवू शकतो. तुम्ही-आम्ही सर्वांनी मिळून ती योजना यशस्वीरित्या राबवू शकतो, किंबहुना काम करु शकतो. कारण हे सभागृह जसे तुमचे-आमचे सर्वांचे आहे, तसेच हा महाराष्ट्र तुमचा-आमचा सर्वांचा आहे.

महोदय, मी अर्थसंकल्प सादर करताना दोन गाण्यांचा उल्लेख केला होता. ती गाणी नव्हती तर त्यातून मला शेतकऱ्यांचे दु:ख सांगायचे होते. या महाराष्ट्राची कणखर वृत्ती आहे की, कितीही संकटे आली तरी आम्ही ती झेलू शकतो, हेच त्यातून सांगायचे होते. मी माझ्या अर्थसंकल्पीय भाषणात "भीती न आम्हा यत्किंचितही गडगडणाऱ्या नभा," हे कशासाठी म्हटले होते ? हा गडगडणारा नभ अवकाळी पाऊस आणतो, गारांचा वर्षाव करतो. पण त्याची भीती तुम्हा-आम्हाला नाही. ही भीती कधी नसेल, जेव्हा तुम्ही-आम्ही दोघे एकत्र असू तेव्हाच नसेल. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत उल्लेख केला होता. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांचे नाव कोणत्याही क्रमांकावर घेतले तरी शेवटी बाळासाहेब हे बाळासाहेबच राहणार आणि ते नंबर एकचेच श्रध्दास्थान राहणार. मला एकच सांगायचे आहे की, हे राज्य सरकार एकट्या शिवसेनेचे नाही तर भाजपा-शिवसेना पक्षाचे आहे.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात.)

हे सरकार मित्र पक्षाचे आहे. सभापती महोदय, आपण मला संरक्षण दिले पाहिजे. हे राज्य सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर, आरपीआय आणि आमच्या सर्वच मित्रपक्षांचे आहे. यापेक्षा सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे राज्य महाराष्ट्रातील जनतेचे आहे. या जनतेची कामे करण्यासाठी आम्ही या ठिकाणी बसलो आहोत, ही वस्तुस्थिती आहे. महोदय, मी अर्थसंकल्पाच्या सुरुवातीला ज्या ओळी सादर केल्या होत्या त्या माननीय श्री.डांगे साहेबांच्या होत्या. त्यांनी सांगितले होते की, शेतकऱ्यांसमोर जी दु:खे येतात त्यावेळी पक्ष त्यांच्या बरोबर आहे.

नंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपक केसरकर ....

डांगे साहेबांनी यासाठी संघाचा संदर्भ दिला होता. डांगे साहेब तुमच्यामध्ये आहेत. त्यांनी कोट केलेले संघाचे वाक्य मी सांगितले तर तुम्ही त्याचे स्वागत केले पाहिजे. ते त्यांचे वाक्य छापलेले आहे. वेगवेगळ्या पक्षाचे राज्य येणार आहे, पण राज्य हे शेवटी महाराष्ट्राच्या जनतेचे आहे. आपल्याला राज्यातील जनतेचे हित करायचे आहे. आज बरेच डिबेट झाले आहे. मी काही खूप शिकलेलो नाही, मी कॉमर्सचा ग्रॅज्यूएट आहे. परंतु मला एक कळते की, 2 प्रकारे उत्पन्न वाढू शकते आणि त्यातील एक म्हणजे कॅपिटल रिसिट, ज्यामध्ये वेगवेगळी लोन्स येतात आणि दुसरे म्हणजे रेव्हेन्यू, ज्यामध्ये टॅक्सेस, रॉयल्टी, जी शासनाला मिळते. आपणाला एक्सपेंडिचर माहीत आहे. पुन्हा सांगायला नको. त्यामध्येही 2 प्रकार असतात, पहिले म्हणजे कॅपिटल एक्सपेंडिचर ज्यामध्ये प्रोजेक्ट, रोड, इरिगेशन येते आणि दुसरे म्हणजे रेव्हेन्यू एक्सपेंडिचर ज्यामध्ये सॅलरीज, ऑफिस खर्च व इतर सर्व खर्च येतो आणि हे सर्व केल्यानंतर शेवटी फिस्कल डेफिसिट ठरत असते. निश्चिपतणे राज्याला आज डेफिसिट आहे, ही वस्तुस्थिती आहे. मला तुलना करायची नाही. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये 41 कोटी रूपयांची तूट होती, ती 13-14 हजार कोटी रूपयांपर्यंत गेली. ही वस्तुस्थिती आहे. आम्ही कोणाला दोष देणार नाही. आम्ही 41 कोटी रूपयांपेक्षा कमी तूट असलेल्या अर्थसंकल्प मांडला आहे. मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, यामध्ये रिपेमेंटच्या 11 हजार कोटी रूपयांचा सुध्दा समावेश आहे. कर्जे त्या काळात घेतली होती, त्याचे रिपमेंट सुरू झाले आहे. त्यामुळे पुढील काळात कर्ज कमी कसे होईल यासाठी सर्वांना मिळून काही निर्णय घ्यावे लागतील. आम्ही शिकत आहोत. आम्हाला येऊन फक्त 3-4 महिने झाले आहेत. आम्ही संपूर्ण राज्याला, प्रत्येक सर्वसामान्य माणसाला आणि तुम्हालाही आवाहन केले होते की, तुमच्याकडे जर काही उपाययोजना असतील तर आम्हाला सुचवा, आम्ही त्याची अंमलबजावणी करण्यास तयार आहोत. आम्ही राज्याच्या प्रत्येक भागात गेलो, तेथील सर्व सन्माननीय आमदारांच्या, सन्माननीय खासदारांच्या, माननीय पालकमंत्र्यांच्या, जिल्हा परिषद अध्यक्षांच्या समवेत बैठका घेतल्या. आम्ही फक्त बसून राहिलो नाही. राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. आम्ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपक केसरकर ....

जलयुक्त शिवार अभियान तयार केले. दुष्काळी जिल्ह्यांसाठी ईपीसीमध्ये तरतूद केली. मी पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात होतो, त्यावेळी माननीय श्री. अजित पवार हे आमचे नेते होते, त्यांनी त्यांचे पहिले भाषण सुध्दा वाचूनच दाखविले. गोंधळ सुरू असतो, त्यावेळी भाषण वाचून दाखवावे लागते. कारण ही प्रक्रिया आहे, ती प्रक्रिया पूर्ण करावी लागते. मी पाणी न पिता एकाच वेळी अर्थसंकल्प वाचून दाखविला. माझे ते कर्तव्य होते. मी कधीही म्हटले नाही की, तुम्ही गोंधळ करत आहात त्यामुळे मला वाचता येत नाही. आम्हाला समोर बसलेल्या स्नेहींचे मार्गदर्शन हवे आहे. आम्हाला सर्वांचे मार्गदर्शन, सहकार्य घेऊन राज्याला पुढे न्यायचे आहे. आम्ही पुढील 5 वर्षांत राज्याला पुढे नेणार आहोत. हा अर्थसंकल्प काही अंतिम नाही, नंतरचे अर्थसंकल्पही सादर करायचे आहेत. तुम्ही ज्या योजना आम्हाला सांगाल, त्यावर आम्ही विचार करू. आम्ही असे म्हणणार नाही की, तुमच्याकडून आलेल्या योजना चुकीच्या आहेत. तुम्हाला अनेक वर्षांचा अनुभव आहे. तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करू शकता. कारण हे वरिष्ठ सभागृह आहे. मी लहान मंत्री आहे, राज्यमंत्री आहे, मला खूप अधिकार नाहीत हे मला माहीत आहे. तुम्ही सुध्दा 15 वर्षे राज्य केले आहे. तुम्ही ईपीसीमध्ये तुमच्याकडे नियोजन मंत्र्यांना घेतले आहे का ? मला नुसते वित्त खाते दिले गेले होते. मी शिवसेनेचा आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो, त्यांनी मला नियोजन खाते सुध्दा दिले. मला नियोजन विभाग दिल्यामुळे मी नियोजन विभागाचे काम करू शकलो, राज्यातील वेगवेगळ्या भागात जाऊ शकलो, तेथील जिल्हाधिकाऱ्यांशी बोलू शकलो. तुमच्याकडे सुध्दा नियोजनाचे पैसे दिले आहेत. प्रत्येक विभागाला आम्ही पैसे वाटून दिलेले आहेत. तुम्ही सुध्दा या नियोजनावर सदस्य आहात. आपण ठरवूया की, कशारितीने राज्याच्या संकटाशी मुकाबला करायचा आहे. आपल्याला एक सांगायचे आहे की, यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण योजना आहेत, त्यातून प्रत्येकाला मशिनरी घेण्यासाठी अलाऊ केले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. माननीय राज्यमंत्री उत्तर देत आहेत. नवीन पध्दत पडत आहे.

(गोंधळ)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी उत्तर देत आहे. नियोजन व ईपीसी हा सुध्दा अंदाजपत्रकाचा भाग आहे. मला हे सांगितले पाहिजे. मला संरक्षण दिले पाहिजे. मी हळू बोलतो असे सांगण्यात येते. मला बोलू द्यावे. (अडथळा) मी माझ्या भावना 1 तासात संपविणार आहे. नवीन पध्दत नाही. मला भाषण पूर्ण करू द्यावे. ईपीसीत तरतूद झाल्यावर अर्थसंकल्प ठरतो.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहातील चर्चेला माननीय मंत्री उत्तर देत आहेत. अपेक्षित एवढेच आहे की, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे माननीय मंत्र्यांनी उत्तर देणे.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्लेन भाषण केले असते तर उत्तर तसे दिले असते, अवांतर बोललो नसतो. आपण आपल्या भाषणात काय बोलला ते पहा. आपण म्हणाला की, भाषण करताना राज्यमंत्री नाराज होते. मी कशाला नाराज असणार, मी नाराज असण्याचे कारण नाही. कारण राज्याच्या जनतेसाठी मी काम करीत आहे. सरकार एकसंघ आहे. हा गाडा कशाप्रकारे रूळावर आणायचा असा प्रश्न अनेकांनी विचारलेला आहे. आपल्याला योजनांची संख्या कमी करावी लागेल. नेमक्या आवश्यक असतील तेवढ्याच योजना ठेवाव्या लागतील. अनेक वर्षांपासून अनेक योजना सुरू झाल्या आहेत. आपण सर्वांनी एकत्रित काम करताना आशीर्वादाची, सहकार्याची अपेक्षा आहे. (अडथळा) आपण ऐकून घेतले तर माझ्या ज्ञानात भर पडेल.

सभापती महोदय, कॅपिटल प्रोजेक्टवर जेवढी गुंतवणूक करता येईल तेवढी करण्यात येईल. अनेक गोष्टी असतात. अनेक सन्माननीय सदस्य टोलच्या बाबतीत बोलले आहेत. टोल हा सुध्दा वादाचा विषय आहे. तो कशारीतीने काढायचा हा प्रश्न आहे. सरकार त्यासाठी इच्छुक आहे. आपण एकत्र विचार करू. 14 व्या वित्त आयोगाचे पैसे डायरेक्ट त्या त्या ग्रामपंचायतींना जाणार आहेत. त्या पैशाचा योग्य वापर होतो का हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प, यावर्षीचा अर्थसंकल्प, किती अलोकेशन आहे याची आकडेवारी उपलब्ध आहे. मी वाचून दाखवितो, जेणेकरून आपल्याला समजेल. सभापती महोदय, गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प 2 लाख 24 हजार कोटी रूपयांचा होता आणि यावर्षीचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपक केसरकर ....

अर्थसंकल्प 2 लाख 43 हजार कोटी रुपयांचा आहे. गेल्या वर्षी केंद्रीय वित्त आयोगाकडून 14226 कोटी रुपये मिळाले होते, यंदा 4150 कोटी रुपये मिळाले आहेत. गेल्या वर्षी महसुली तूट 4103 कोटी रुपये होती, ती 13500 कोटी रुपयांपर्यंत गेली, यावर्षी ती 3757 कोटी रुपये आहे. कर्ज गेल्या वर्षी 28632 कोटी रुपये घेतले होते, यावर्षी 30582 कोटी रुपये घेतले आहे. कृषी विकास दर दुष्काळ असल्यामुळे 12.3 टक्क्यांनी खाली जाईल असा अंदाज वर्तविला आहे. भांडवली खर्च गेल्या वेळी 27 हजार कोटी रुपये होता, यावर्षी 28 हजार कोटी रुपये झाला आहे. राजकोषीय तूट 30965 कोटी रुपये होती, ती आता 30733 कोटी रुपये झाली आहे. विक्री कर गेल्या वर्षी 69 हजार कोटी रुपये जमा होईल अशी अपेक्षा केली होती, यावर्षी 74 हजार कोटी रुपये जमा होण्याची अपेक्षा केली आहे. मुद्रांक नोंदणी फी गेल्या वर्षी 19426 कोटी रुपये होती, यावर्षी ती 21 हजार कोटी रुपये होईल असे अपेक्षित आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उत्पन्न गेल्या वर्षी 11500 कोटी रुपये होते, यावर्षी 13500 कोटी रुपये होईल असे अपेक्षित केले आहे आणि त्यासाठी कर सुध्दा वाढविला आहे. विजेवरील कर आणि शुल्क हे 6501 कोटी रुपये होते, यावर्षी 7150 कोटी रुपये होणार आहे. उत्पन्न, खर्च यावरील इतर कर गेल्या वर्षी 2138 कोटी रुपये होता, पुढील वर्षी 2309 कोटी रुपये होणार आहे. वाहनावंरील कर 2250 कोटी रुपये होता, तो 5694 कोटी रुपये राहणार आहे. विक्रीय वस्तू सेवा यावरील कर्ज 1770 कोटी रुपये होते, ते 2015 कोटी रुपये होणार आहे. माल व उतारुवरील कर 1098 कोटी रुपये होते, ते 1150 कोटी रुपये होणार आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

जमीन महसूल 1867 कोटी रुपयांवरुन 3200 कोटी रुपये होणार आहे. राज्याचा स्वतःचा कर महसूल 1,18,640 कोटी रुपयांवरुन 1,30,635 कोटी रुपये होणार आहे. कर व्यतिरिक्त महसूल 2,06,665 कोटी रुपये होणार आहे. केंद्र हिस्सा 20,213 कोटी रुपये होता. आता तो 29,062 कोटी रुपये होणार आहे. केंद्र शासनाकडून सहायक अनुदान 27,958 कोटी रुपये मिळत होते, ते आता 17,869 कोटी रुपये मिळणार आहे.

सभापती महोदय, राज्याच्या दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर गुजरात राज्याचे दरडोई उत्पन्न 93,046 कोटी रुपये, मध्य प्रदेशचे 43,000 कोटी रुपये आणि महाराष्ट्र राज्याचे 1,03,991 कोटी रुपये आहे. गुजरात राज्याची महसुली जमा 1,09,000 कोटी रुपये, मध्य प्रदेशची 1,14,000 आणि महाराष्ट्र राज्याची 1,98,231 कोटी रुपये आहे. गुजरात राज्याचा महसुली खर्च 1,01,985 कोटी रुपये, मध्य प्रदेश राज्याचा 1,08,835 आणि महाराष्ट्राचा 2,01,988 कोटी रुपये आहे. गुजरात राज्याचे व्याज प्रदान 16,311 कोटी रुपये, मध्य प्रदेशचे 8,058 आणि महाराष्ट्राचे 27,663 कोटी रुपये एवढे आहे. एकूण कर्जाच्या बाबतीत गुजरात राज्याने 1,84,000 कोटी रुपये कर्ज काढले आहे तर महाराष्ट्राने 3,33,000 कोटी रुपये कर्ज काढले आहे.

सभापती महोदय, अन्य अनेक महत्त्वाची बाबी आहेत. राज्याची एकूण महसुली जमा 9.93 टक्क्यांनी वाढून 1,98,231 कोटी रुपये आहे. राज्याचा स्वतःचा महसूल सन 2014-2015 मध्ये 1,18,640 कोटी रुपये एवढा अंदाजित केला होता. प्रत्यक्षात तो 1,30,000 कोटी रुपये एवढा प्राप्त होणार आहे.

सभापती महोदय, बजेटचा आऊटले ठरविण्यापूर्वी आपण डीपीसीला निधी वितरित करतो. हे करीत असताना प्रत्येक विभागाला न्याय देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला आहे. कोकण विभागाला 15.93 टक्के, नाशिक विभागाला 15.80, पुणे विभागाला 18.98, औरंगाबाद विभागाला 20.98, अमरावती विभागाला 13.33 आणि नागपूर विभागाला 13.98 टक्के वाढ दिलेली आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक विभागाला समान न्याय देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

विदर्भ आणि मराठवाड्याला जलयुक्त शिवार योजनेसाठी वेगळा निधी दिलेला आहे. त्यामुळे त्या विभागांच्या टक्केवारीमध्ये वाढ दिसत असली तरी जलयुक्त शिवारची आकडेवारी त्यामध्ये समाविष्ट आहे. या दोन्ही विभागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे या चर्चेदरम्यान मांडले आहेत. कर्ज आणि त्यावरील व्याजाची परतफेड आपण कशारितीने करणार आहोत, याबाबतची आकडेवारी देखील मी आपल्या समोर मांडतो. सन 2005-2006 या वर्षात व्याजाची परतफेड 10,523 कोटी रुपये केली होती. सन 2006-2007 मध्ये 11,000 कोटी रुपये, सन 2007-2008 मध्ये 12,932 कोटी रुपये, सन 2008-2009 मध्ये 13,027 कोटी रुपये, सन 2009-2010 मध्ये 14,838 कोटी रुपये, सन 2010-2011 मध्ये 15,648 कोटी रुपये, सन 2011-2012 मध्ये 17,505 कोटी रुपये, सन 2012-2013 मध्ये 19,076 कोटी रुपये, सन 2013-2014 मध्ये 21,207 कोटी रुपये, सन 2014-2015 च्या सुधारित अंदाजाप्रमाणे 14,283 कोटी रुपये असणार आहे आणि सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे 27,663 कोटी रुपये एवढी आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय तूट सन 2006-2007 मध्ये 102 कोटी होती. ती आता या वर्षापर्यंत 3000 कोटी रुपयांवर आली आहे. गेल्या वर्षी 13 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त अर्थसंकल्पीय तूट आली होती. मला आपल्याला हे सांगावयाचे आहे की, अर्थसंकल्पात जो उपलब्ध निधी होता, त्यामधून जास्तीत जास्त न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या विकास योजनांसाठी 1160 कोटी रुपये, ग्रामीण भागातील रस्ते विकास योजनांसाठी 2413 कोटी रुपये, पायाभूत सुविधांसाठी 884 कोटी रुपये, स्मारके आणि तीर्थक्षेत्रासाठी 181 कोटी रुपये, स्थानकांचे नूतनीकरण आणि नवीन बसेस घेण्यासाठी 142 कोटी रुपये, रोजगारासाठी 186 कोटी रुपये, आदिवासी विकास व ग्राम पंचायतींसाठी 5170 कोटी रुपये, अशा प्रमुख तरतुदी केलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

सभापती महोदय, राज्यस्तरीय योजनेमध्ये झालेली वाढ मी आपल्या निदर्शनास आणून देतो. कृ षी क्षेत्रामध्ये 33.15 टक्के, रोजगार व स्वयंरोजगार यामध्ये 12.66 टक्के, माहिती व तंत्रज्ञान यामध्ये 11 टक्के, माहिती व जनसंपर्क यामध्ये 5.96 टक्के वाढ केलेली आहे. आपण ही सर्व आकडेवारी तपासून बघू शकता. गृहनिर्माण आणि पोलीस यामध्ये 42 टक्क्यांची वाढ झाली आहे. नियोजनामध्ये 85.8 टक्क्यांची वाढ झाली आहे. सार्वजनिक रस्त्यांच्या तरतुदीमध्ये 31 टक्क्यांची वाढ झाली आहे. वन विभागाच्या तरतुदीमध्ये 205 कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ग्राम विकासाच्या तरतुदीमध्ये 144 कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. जलसंधारणाच्या तरतुदीमध्ये 16.95 टक्क्यांची वाढ झालेली आहे. नगरविकासामध्ये 29.31 टक्क्यांची, वित्त विभागामध्ये 57.40 टक्के, अल्पसंख्याक विकासामध्ये 17.85 टक्के, विधानसभा सचिवालयाच्या तरतुदीमध्ये 16.6 टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी एक महत्त्वाचा प्रश्न मांडला होता. 176 कोटी रुपयांमधून आपण 2 लाख लोकांच्या कर्जाची परतफेड कशी करणार आहात, असा त्यांचा प्रश्न होता. एक गोष्ट आपल्याला सांगितली पाहिजे की, रजिस्ट्रारकडे प्रत्येकाच्या पट्टयांची नोंद असते. रजिस्ट्रारकडे असलेल्या कागदपत्रांची व त्यावरील व्याजाची सर्व माहिती घेतली असता 176 कोटी रुपयांचे कर्ज असून 15 कोटी रुपये व्याज झाले होते. या संपूर्ण रकमेची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

सभापती महोदय, राज्यावरील कर्जाबाबतही सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. राज्य सरकारने नव्याने 33107 कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. त्यांनी असा मुद्दा मांडला की, 4 महिन्यामध्ये या सरकारने 10 टक्के कर्ज काढले आहे. मला एकच सांगावयाचे आहे की, अर्थसंकल्प सादर झालेला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि केंद्र सरकारच्या निकषांप्रमाणेच हे कर्ज काढले जाते. किंबहुना त्यांची संमती घेऊनच ते काढले जाते व त्या त्या शेड्युलनुसार कर्ज उभारले जाते. त्यामुळे कोणत्या महिन्यात कर्ज उभारले, किती महिन्यात उभारले, असा प्रश्न नाही. त्यासाठीची तरतूद बजेटमध्ये केलेली असते.

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

सभापती महोदय, विकास कामांवर फक्त 45 टक्केच खर्च होणार आहे, असाही मुद्दा सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केला आहे. आपल्याला माहीत आहे की, मार्च महिन्यामध्ये अनेक विकास कामे पूर्ण होत असतात आणि त्या महिन्यात तो खर्च पडत असतो. प्लॅनला 75 टक्के, नॉन प्लॅनला 85 टक्के आणि सॅलरीला 100 टक्के, हे सूत्र ठरलेले आहे. त्याप्रमाणे तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले की, नॉन प्लॅनचा खर्च 74 हजार कोटी रुपयांवरुन 86 हजार कोटी रुपयांवर गेला आहे. सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे. वेतनात वाढ झालेली असते, पेन्शन, सबसिडी यामध्ये वाढ झालेली असते. हा खर्च दरवर्षी वाढत असतो. दरवर्षी होणाऱ्या वाढीप्रमाणेच ही वाढ झालेली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

वेतन, पेन्शन, सबसिडी, यावर एकूण खर्च झालेला असतो. नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत पाच हजार कोटी रुपये मिळणार आहेत, याचा बोजा सर्व सामान्य लोकांवर पडेल असा उल्लेख आपण केला होता. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, 2009 मध्ये जमिनीच्या किंमती फ्रिज करण्यात आल्या होत्या. या किंमती कदाचित बिल्डरच्या हितासाठी फ्रिज करण्यात आल्या असतील. प्रत्येक बिल्डरकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात आले होते. शासनाने वाढीव किंमतीचा तक्ता मान्य केला तर ती रक्कम भरण्यास बिल्डर तयार आहे अशा प्रकारे प्रतिज्ञापत्र त्यांच्याकडून करुन घेण्यात आले होते.. बिल्डरकडे गेलेला नफा आपण रिकव्हर करीत आहोत. बिल्डरांनी जी घरे विकली त्यांच्या किंमती वाढण्याचा प्रश्न आता उद्‌भवत नाही. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती की, सर्व सामान्यासाठी जी घरे लागतात त्याचा कोणताही परिणाम त्यांच्यावर होणार नाही, याची काळजी सरकार घेणार आहे. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या शब्दाला शासन अद्यापही बांधील आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी संजय पांडे यांच्या संदर्भातील मुद्दा मांडला होता. हा विषय अर्थसंकल्पाशी संबंधित नसला तरी मला असे सांगायचे आहे की, हे राज्य सर्वसामान्य लोकांचे आहे. एखादा अधिकारी सर्व सामान्य लोकांना त्रास देत असेल व त्या अधिकाऱ्याबाबत तक्रारी आल्या असतील तर राज्य शासन त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार. याबाबत आपण निश्चिंत रहावे.

सभापती महोदय, अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकाबाबत एक मुद्दा मांडला होता. दिनांक 30-03-2012 च्या शासन निर्णयानुसार भक्त निवास इमारत बांधण्यासाठी 206 लाख रुपयांच्या कामांना मंजुरी दिली आहे. 40 लाख रुपये वितरित करण्यात आले असून उर्वरित रक्कम सन 2013 मध्ये वितरित करण्यात आली आहे. सन 2014-2015 मध्ये शासन निर्णयानुसार 619 लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी देऊन तेवढा निधी मंजूर केला आहे. यामध्ये नक्षत्र उद्यान, संरक्षण भिंत, उद्यानातील गडी, शिल्प व गडीतील वाड्यातील इतर कामांचा समावेश आहे. विभागाच्या योजनेनुसार निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यास माननीय मुख्यमंत्री तथा अध्यक्ष पर्यटन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य समितीला तो सादर करण्यात येतो. उपलब्ध तरतुदीनुसार हा निधी देण्यात येतो. ..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर..

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी अशी टीका केली होती की, शेतीसाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही. बजेटमध्ये 1000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मदत दिली नाही. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, 92 कोटी रुपये देण्याची ऑर्डर काढण्यात आली आहे. जसे रिपोर्ट येतात त्याप्रमाणे निधीचे वितरण शासनाकडून होते. शेतकऱ्यांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. केंद्र शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे आकस्मिकता निधीची तरतूद करावी लागते. ही तरतूद वाढविण्यासाठी माननीय राज्यपाल यांची मंजुरी घ्यावी लागते. अशा प्रकारची मंजुरी वेळोवेळी घेण्यात आली आहे. त्याप्रमाणे निधीची उपलब्धता करुन देण्यात आली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, केंद्र शासनाकडून 2000 कोटी रुपये मिळाले आहेत. यापूर्वीच शासनाने स्पष्ट घोषणा केली होती की, केंद्र शासनाकडून मदत आली नाही तरी शेतकऱ्यांना पैसा दिला जाईल. केंद्र शासनाकडील निधी येण्यापूर्वी राज्य शासनाने शेतकऱ्यांना मदतीचे वाटप केले आहे. पुढे देखील मदत देण्याची प्रक्रिया चालू राहणार आहे. पुढे जी मदत जाहीर होईल, त्यामध्ये या निधीचा वापर केला जाणार आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाचे 69 प्रकल्प पूर्ण करण्याचे शासनाने ठरविले आहे. ज्या प्रकल्पांची कामे 80 ते 90 टक्के झाली आहेत, असे 69 प्रकल्प पूर्ण करण्याची कमिटमेंट शासनाने केली आहे. यापुढील काळात 86 प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. त्याप्रमाणे जलसंपदा विभागाचे प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. माननीय राज्यपालांनी अमरावती विभागासाठी निदेश दिले आहेत. अमरावती विभागातील अनुशेष नाहीसा करण्याची कार्यवाही सुरु आहे. जमीन अधिग्रहणाचे विषय असल्यामुळे काही ठिकाणच्या प्रकल्पांना वेळ लागतो.

सभापती महोदय, इंदिरा आवास योजना, शबरी आणि रमाई योजनेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यामध्ये 1 कोटी 75 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे....(अडथळा).... आकडा मॅच होत नसेल तर मी आपणास सांगू इच्छितो की, यामध्ये काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सुधारणा करण्यात आल्या आहेत. दोन लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जमीन नव्हती म्हणून ते घरकुलापासून वंचित होते. जमीन घेण्यासाठी प्रत्येकी 50 हजार रुपये बजेटमधून त्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे या लोकांना सदर योजनेचा लाभ मिळणार आहे.

सभापती महोदय, स्वच्छ भारत अभियानासाठी तरतूद नाही, असा उल्लेख करण्यात आला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, स्वच्छ भारत अभियानासाठी डीपीसीमधून तरतूद केली आहे. ही तरतूद पुरेशी आहे, जितका निधी केंद्र शासन देते, त्यापेक्षा जास्त रकमेची तरतूद करण्यात आली आहे. 400 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून आलेल्या निधीला मॅचिंग ग्रॅन्ट नाही म्हणून काम अपूर्ण राहणार नाही अशी मी सभागृहाला खात्री देतो. मागच्या वर्षी 4 हजार रुपये देण्यात येत होते आता ही रक्कम 12 हजार रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

सभापती महोदय, उद्योगातील महाराष्ट्राचे स्थान कायम रहावे यासाठी 'मेक इन महाराष्ट्र' योजना तयार केली आहे. याबाबत प्रश्न विचारला होता. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, उद्योगांवरील तरतूद शासनाने वाढविली आहे. 'मेक इन महाराष्ट्र' या योजनेनुसार कोणीही गुंतवणूकदार आला तर त्याला ताबडतोब व्यवसाय सुरु करता आला पाहिजे, यासाठी कायद्यानुसार सवलती देण्यात येणार आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की, तुम्ही कामगारांचे कायदे बदली करणार आहात काय ? कामगारांचे कायदे बदली करणे हा यामागील उद्देश नाही. सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील व त्यामुळे उद्योजक महाराष्ट्रात लवकर येतील, कामगारांना अधिक सुविधा प्राप्त होतील, अशा प्रकारच्या काही सूचना दिल्या तर त्याचा सरकार विचार करणार आहे. कामगारांवर अन्याय होईल असे कोणतेही काम शासन करणार नाही. बांबू महामंडळाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या महामंडळास आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या स्मारकाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे त्यांच्या नावे महामंडळ सुरु करण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. ही योजना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर..

तयार करण्यात येत आहे. या योजनेला कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू दिला जाणार नाही. याची मी सभागृहाला खात्री देतो.

सभापती महोदय, बीड रेल्वेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. केंद्र शासनाने 144 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्य शासनाने एकत्रित 68 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, केंद्र शासन जेवढी तरतूद करते तेवढीच तरतूद राज्य शासन उपलब्ध करुन देते. केंद्र शासनाकडून जसा निधी येईल तितका निधी राज्य शासन उपलब्ध करुन देणार आहे, या नंतर आणखी पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे निधी मंजूर करुन घेता येणार आहे. केंद्र शासनाकडून 61 कोटी रुपये आले तर तेवढ्या निधीची तरतूद राज्य शासन करणार आहे. यासाठी पुरेसा निधी राज्य शासनाकडे आहे.

सभापती महोदय, इंदू मिलबाबत महाराष्ट्र शासनाची कमिटमेंट आहे, जेव्हा यासंदर्भातील प्लॅन फायनल होईल त्यावेळी महाराष्ट्र शासनाने जी कमिटमेंट दिली आहे ती पूर्ण केली जाईल. एक उल्लेख मला खिजविण्यासाठी करण्यात आला आहे. खिजविण्यासाठी आहे असे मी म्हणणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण देखील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या संदर्भात तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी याबाबत उल्लेख केला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, माझा शब्द चुकला असेल तर मी मागे घेतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री अत्यंत चांगले उत्तर देत आहेत, अतिशय नम्रपणे उत्तर देत आहेत, सौम्य भाषेत उत्तर देत आहेत, आम्ही देखील अतिशय शांतपणे उत्तर ऐकत आहोत. बाळासाहेबांचे नांव कोणालाही खिजविण्यासाठी घेण्याचे कारण नाही. या सभागृहात किंवा विधानसभेत किंवा महाराष्ट्रातील कोणताही....(अडथळा)....

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

आपण माझे म्हणणे एकून घ्यावे. मी असे म्हटले काय की, माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांना खिजविण्याची हिंमत कोणी करेल ? कोणीही करु शकणार नाही. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात ज्यांची नावे घेतली त्या सर्व व्यक्ती वंदनीय आहेत, याबद्दल आच्या मनात शंका नाही. मग प्रश्न असा तयार होतो की, माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे वंदनीय नाहीत काय ? माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे वंदनीय आहेत. तुम्हाला व्यक्तिगत खिजविण्याचा हा विषय नव्हता. आपण महाराष्ट्राच्या सन्मानाच्या गोष्टी करतो. मग माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव का नाही, असे विचारणे म्हणजे खिजविणे होत असेल तर मला असे वाटते की, ते योग्य होणार नाही.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतलेले आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, शिवसेना आणि भारतीय जनता पार्टीमध्ये दुही आहे की काय, यासाठी वारंवार हा उल्लेख केला गेला. युती शासनामध्ये सर्वोच्च प्रायॉरिटी माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांना आहे आणि ती प्रायॉरिटी कालही होती, आजही आहे. मी सभागृहात येण्यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली. (...अडथळा...)

तालिका सभापती : मी आपल्याला सांगू इच्छितो की, आता कोणतीही राजकीय भाषणे किंवा शेरेबाजी होणार नाही.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी अर्थसंकल्पाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी मला शब्द दिलेला आहे की, हे जवळ जवळ फायनल स्टेजला आहे. ते झाल्यानंतर आणि सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर त्याची रितसर घोषणा करण्यात येईल. (...अडथळा...) तुम्ही जे राजकीय मुद्दे उपस्थित केले त्या मुद्यांना मी उत्तर देत आहे. तुम्हाला उत्तर नको असेल तर तसे सांगावे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, 65 महिला बचत गटांनी कर्ज काढून कारखाने उभारलेले आहेत. परंतु ई-टेंडरिंग झाल्यामुळे त्याला....

तालिका सभापती : मंत्री महोदय, आपल्या उत्तरासाठी आणखी किती वेळ लागणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी थोडक्यात उत्तर देऊ शकतो. परंतु, सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले पाहिजे. अर्थसंकल्पावर 5-6 तास चर्चा झालेली आहे. मला उत्तरासाठी 1 तास वेळ देण्यात आलेला आहे. आपण सांगितले तर मी थोडक्यात उत्तर देईन. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी जे महत्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत त्यांची मी उत्तरे देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जेंडर बजेटच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महिला व बालकल्याण विभागाचे जे बजेट आहे त्या संदर्भात नियोजन विभागाची सर्क्युलर्स आहेत आणि पुढील काळात याबाबत काळजी घेण्यात येईल. तसेच, आपण मुंबई शहरातील डिझेलवरील कराच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. मी सभागृहात येण्यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांसमवेत या संदर्भात चर्चा केली. मुख्यमंत्री महोदयांनी असे आश्वासित केलेले आहे की, कोणत्याही परिस्थितीत मुंबईवर अन्याय होणार नाही, अशी शासनाची भूमिका राहील. मला असे वाटते की, आपल्या भाषणातील हे दोन महत्वाचे मुद्दे होते. त्या मुद्यांना मी स्पर्श केलेला आहे. तसेच, आपण महिलांकरिता शौचालये बांधण्यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. आपण मूलभूत सुविधांसाठी 52 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी सांगितले की, जास्त मागणी मुंबई शहरातील आहे. नगर विकास विभाग मुख्यमंत्री महोदयांकडे आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे की, कोणत्याही परिस्थितीत यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही आणि महानगरपालिकांनी महिलांसाठी जास्तीत जास्त शौचालये बांधावीत असे महानगरपालिकांना सर्क्युलर काढून कळविण्यात येईल.

सभापती महोदय, तसेच, एपीएलच्या लाभार्थ्यांना धान्याचा लाभ देण्याच्या संदर्भातील मुद्दा मांडण्यात आला होता. मी या संदर्भात आपल्याला सांगू इच्छितो की, सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत 1 कोटी 77 लाख लाभार्थी अनुदानित दराने अन्न धान्याचा लाभ घेत होते. ते लाभार्थी सदर दराने अन्नधान्य घेण्यापासून वंचित राहू नयेत या दृष्टीने राज्य शासनाने त्या लाभार्थ्यांना देखील एपीएल केसरी कार्डधारक लाभार्थ्यांना मिळत असलेल्या लाभाप्रमाणे प्रचलित दराने, प्रचलित परिमाणात अन्नधान्य देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार केंद्र शासनाकडून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

इकॉनॉमिक कॉस्टने अन्न धान्य खरेदी करून सदर लाभार्थ्यांना मे, 2014 ते ऑक्टोबर, 2014 या कालावधीत अन्न धान्याचे वाटप करण्यात आले. माहे ऑक्टोबर, 2014 च्या नंतर सदर लाभार्थ्यांना अनुदानित दराने अन्न धान्य पुरवठा करण्यात आला नसल्याने सदर लाभार्थी सवलतीच्या दराने अन्न धान्य मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. त्यांना अन्न धान्याचा लाभ द्यावा किंवा कसे, हा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ आहे आणि या संदर्भात लवकरच निर्णय घेतला जाईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अन्न सुरक्षा कायद्या अंतर्गत जे केशरी कार्डधारक आहेत त्या 1 कोटी 77 लाख लोकांना आपण अन्न धान्याचा पुरवठा करीत नाही. यासाठी अगोदरच्या शासनाने प्रत्येक महिन्याला किमान 150 कोटी रुपयांची तरतूद केली होती. ती तरतूद तुम्ही कन्टिन्यू ठेवावयास पाहिजे होती. परंतु, तुम्ही ती बंद केली. आपण यासाठी बजेटमध्ये तरतूद करणार आहात काय ? आपण त्या लोकांना सवलतीच्या दराने अन्न धान्य देणार आहात काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर यासाठी योग्य ती तरतूद करण्यात येईल. हा विषय मंत्रिमंडळासमोर विचारार्थ आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, वेगवेगळे विभाग माझ्या विभागाच्या अखत्यारीत येत नाहीत. एखादा स्पेसिफिक प्रश्न असेल आणि त्यावर चर्चा उपस्थित केली तर त्या संदर्भात अधिक खुलासा होऊ शकेल. माझी अपेक्षा आहे की,....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांना असे उत्तर देता येणार नाही. सर्व विभाग वित्त विभागाच्या अखत्यारीत येतात. वित्त विभागाने आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिल्यानंतर विभागांचा कारभार चालतो.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मंत्रिमंडळाचा विचार झाला तर आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल, असे मी सांगितलेले आहे. त्यामुळे हा प्रश्न येत नाही. मला तांत्रिक बाबींची अधिक माहिती नाही....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर ....

सभापती महोदय, मी सांगितले की, तसा निर्णय झाला तर ही तरतूद करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, जयंत पाटील साहेबांनी अर्थसंकल्पाच्या संदर्भात वेगवेगळे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. राज्यमंत्री महोदयांना काही अधिकार नाहीत, त्यामुळे त्यांना काही बोलता येत नाही, असे एकंदरीत त्यांच्या बोलण्यावरून ध्वनित होते. आमची अशी विनंती आहे की, जर राज्यमंत्री महोदयांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देता येत नसेल तर या चर्चेला माननीय वित्त मंत्री उत्तर देतील. वित्त मंत्री महोदयांसमोर ही चर्चा होऊ द्यावी. खरे म्हणजे, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देताना एवढे सर्व वाचून दाखविण्याची आवश्कता नाही. तुम्हाला अर्थसंकल्पावरील चर्चेला धडाधड उत्तर देता आले पाहिजे आणि नसेल देता येत तर मी त्यांची मजबुरी समजू शकतो. मी त्यांचे अवघड जागेचे दुखणे समजू शकतो. माझी अशी विनंती आहे की, आपण थांबावे.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले की, जर मंत्रिमंडळाचा निर्णय झाला तर आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभापती : मंत्री महोदय, आपण थोडक्यात उत्तर द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब राज्यमंत्री होते. त्यांना याची कल्पना आहे. माननीय विरोधी पक्षनेते किंवा सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना याची माहिती नसावी. कोणत्याही अर्थसंकल्पीय बाबीला मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर तरतूद केली जाते. माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी सांगितले की, हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आहे आणि त्याला मान्यता मिळाल्यानंतर वित्त विभागाकडून त्यासाठी योग्य ती तरतूद करण्यात येईल. असे सांगितल्यानंतर मग तुम्हाला आणखी कोणता प्रश्न पडला ? प्रत्येक गोष्टीसाठी मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावीच लागते. हे नवीन आहे का ? सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी फिरकी घेतली. आपल्याला मंत्रिमंडळाची कार्यपद्धती माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचा तर प्रश्नच नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, वन विभागाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यासाठी 527 कोटी रुपयांची तरतूद.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभापती : आपल्याला मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावयाचे आहे, का गोंधळ करावयाचा आहे ? आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : राज्यमंत्री महोदय जे उत्तर देत आहेत त्याबाबत यांचे आकलन काय आहे किंवा जास्त आहे हा प्रश्न आहे. माननीय सदस्यानी जे प्रश्न उपस्थित केले त्या मुद्यांना मंत्री महोदय उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, अनेक शिक्षक आमदार महोदयांनी शिक्षणासाठी गेल्या 5 वर्षात किती तरतूद केली होती याबाबत ऊहापोह केला आहे. शासनाने 2009-10 मध्ये 8532 कोटी रुपयांची तरतूद केली होती. 2014-15 मध्ये 18306 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मिहान प्रकल्पाबाबत मी सांगू इच्छितो की, 2012-13 मध्ये 50 कोटी रुपयांची, 2013-14 मध्ये 200 कोटी रुपयांची आणि 2014-15 मध्ये 105 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 1350 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबद्दल अनेक प्रश्न मांडण्यात आले आहेत. तरतूद कमी का करण्यात आली असा एक प्रश्न उपस्थित केला आहे. या संदर्भात केंद्र शासनाकडून पत्र आले आहे. केंद्र शासन एक नवीन योजना इंट्रोड्यूस करणार आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत केलेली तरतूद पुरेशी आहे. केंद्र शासनाची योजना अंतिम होईल त्यावेळी ही तरतूद वाढवायची की कमी करायची याबाबत निर्णय होईल. कोणत्याही परिस्थितीत राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही याची मी खात्री देतो.....(अडथळा)...निधी वाढवायचा असेल तर वाढविला जाईल असे मी म्हटले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, केंद्रीय वित्तमंत्र्यांनी भाषण करताना असे म्हटले की, राज्यांच्या वाट्याला आता मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. त्यामुळे केंद्राच्या कोणत्याही योजनेवर राज्यांनी अवलंबून राहू नये असे स्पष्टपणे सूचित केले आहे. माननीय राज्यमंत्री म्हणाले की, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना टप्पा क्रमांक-2 ही महत्वाची योजना आघाडी सरकारने आणली. त्या योजनेसाठी आवश्यक तेवढी तरतूद केली नाही. कारण केंद्र सरकारकडून एक पत्र आले आहे. केंद्र सरकार नवीन योजना आणणार असल्यामुळे राज्य सरकारने आवश्यक तेवढी तरतूद केली नाही. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही राज्य सरकारची योजना असून त्या योजनेशी केंद्र सरकारचा काहीही संबंध नाही. केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, आता तुम्ही केंद्राच्या कोणत्याही योजनेवर अवलंबून राहू नका, तुम्हाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अधिक निधी देणार आहोत. राज्य शासनास योजनेची तरतूद वाढविता येत नसेल तर तसे सांगावे.

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) AA.2

SGB/ AKN/ MMP/ 14:20

श्री.दीपक केसरकर : या योजनेवर तरतूद वाढवायची असेल तर आवश्यक तेवढा निधी राज्य शासन उपलब्ध करुन देईल....(अडथळा)...माझ्याकडे तपशील उपलब्ध आहे, मी तो देऊ शकतो. सभापती महोदय, ऊसावरील पर्चेस टॅक्स शासनाने रद्द केला आहे. उद्योग क्षेत्रावलीसाठी प्रोत्साहन म्हणून 6 हजार कोटी रुपयांची तरतूद परताव्यासाठी केलेली असल्यामुळे निश्चितपणे उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढेल. स्वच्छ भारत संदर्भातील तरतुदीची आकडेवारी मागितली होती. गेल्या वर्षी 87 कोटी रुपये तरतूद केली होती. यावर्षी 417 कोटी रुपये एवढी भरीव तरतूद केली आहे.

सभापती महोदय, चिन्हांकित म्हणजे काय असा प्रश्न अनेक माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. पूर्वी ठोस तरतूद असायची. अवितरित नियतव्यय असायचा. रक्कम खर्च केली जात होती, परंतु ती समोर आणली जात नव्हती. आम्ही अधिक पारदर्शकता आणली आहे. कोणाला किती पैसा ठेवला आहे हे स्पेसिफिक दाखविले आहे, चिन्हांकित केले आहे. तेवढा पैसा त्या त्या योजनेला दिला जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे हे कोकणातील असून ते या राज्याचे अर्थमंत्री होते. त्यांच्या अर्थ मंत्रीपदाच्या काळात कोकणासाठी अनेक योजना जाहीर करण्यात आल्या. त्यामुळे युती शासनाने कोकणासाठी एकही नवीन योजना लागू केलेली नाही. तुमच्या योजना पूर्ण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. योजनेला दिलेले महात्मा फुले यांचे नाव रद्द करणार का असा मुद्दा मांडण्यात आला आहे. महात्मा फुले जल आणि भूमी सुधारणा अभियानासाठी 10 कोटी रुपयांचा नियतव्यय यावर्षी उपलब्ध करुन दिला आहे.

सभापती महोदय, स्थानिक संस्था कराच्या संदर्भात शासनाची भूमिका अशी आहे की, कोणावरही अतिरिक्त भार येता कामा नये. आघाडी सरकारच्या काळात महापालिकांचा कर रद्द केला गेला. आज सुध्दा महापालिकांना 1000 कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. त्यांनी पर्यायी कर निवडावा म्हणून आघाडी शासनाच्या काळात पत्र पाठविले होते. नगरपालिकांनी स्थानिक संस्था कर निवडला असता तर महापालिकांप्रमाणे सर्व नगरपालिकांना सुध्दा एलबीटी लागू झाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असता. आपल्याला पर्याय शोधावा लागणार आहे. ज्या ठिकाणाहून टॅक्स गोळा होतो त्याच विभागाला ती रक्कम दिली जाईल. महापालिका नसेल, ग्रामीण भाग असेल तर ग्रामीण भागाच्या

...3...

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) AA.3

SGB/ AKN/ MMP/ 14:20

श्री.दीपक केसरकर....

विकासासाठी तो पैसा दिला जाईल. शासन तो पैसा आपल्याकडे ठेवणार नाही. त्यासाठी तुमच्याशी चर्चा करुन धोरण ठरविले जाईल.....(अडथळा)....निवडणुकीमध्ये घोषणा करणे आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना तुम्हाला सगळयांना विश्वासात घेऊन हे धोरण ठरविण्यात येईल असे मी स्पष्ट सांगितले आहे. जवळजवळ सर्वच प्रश्नांना मी उत्तरे दिलेली आहेत. आपल्या सर्वांचे आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देत असताना माननीय मंत्र्यांकडून चुकीच्या गोष्टी रेकॉर्डवर येऊ नयेत हे निदर्शनास आणण्यासाठी मी उभा आहे. अद्यापही एलबीटी रद्द करण्याबाबतचा पर्याय स्पष्ट झालेला नाही. बीड येथील रेल्वे प्रकल्पाबाबतचा मी मुद्दा मांडला होता. चार प्रकल्पांकरिता 68 कोटी रुपये ठेवले आहेत. केंद्र सरकारने 144 कोटी रुपये दिले आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी स्वतः या संदर्भात लक्ष घालत आहे. मंत्री महोदयांनी हेच सांगितले की, केंद्र सरकारकडून 144 कोटी रुपये उपलब्ध झाले तर तेवढीच मॅचिंग ग्रँट राज्य सरकारकडून दिली जाईल. 60 कोटी रुपये आले तर 60 कोटी रुपये दिले जातील. 144 कोटी रुपये आले तर 144 कोटी रुपये दिले जातील.

उप सभापती : सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पावरील चर्चा आता पूर्ण झालेली आहे.

नंतर 2बी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : माझ्याकडे दिनांक 25 एप्रिल 2015 रोजीच्या नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या संदर्भातील माझे निर्णय उप सचिव वाचून दाखवतील.

उप सचिव : सन्माननीय सदस्य श्री.जगन्नथ शिंदे यांनी "आरोग्य विभागात पदांची संख्या कमी असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सुविधांअभावी खाजगी रुग्णालयात अधिक पैसे खर्च करावे लागत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे-पाटील यांनी "सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह तंत्रज्ञ,औषधनिर्माता आणि इतर कर्मचाऱ्यांची शेकडो पदे रिक्त असल्यामुळे गोर-गरीब रुग्ण उपचारापासून वंचित राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "औरंगाबाद शहरा लगतच्या 28 गावांसाठी घोषित केलेल्या झालर क्षेत्र विकास योजनेचा निर्णय घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "महामंडळाच्या बसमध्ये अपंग व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांना आधारकार्ड दाखविण्यासाठी वाहकांकडून सक्ती करण्यात येत असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक व अपंगामध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "अलिबाग-पेण (जि.रायगड) मार्गावर कार्लेखिंड येथे दिनांक 23 मार्च 2015 रोजी वाहनांच्या टक्करीमध्ये श्री.दिनेश गोंधळी या तरूणाचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "राज्य शासनाच्या रमाबाई घरकुल योजनेतून कर्ज मंजुरीचे आमिष दाखवून कराड तालुक्यातील व सातारा जिल्ह्यातील महिलांकडून प्रत्येकी रूपये 3700/- घेऊन महिलांची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी "मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातून शासकीय सेवेत प्रवेश मिळण्यावर सामान्य प्रशासन विभागाने घातलेली बंदी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "भुसावळ (जि.जळगाव) येथे तहसीलदार व जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी यांनी शासकीय धान्याचा लाखो रूपयांचा केलेला अपहार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "सन 2001पूर्वी मान्यता असलेल्या कायम विना अनुदान तत्त्वावरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसुविधांसाठी 100 टक्के अनुदान प्रदान करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 2.31 ते 3.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

.....

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मध्यंतरानंतर

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)

पृ.शी.: विनियोजन (लेखानुदान) विधेयक

L. A. BILL NO. XIII OF 2015

(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2015-2016.)

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 13, राज्याच्या एकत्रित निधीतून सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3 अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उप सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लक्षवेधी सूचना क्रमांक एक पुढे ढकलण्याबाबत

तालिका सभापती (श्री. प्रकाश बिनसाळे) : आजच्या कामकाजात दर्शवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक एक पुढे ढकलण्यात आली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 2 घेण्यात येईल.

पृ.शी. : ***महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती महाअभियान या योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील नगरपरिषदांना लोकवर्गणीची अट शिथिल करणे***

मु.शी. : ***महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती महाअभियान या योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील नगरपरिषदांना लोकवर्गणीची अट शिथिल करणे*** यासंबंधी सर्वश्री ***चंद्रकांत रघुवंशी, सुभाष झांबड, वि.प.स,*** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती महाअभियान या योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील नगरपरिषदांना लोकवर्गणीची अट शिथिल करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्र्यांकडे जानेवारी, २०१५ मध्ये करणे, यापूर्वी सुध्दा मा.मुख्यमंत्री यांना अनेक वेळा पत्र देऊन मागणी करणे, त्यावर अद्याप कोणताही निर्णय न होणे, पर्यायाने आदिवासी क्षेत्रातील विषेशत: नंदूरबार, नवापूर, तळोद, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, जव्हार व इतर अशा १० नगरपरिषदांना विकासापासून वंचित ठेवणे, सदर नगरपरिषदांकडे लोकवर्गणीचा निधी उपलब्ध नसल्यामुळे गावातील जनतेला योजनेचा लाभ न मिळणे, पुरेसे शुध्द पाणी न मिळणे, घाणीचे साम्राज्य होणे, रस्त्याला पडलेले प्रचंड खड्डे या सर्व बाबींतून आदिवासी भागातील जनतेला होणारा त्रास, परिणामी आदिवासी शहरी भागातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...3...

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. आदिवासी क्षेत्रामध्ये आदिवासी उपयोजनेतंर्गत महाराष्ट्रातील एकंदर 10 नगरपालिका येतात. महाराष्ट्रातील या 10 नगरपालिकेतील आर्थिक अडचणीमुळे ज्या सेवा सुविधा आदिवासींना मिळावयास पाहिजे त्या सेवा सुविधा या महानगरपालिका आदिवासींना देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती या दहाच्या दहा नगरपालिका तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी आहेत. या दहा नगरपालिकांपैकी केवळ नंदूरबार नगरपालिकेद्वारे नागरिकांना फिल्टर केलेल्या पाण्याचा पुरवठा केला जातो. बाकीच्या गावांना पिण्याचे शुध्द पाणी सुध्दा मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे की, ग्रामपचांयत आदिवासी क्षेत्रामध्ये लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात आली आहे. आदिवासी सबप्लॅनमधील10 नगरपालिकांना कोणत्याही योजनेत म्हणजे महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती महाअभियान योजनेत सहभागी व्हावयाचे असेल तरी देखील 10-20 टक्के लोकवर्गणी भरावी लागते. UIDSSMT योजनेमध्ये केंद्राकडे जरी प्रस्ताव द्यावा लागत असला तरी सुध्दा त्यामध्ये 10 टक्के लोकवर्गणी भरावी लागत असते. त्यामुळे आदिवासी विभागाने लोकवर्गणीचा निधी उपलब्ध करुन द्यावा किंवा आदिवासी क्षेत्रातील नगरपालिकांसाठीची असलेली लोकवर्गणीची अट शासन शिथील करील काय ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यामध्ये लोकवर्गणीचा मुद्दा हा महत्वाचा मुद्दा आहे. आदिवासी उपयोजनेमध्ये ज्या 10 नगरपालिका येतात या नगरपालिकांमध्ये असलेल्या विविध योजनांसाठी आदिवासी विकास विभागामार्फतच पैसा खर्च केला जात असतो. आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये ज्या 10 नगरपालिका आहेत या नगरपालिकांच्या विविध विकास कामांसाठी आदिवासी विकास विभागाचाच पैसा जात असतो फक्त तो नगरविकास खात्याकडून जात असतो.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा.....

नगरपालिकेने त्यांचा लोकवर्गणीचा 10-15 टक्के हिस्सा भरला पाहिजे. हे पैसे आदिवासी विकास विभागाने भरावेत किंवा लोकवर्गणीची अट शिथिल करावी अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, लोकवर्गणीची अट शिथिल करावी किंवा कसा हा मुख्य विषय नगर विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागाशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, लोकवर्गणीची अट शिथिल करावी किंवा कसे हा विषय नगर विकास विभागाशी संबंधित विषय आहे. मंत्री महोदय दिशाभूल करीत आहेत. पाणी पुरवठा विभागामार्फतच नगरपालिकेच्या पाण्याच्या योजन घेतल्या जातात. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठ्याच्या योजना घेण्यात येतात आणि या सर्वांचा मुख्य विभाग हा पाणी पुरवठा विभाग आहे. माननीय श्री.अजित पवार हे उप मुख्यमंत्री असताना त्यांनी 10 टक्के लोकवर्गणीची अट काढून टाकली होती. माझा प्रश्न आहे की, नगरपालिका क्षेत्रासाठी असलेली लोकवर्गणीची अट काढण्यात येईल काय ? सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी विचारलेला प्रश्न योग्य आहे. लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात येत नसेल तर ती रक्कम आदिवासी विभागामार्फत भरण्यात येईल काय ? या 10 नगरपालिका आदिवासी उपयोजनेंतर्गत येतात. या सर्व नगरपालिकांना त्यांच्या कामासाठी आदिवासी विकास विभागामार्फत नगर विकास विभागाकडून निधी दिला जातो. माझा प्रश्न आहे की, या नगरपालिकांना किती निधी वितरित करण्यात आलेला आहे ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, नगरपालिकांना किती निधी वितरित करण्यात आला याची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ही लक्षवेधी सूचना 10 नगरपरिषदा संदर्भातील आहे. केवळ नंदूरबार नगरपरिषदेबद्दल नाही. किती निधी देण्यात आला या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे जे म्हणाले ते बरोबर आहे. जे विविध विभाग आहेत त्यामध्ये पाणी पुरवठा विभाग आहे. आदिवासी क्षेत्रातील नगरपालिकांचा प्रश्न आहे. त्या विभागाच्या वेगवेगळ्या योजना आहेत. परंतु ज्या विभागाशी संबंध येत असेल त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा....

विभागाशी सल्लामसलत करावीच लागेल. यामध्ये मुख्य विभाग नगर विकास विभाग आहे ही बाब लक्षात घ्यावी. तेव्हा नगर विकास विभागाशी विचारविनिमय करून पुढील कार्यवाही करता येईल. आम्ही या विषयाबाबत सकारात्मक आहोत. आदिवासी उपयोजनांमधील योजनांसाठी आदिवासी उपयोजनांमधील निधी देण्यात येतो. या ठिकाणी लोकवर्गणीची अट शिथिल करणे किंवा ती आदिवासी विकास विभागाने भरणे हा विषय आहे. आपणास त्याचाही विचार करता येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मंत्री महोदय अतिशय चुकीचे उत्तर देत आहेत. नगर विकास विभाग नागरी आदिवासी सुधार योजनेसाठी फक्त वर्षाला पाच ते सहा कोटी रुपये देते. या व्यतिरिक्त नगर विकास विभाग कोणत्याही योजनेला पैसे देत नाही. या ठिकाणी नगर विकास विभागाचे राज्यमंत्री उपस्थित आहेत. या 10 नगरपरिषदांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळत नाही. फक्त नंदूरबार नगरपरिषदेला शुद्ध पाणी मिळत आहे. तेथील गावे लोकवर्गणी भरु शकत नाही म्हणून ती गावे शासकीय योजनांपासून वंचित आहेत. मागील सरकारने आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना लोकवर्गणीची अट शिथिल केली होती. लोकवर्गणी अट शिथिल करावी किंवा ती रक्कम आदिवासी विकास विभागाने भरावी असे माझे म्हणणे आहे. आदिवासी विकास विभागासाठी वर्षाला पाच हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. शहरी भागाकडे दुर्लक्ष होता कामा नये. माझा प्रश्न आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी नगर विकास विभाग आणि आदिवासी विकास विभाग या दोन विभागांनी या संदर्भात एकत्रित नोट तयार करून ती मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येईल काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या विषया संदर्भात नगर विकास विभागाशी चर्चा करून आपणास पुढे जाता येईल. आदिवासी विकास विभागामार्फत नोट तयार करून मंत्रिमंडळापुढे जावे असे होणार नाही. कारण या प्रकरणी नगर विकास विभागाशी सल्लामसलत करावी लागेल. त्या विभागाशी चर्चा केल्यानंतरच निर्णय घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हा प्रश्न दहा नगरपरिषदां संबंधातील आहे. श्री.विष्णू सवरा हे आदिवासी विकास विभागाचे मंत्री आहेत. त्यांनी नगर विकास विभागाला दणकून सांगितले पाहिजे की, हा माझ्या आदिवासी समाजाचा प्रश्न आहे. आपण ते काम केलेच पाहिजे. लोकवर्गणीची अट शिथिल करावी किंवा तसे होत नसेल तर ती रक्कम आदिवासी विकास विभागाने भरावी. हा संवेदनशील विषय आहे. आपण आदिवासींच्या प्रगतीसाठी ठोस अशी पॉलिसी स्वीकारणार काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, एखाद्या बाबी संबंधी निर्णय घेत असताना त्यामध्ये दोन विभागांचा संबंध येत असेल तर त्या विभागाशी चर्चा करणे आवश्यक आहे. आदिवासी बांधवांना न्याय देण्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. या संदर्भात नगर विकास विभागाशी लवकरात लवकर बैठक घेण्यात येईल.

तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे): मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळाले पाहिजे. या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत उपस्थित आहेत. त्या भागात वॉटर प्रोन डिसीज मोठ्या प्रमाणावर आहे. तेव्हा त्या भागात शुद्ध पाणी देणे हे शासनाचे काम आहे. आपण जर तर अशी उत्तरे न देता, हा प्रश्न कसा सोडविता येईल हे पहावे. केवळ पैशाअभावी नगरपालिका या योजना राबवू शकत नसतील तर त्या योजना राबविण्याच्या दृष्टीने तातडीने जो काही प्रस्ताव असेल तो मंत्रिमंडळापुढे घेऊन जाणे गरजेचे आहे. आपण तसे तातडीने करावे असे मी निर्देश देत आहे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, ठीक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : नागपूर येथील अंबाझरी तलाव व उद्यानाची झालेली दुरवस्था

मु.शी. : नागपूर येथील अंबाझरी तलाव व उद्यानाची झालेली दुरवस्था यासंबंधी श्री.प्रकाश गजभिये,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर येथील नागपूरचे गौरव असलेल्या अंबाझरी तलाव व उद्यान याची झालेली दुरवस्था, या उद्यानातील नौकाविहार, संगीतकारंजे, मिनीट्रेन व पायदल बोट हळूहळू बंद होण्याच्या मार्गावर असणे, या उद्यानाचे पुनर्जीवन करण्यासाठी तेथील नागरिकांची बऱ्याच वर्षापासून होत असलेली मागणी, त्या मागणीकडे सतत होत असलेले दुर्लक्ष, सध्या अंबाझरी तलाव व उद्यानाचे शेगाव येथील आनंद सागर उद्यानाच्या धर्तीवर विकास करण्याची बाब विचाराधीन असणे, परंतु निधी अभावी हे काम प्रलंबित असणे, वेळोवेळी तक्रारी करुन, धरणे, आंदोलने करुनसुध्दा अंबाझरी तलावाची व उद्यानाची दुरुस्ती न केल्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, हे तलाव व उद्यान खाजगी विकासकांकडे सोपविण्याचा करण्यात येत असलेला प्रयत्न, या तलावाची व उद्यानाची त्वरीत दुरुस्ती करुन बंद असलेले कारंजे व इतर सुविधा पुरविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." "

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, नागपूर या उपराजधानीमध्ये नागपूरचा गौरव असलेल्या अंबाझरी तलाव व उद्यानाची दुरवस्था झालेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मान्य करण्यात आले की, 1992-93 मध्ये त्या उद्यानात दोन कारंजे लावले होते व त्यानंतर ते बंद पडले. गेल्या 22 वर्षांपासून त्या उद्यानाची दुरवस्था झालेली आहे. नागपूर शहरातील अत्यंत ऐतिहासिक असा हा तलाव आहे. त्या तलावाच्याच बाजूला गेस्ट हाऊस बांधले होते. त्या ठिकाणी पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सुध्दा वास्तव्य केले होते. त्यामुळे अंबाझरी उद्यानाची दुरवस्था होणे योग्य नाही. महोदय, नागपूर येथील लोकांनी त्या उद्यानाची दुरुस्ती आणि कायापालट कधी होणार यासाठी वारंवार पत्रव्यवहार केला होता. त्या उद्यानाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी 1997 मध्ये एका खाजगी संस्थेला ठेका देण्यात आला होता. परंतु त्यांच्या माध्यमातून सुध्दा विकास झाला नाही. महोदय, नागपूर शहराच्या मध्यभागी असलेल्या अंबाझरी तलावाचे सौंदर्यीकरण केले जात नाही, त्या ठिकाणी बोटी चालविल्या जात नाहीत. माननीय मुख्यमंत्री हे नागपूरचे आहेत. त्यांच्याच मतदारसंघात हा तलाव आहे. त्यामुळे आमची अपेक्षा आहे की, त्या तलावाचा विकास झाला पाहिजे. आतापर्यंत महापालिकेच्या माध्यमातून त्या तलावाचा विकास केला गेला. परंतु गेल्या 15 वर्षांपासून त्या ठिकाणी कसलेही विकासात्मक काम करण्यात आलेले नाही. महोदय, या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, महापालिका त्या तलावाचे सौंदर्यीकरण करीत नसेल, बोटींग सुरु करीत नसेल तर शासनाच्या किंवा महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून त्याचा विकास करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, अंबाझरी तलाव जुना असून ते नागपूरचे वैभव आहे. त्या तलावालगत 45 एकरचे उद्यान आहे. त्या उद्यानात ॲम्युजमेंट पार्क अंतर्गत नौकाविहाराची साधने, मनोरंजनाच्या खेळाची साधने, उपाहारगृह, पायडल बोट इत्यादी वगैरे बऱ्याच गोष्टी विकसित करता येतात. त्या उद्यानात कारंजे, संगीत कारंजे सुरु करुन त्या ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करु शकतो. शिवाय त्या ठिकाणी तिकीट आकारुन महापालिकेला उत्पन्नाचे साधन मिळू शकते. सध्या त्या ठिकाणी कारंजे आणि संगीत कारंजे आहेत. पण ॲम्युजमेंट पार्कचे साहित्य उदाहरणार्थ ट्रेन आणि बोटीचे आयुर्मान संपल्यामुळे त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बंद आहेत. त्या सुरु करण्यासाठी महापालिकेने दोन-तीन वेळा प्रयत्न केले. या बाबतीत दोनदा निविदा मागविल्या होत्या. परंतु त्यास पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या तलाव व उद्यानाचा विकास पीपीपी आणि बीओटी तत्त्वाच्या माध्यमातून करता येईल काय, या बाबत सुध्दा प्रयत्न करण्यात आले. परंतु त्याला सुध्दा पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. महोदय, सदरहू उद्यान विकसित करण्यासाठी महापालिकेने विदर्भात शेगाव येथे ज्यांनी आनंद सागर हे उद्यान विकसित केले आहे त्यांच्यासोबत करार केला आहे. त्यांच्या स्तरावरुन सदरहू कामास विलंब होत असेल आणि त्यांच्याकडून काम होत नसेल तर शासन यामध्ये उतरेल काय, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. मी सांगू इच्छितो की, शासनाची या बाबतीत सकारात्मकच भूमिका राहील. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, संबंधितांकडून हे काम होत नसेल तर एमटीडीसी किंवा अन्य एजन्सीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेकडून आला तर त्यावर विचार करण्यात येईल.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, 2002 पर्यंत अंबाझरी पार्क चालविण्याचे काम एका व्यक्तीला देण्यात आले होते. त्यावेळी त्या ठिकाणी बरीच ॲम्युजमेंट उपकरणे लावण्यात आली होती. मी विचारु इच्छितो की, हे उद्यान नागपूरच्या दृष्टीने भूषणावह असताना ते का बंद करण्यात आले ? सदरहू उद्यानाच्या देखभाल व दुरुस्तीचे काम बीओटी तत्त्वावर करण्याबाबतची मागणी महापालिकेने केली होती. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, त्या बाबतचा प्रस्ताव राज्य सकारकडे आला आहे काय, आला असल्यास, तो केव्हा आला होता आणि त्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, 2004 पर्यंत त्या उद्यानातील सर्व उपकरणे सुरु होते. परंतु कालानुरुप ॲम्युजमेंट पार्कमधील काही बाबी उदाहरणार्थ बोटस्, ट्रेन यांचे आयुर्मान संपल्यामुळे त्या सुरु करण्यासाठी ज्याच्याकडे हे काम होते त्यांच्याकडून प्रयत्न करण्यात आला नाही. त्यामुळे महापालिकेने स्वत:च्या स्तरावर या संदर्भात दोनदा प्रयत्न केला. या कामी निविदा मागविल्या, परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पीपीपी किंवा बीओटी तत्त्वातून हे काम करु शकतो काय, या बाबतचा प्रयत्न करण्यात आला. या कामी व्ही.के.सराफ व निलेश रॉय या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दोन सल्लागारांची नेमणूक केली गेली. परंतु त्यांचे काम असमाधानकारक होते. त्यांनी प्लॅन सबमिट केले नाही. महोदय, हे काम कोण करतो यापेक्षा अंबाझरी तलावाला पुन्हा वैभव प्राप्त करून देऊ शकलो तर चांगले होईल, असे मला वाटते. महापालिकेकडून हे काम करण्याबाबतचा प्रस्ताव आला तर शासन स्वत: पुढाकार घेऊन ते काम एमटीडीसीकडून करून घेण्याचा प्रयत्न करेल.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, मी पुन्हा सांगू इच्छितो की, नागपूर महापालिकेने तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविला होता. बीओटी तत्त्वावर काम करावयाचे असेल तर त्याबाबत पूर्वपरवानगी घेण्यासाठी नोडल ऑफिसर श्री.सक्सेना यांच्याकडे तो प्रस्ताव पाठविला होता. त्या प्रस्तावाच्या बाबतीत काय निर्णय झाला आणि त्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, शासनाकडे नागपूर महापालिकेचा कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही. जर महापालिकेकडून या संदर्भातील प्रस्ताव आला तर त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी नागपूर शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी कबूल केले आहे की, 2007 पासून त्या पार्कमधील सर्व उपकरणांचे आयुर्मान संपल्यामुळे ते बंद आहेत. शिवाय त्यांनी असेही सांगितले की, या कामासाठी दोन सल्लागार नेमले होते व त्यांनी काम केले नाही. नागपूर महापालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे ती हे काम करु शकली असती. परंतु हे काम करण्याची त्यांची इच्छाशक्ती दिसत नाही, असाच यातून दुसरा अर्थ ध्वनित होतो. परंतु या बाबत मी टिप्पणी करु इच्छित नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारल्यानुसार अंबाझरी उद्यानाच्या विकासासाठी राज्य सरकार वैशिष्ट्यपूर्ण अनुदानातून निधी उपलब्ध करून देणार काय ? तसेच दुसरी बाब अशी की, नागपूर परिसरात नागपूर सुधार प्रन्यास ही संस्था काम करते. त्यांच्याकडे सुध्दा मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध आहे. नागपूरचे वैभव टिकविण्याची राज्य सरकारची प्रामाणिकपणे मानसिकता असेल तर खास बाब म्हणून या योजनेला आजच मंजुरी देऊन मर्यादित कालावधीत ते काम पुन्हा सुरु करण्याचे आदेश देण्यात येतील काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सूचना केली की, या कामी एनआयटीला सहभागी करून घ्यावे. या निमित्ताने सांगतो की, एनआयटीला कोणत्या ना कोणत्या कारणाने सहभागी करून घेऊ शकतो. त्यामुळे या कामामध्ये एनआयटीला सहभागी करून घेता येईल. त्यांच्याकडून जे योगदान घ्यावयाचे आहे ते घेऊन सदरहू उद्यानाची पुढील देखभाल व दुरुस्ती किंवा ते चालविण्यासाठी जे काही करणे आवश्यक आहे ते करता येईल. तसेच ही बाब मर्यादित कालावधीत करण्यात येईल.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, अंबाझरी तलावाच्या सौंदर्यीकरणाचा प्रस्ताव बीओटी वा पीपीपी तत्वावर फिजीबल होईल की नाही यासाठी संपूर्ण राज्यात केवळ अजय सक्सेना या एकाच कन्सलटंटची नेमणूक केली होती, हे खरे आहे काय ? त्यांच्याकडे या उद्यानासंदर्भातील प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या निमित्ताने मी विचारतो की, त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाचे पुढे काय झाले ?

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. शासन महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन लिमिटेड कडून एक नोडल म्हणून नेहमी सल्ला घेत असते. आपण याबाबतीत सुध्दा मे. लिंक लिगल, दिल्ली यांच्याकडे कायदेशीर बाबी तपासणीसाठी अपॉईंटमेंट अंतिम केली आहे आणि त्या दृष्टीने विचार सुरू आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यापूर्वी माननीय मंत्र्यांनी आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली असती तर या प्रश्नावर वितंडवाद करण्याची काही गरज लागली नसती. माननीय मंत्र्यांनी अंबाझरी उद्यानाबद्दल चांगली माहिती दिली. अंबाझरी उद्यान हे नागपूरचेच नव्हे तर विदर्भाचे वैभव आहे. मुख्यमंत्री साहेबांच्या बालपणी त्यांच्या अनेक पिकनिक, ट्रिप तेथे गेल्या असतील. अंबाझरी तलाव हे नागपूरचे वैभव आहे. पूर्वी पिण्याचे पाणी तेथून मिळायचे. एवढ्या वैभवशाली तलावाची दुरवस्था झाली आहे. आपण जुने वैभव प्राप्त करून देण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करणार का, माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करून लवकरात लवकर हा प्रश्न सोडविणार का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने शासनाला एक प्रश्न विचारावासा वाटतो. आपण सगळीकडे बांधा, वापरा, हस्तांतरित करा अशी शासनाची काम करण्याची पध्दत रूढ करणार आहात का ? फार मोठे तंत्रज्ञान लागणार आहे अशा प्रकल्पांसाठी बांधा, वापरा, हस्तांतरित करा अशा योजना घेता येतात. शहरातील महत्त्वाच्या अंबाझरी उद्यानाच्या विकासाच्या संदर्भात अशी कोणती अडचण आहे की, त्यामध्ये फार मोठ्या तांत्रिक ज्ञानाची गरज आहे ? शहराचे वैभव टिकविण्यासाठी आणि तेथील सर्व सोयी ताबडतोबीने करण्यासाठी बांधा, वापरा व हस्तांतरित करा वगैरेची गरज नाही. मनपाने चांगल्या प्रकारचा इनिशिएटिव्ह घेतला, नागपूरच्या नागरिकांचा सहभाग घेतला तर हे होईल. नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टचा उल्लेख केला गेला. नागपूरमध्ये नेरी देखील आहे. राज्य पातळीवरील अतिशय महत्त्वाच्या संस्था नागपूरमध्ये काम करतात, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

आपण एखाद्या गावात असा प्रयोग का करू शकत नाही ? आपण संबंधित असलेल्या सर्व लोकांना आणून एक आराखडा तयार करावा आणि नागरिकांच्या सहभागातून काम करावे, इतर कोणीही ठेकेदार, एजन्सी घेण्यापेक्षा नागरिकांच्या सहभागातून उद्यान उभे करता आले तर खूप चांगले होईल. आपण शासनामार्फत असा नवीन प्रयोग करावा. एमटीडीसी सारख्या संस्थांचा सल्ला जरूर घ्यावा, त्यांची मदत जरूर घ्यावी. काम करणारे लोक शहरातील असावेत. मनपाने यासाठी स्वतंत्र समिती नेमावी, समितीला हे काम द्यावे, समितीच्या मार्फत हे काम लोकांच्या समोर आणावे. शासनाकडून अशा पध्दतीचा काही वेगळा विचार करता येऊ शकेल का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचे म्हणणे बरोबर आहे. इंटिग्रेटेड प्लॅन असला पाहिजे. छोट्या मुलांची ॲम्युजमेंट राईडस, तरण तलाव डेव्हलप करायचे असेल तर खूप मोठ्या प्रमाणात टेक्नॉलॉजी लागत नसली तरी त्याच्या सिक्युरिटीसाठी काही खबरदारी घेणे गरजेचे असते. पण हे निश्चितपणे बरोबर आहे की याला काही खूप मोठी टेक्नॉलॉजीकल सपोर्ट लागत नाही. राज्याच्या योजना पीपीपीमध्ये राबवायच्या का हे बरोबर आहे. आपल्याला सस्टेनॅबिलिटी गरजेची असते. प्रॉफिट असेल तर ते सस्टेन होईल. त्यामुळे जबाबदारी देण्यात आली. आपल्याला माहीत आहे की, एखाद्या कामावर बराच खर्च होतो, मात्र त्यानंतर 4-5 वर्षांनी तेथे काहीही दिसत नाही. पीपीपी तत्वावर, बीओटी तत्वावर एखादे काम केले तर सस्टेनॅबिलिटी होईल. त्यामुळे आपण हे खुले ठेवले आहे. निधीचा प्रश्न नाही. फक्त सिटिझन सेंटरिक असले पाहजे. सन्माननीय सदस्य म्हणाले की, लोकांचा सहभाग असल्याशिवाय यश मिळत नाही. आपण त्या दृष्टीने एखादी समिती स्थापन करू. महत्त्वाची कार्यालये तेथे आहेत. सर्वांचा थोडा सहभाग घेऊ, म्हणजे जबाबदारी सुध्दा येईल आणि त्यांना अधिकार सुध्दा वाटेल. शासनाकडून त्या दृष्टीने करता आले तर त्यासाठी सुध्दा निश्चितपणे विचार करता येईल.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले की, या संदर्भात समिती करण्यात येईल. मी म्हणतो की, आपणाला ज्या कोणाचा सल्ला घ्यायचा असेल तो घ्या. 22

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

वर्षे त्याकडे दुर्लक्ष झाले आहे, कोणीही तेथे जात नाही. ते ठिकाण आत्महत्यांचा अड्डा बनला आहे. आपल्याला या संदर्भात निर्णय घेणे गरजेचे आहे. आपण अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात निर्णय घेणार का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, लवकरात लवकर याबद्दलचा निर्णय घेण्यात येईल. समिती स्थापन करण्यासाठी प्रत्यक्षात करस्पॉन्डन्स करावा लागेल आणि त्यासाठी थोडासा अवधी लागेल. समिती स्थापन करण्यात येईल.

लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलणे

तालिका सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेत क्रमांक-4 वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : बीड कृषी उत्पन्न बाजार समिती सन 2002 मध्ये बहिरवाडी, ता. बीड येथे स्थलांतरित होणे.

मु.शी. : बीड कृषी उत्पन्न बाजार समिती सन 2002 मध्ये बहिरवाडी, ता. बीड येथे स्थलांतरित होणे यासंबंधी श्री. विनायक मेटे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"बीड कृषी उत्पन्न बाजार समिती यामध्ये सन 2002 साली बहिरवाडी, ता.बीड येथील 50 एकर जागेत समितीचे स्थलांतर होणे, तसा प्लॉन लेआऊट ग्रामपंचायतीने लीजवर देण्याचा ठराव केलेला असताना आतापर्यंत लीज न होणे, या बाजार समितीने एकूण 146 प्लॉट वाटप केलेले असणे, परंतु अद्यापही सदरील प्लॉटधारकांचे भाडेकरार बाजार समितीने नोंदणीकृत केलेले नसणे, याबाबत सदरील बाजार समितीमधील व्यापाऱ्यांनी खरेदीखत न होता गाळ्याचे स्वखर्चाने बांधकाम करणे, बाजार समितीने जागा खरेदीमध्ये केलेला प्रचंड भ्रष्टाचार, चौकशी वेळेस मुख्य नियंत्रक, महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी रेडी रेकनर या वरुन बाजार समितीने खरेदी केलेल्या हेक्टरी प्रती फूट चौ. 30 पैसे भाड्याचे मूल्यांकन न दर्शविणे, सदरील शासनाच्या रेडी रेकनरमध्ये समितीची जागा राखीव असे नमूद करुनही सब रजिस्ट्रार यांनी पदाचा गैरवापर करुन जागेचे मूल्यांकन करणे, परंतु अद्याप त्याचा खुलासा न करणे, सदरील जागा राखीव असतानाही संचालक मंडळाने प्रयत्न करणे गरजेचे असतानाही बाजार समितीचे हित न पाहणे, याबाबत सदरील अनियमित व्यवहारास तत्कालीन व विद्यमान सभापती, उप सभापती, सचिव व सर्व संचालक मंडळ जबाबदार असणे, यामध्ये शासनाची, व्यापाऱ्यांची व शेतकऱ्यांची झालेली फसवणूक, सर्वसाधारण मतदारांमध्ये पसरलेला असंतोष व बाजार समिती विरोधात तीव्र प्रतिक्रिया, याबाबत शासनाने करावयाची कारवाई."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, ज्याप्रमाणे गुन्हेगारांचे अड्डे असतात त्याप्रमाणे बीड कृषी उत्पन्न बाजार समिती भ्रष्टाचाराचा अड्डा बनली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि काही मंडळी यांनी या अड्ड्यांचे भ्रष्टाचाराच्या कुरणामध्ये रूपांतर केले आहे. एवढा वाईट कारभार, भ्रष्टाचार राज्यात कुठेही पहायला मिळाला नसेल. फार मोठा भ्रष्टाचार आहे. काळजी असणाऱ्या काही संचालकांनी याची चौकशी व्हावी म्हणून 19 मुद्दे दिले आहेत. मी ते सर्व मांडणार नाही. फक्त 3 मुद्यांबद्दल सांगेन. जुनी मार्केट समिती स्थलांतरित केली, त्यानंतर जमीन घेणे, बांधणे, विकणे, लिज करणे, नोंद करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी यापैकी कोणतीही प्रक्रिया पार पाडली नाही. मनमानी पध्दतीने कारभार केला. जागा कमी पैशात विकली, भाडे कमी घेतले, अत्यंत कमी दर दाखवून शासनाचे, मार्केट समितीचे शेकडो कोटी रूपयांचे नुकसान केले. लिज न करता, नोंदणी न करता अनधिकृतपणे अनेक वर्षांपासून ही मार्केट कमिटी सुरू आहे. जुनी मार्केट कमिटी शिफ्ट झाल्यानंतर तेथे राहिलेली जमीन आणि गाळे हे जाहिरात न काढता, लिलाव न करता विकून टाकले. जुने गाळे लिलाव न करता, जाहिरात न देता विकले. खुली जागा सुध्दा पूर्णपणे विकून टाकली. असलेल्या रोडमधील अर्धा रोड विकला. करोडो रूपयांचा घपला केला. त्यामुळे तत्संदर्भात चौकशी होणे, संबंधितांवर गुन्हे दाखल होणे गरजेचे आहे, शासन तसे करणार का ?

सभापती महोदय, मार्केट कमिटीशी संबंधित उडीद घोटाळ्याचा देखील प्रश्न आहे. या कमिटीने बँकेत 120 कोटी रूपये ठेवून फ्रॉड केला आहे. गजानन नागरी सहकारी बँक असे त्या बँकेचे नाव आहे. जेव्हा 4300 रूपये भाव होता तेव्हा बाहेरच्या ठिकाणाहून 2200 रूपयांनी उडीद खरेदी करून पणन विभागाला 4300 रूपयांनी विकली.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे.....

अशा प्रकारे प्रति क्विंटल 2 हजार रुपयांचा गफला त्या ठिकाणी केलेला आहे. यामध्ये साधारणपणे 120 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. गजानन नागरी सहकारी बँक या एकाच बँकेतून सर्व चेक वटलेले आहेत. या संदर्भात चौकशी करण्याचे आणि गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, मागील सरकारने ही फाईल आणि त्या माध्यमातून हा भ्रष्टाचार दाबून ठेवलेला आहे. त्यामुळे नवीन बाजारपेठेच्या जागेची लिज न करणे आणि भ्रष्टाचाराबाबत शासन चौकशी करणार आहे का ? जुन्या बाजारपेठेतील मोकळ्या जागा, रोड या संदर्भात गैरप्रकार करण्यात आलेले आहेत, त्याबाबत चौकशी करणार का ? उडीद खरेदी घोटाळ्यातील दोषींवर गुन्हे नोंद करण्याचे आदेश देण्यात आले होते, ते आता नोंदविणार आहात का आणि या सर्व प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करणार का ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी काही प्रश्न येथे उपस्थित केले आहेत. कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी बाजारपेठेसाठी नवीन जागा खरेदी केली आणि जुनी जागा विक्री केली आहे. निश्चितपणे या व्यवहारामध्ये काहीअंशी अनियमितता झालेली आहे. जुनी 14 एकर जागा विकण्यात आली असून नवीन 49 एकर 18 गुंठे जागा खरेदी करण्यात आली आहे. नवीन जागा खरेदी करीत असताना आणि जुनी विक्री करीत असताना लिलावाव्दारे विकणे अपेक्षित होते. त्यांनी 37 गाळे लिलाव न करता विक्री केले आहेत तर 85 गाळे लिलावाने विकले आहेत. 15 गाळे भाडेतत्त्वावर दिलेले आहेत. अशा एकूण 122 गाळ्यां संदर्भातील हा प्रश्न आहे. गाळेधारकांकडून साधारणपणे 1 कोटी 85 लक्ष एवढे डिपॉझिट मिळणे अपेक्षित असताना केवळ 87.20 लक्ष रुपये एवढेच डिपॉझिट प्राप्त झाले आहे. रोड आणि मोकळ्या जागेसंदर्भातील प्रश्न आहे. निश्चितपणे या संदर्भात चौकशी करण्याची आवश्यकता आहे. शासन त्याप्रमाणे चौकशी करील.

सभापती महोदय, उडीद घोटाळ्यासंदर्भातही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. सन 2011-2012 मध्ये एमएसपी 4300 रुपये असताना कृषी विभाग आणि महसूल विभागाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या भागामध्ये उडीदचा पेरा झाला नव्हता. अशा परिस्थितीत

...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.....

मोठ्या प्रमाणात दुसरीकडून उडीदाची खरेदी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. बाहेरून खरेदी करताना ती 2800 रुपये दर होता आणि एमएसपी चा दर 4300 रुपये होता. अशा प्रकारे यामध्ये 1500 रुपयांचा फरक आहे. हा व्यवहार खरेदी विक्री संघाने केलेला होता व तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. या संदर्भात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे आदेश शासनाने सन 2013 मध्ये दिले होते. परंतु, त्यानंतर या बाबत फेरविचार करण्यासाठी हे प्रकरण कोकण विभागीय आयुक्तांकडे सोपविण्यात आले. गुन्हा घडला असताना, गुन्हा शाबित झाला असताना फेरविचार करण्यामध्ये दीड वर्षाचा काळ लोटला आहे. या संदर्भात शासन स्तरावर जे काही फेरविचारा संदर्भातील प्रलंबित प्रश्न आहेत, त्याबाबत आणि शासनाच्या सन 2013 च्या आदेशानुसार गुन्हे दाखल करण्याबाबत आजच्या आज कार्यवाही करण्यात येईल.

श्री.गोपीकिशन बजोरिया : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, "नवीन जागा खरेदी करण्याचा निर्णय घेवून सर्वे क्रमांक 29 व 33/1 तरफ बोबडे मौजे बहिरवाडी, एम.आय.डी.सी.कुर्ला रोड, बीड या ठिकाणी 13 शेतकऱ्यांची अंदाजे 50 एकर जागा खरेदी करून बाजारपेठ निर्माण केलेली आहे." याच निवेदनाच्या पुढील भागात असे म्हटले आहे की, "शासनाच्या रेडिरेकनरमध्ये बाजार समितीची सदरची जागा राखीव असे नमूद असल्याने बाजार समितीने उप जिल्हा निबंधक (मुद्रांक) बीड यांच्या बाजारमूल्य तक्त्यामध्ये सर्व्हे नं 29 व 33/1 चे मूल्यांकन दराचा समावेश करणेबाबत त्यांचे कार्यालयास दिनंक 20/11/2010 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. परंतु, अद्यापपर्यंत शासनाच्या मूल्यांकन तक्त्यामध्ये त्यांनी समावेश केलेला नाही व त्याबाबतची कोणतीही माहिती बाजार समितीकडे अद्यापपर्यंत प्राप्त वा उपलब्ध झालेली नाही." माझा प्रश्न असा आहे की, ही जागा किती रुपयांमध्ये खरेदी केली आहे आणि रेडिरेकनरचा दरच माहीत नसेल तर अशी जागा खरेदी करता येते का ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, नवीन बाजारपेठ स्थापन झाल्यानंतर त्या ठिकाणी एकूण 146 प्लॉट निर्माण करण्यात आले. त्यामधील फक्त दोन दस्तांची नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी एका संस्थेस नवीन उद्योग घटक असल्यामुळे मुद्रांक शुल्क माफ आहे तर दुसरा प्लॉट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.....

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांना 29 वर्षासाठी भाडेपट्टयाने दिलेला असून खुल्या जमिनीचा रु 284/- चौ.मी.हा दर लक्षात घेऊन रु.31,500/- मुद्रांक शुल्क व रु.10500/- नोंदणी फी घेऊन नोंदविण्यात आलेला आहे. म्हणजे, प्रत्यक्षात एकच खरेदी व्यवहार झालेला आहे. अन्य बाबतीत बाजार मूल्य तक्त्यामध्ये मूल्यांकन दराचा समावेश करणेबाबत दिनांक 20/11/2010 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. रेडिरेकनरचे भाव निश्चित झालेले नसताना जागा कोणत्या आधारावर खरेदी केली आहे ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, रेडिरेकनरच्या भावाप्रमाणे विक्री करण्याबाबतचा हा विषय आहे. त्या ठिकाणी 146 प्लॉट होते. फक्त दोन प्लॉटची विक्री झालेली आहे. त्यापैकी एका प्लॉटला मुद्रांक शुल्काची सूट मिळालेली आहे आणि दुसरा प्लॉट महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला प्रति चौरस फूट 284/- याप्रमाणे दिलेला आहे. एकाच प्लॉटची विक्री झाली असून अन्य प्लॉटची विक्री अद्याप झालेली नाही. रेडिरेकनरचे दर कळविण्याबाबत दिनांक 20/11/2010 रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे, हे मी पूर्वीच सांगितले आहे. आजतागायत कोणत्या भावाने विक्री करावी, हा प्रश्न सुटलेला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या बाजार समितीची एकूण वार्षिक उलाढाल किती आहे ? मी एवढ्यासाठी प्रश्न विचारतो आहे की, बाजार समिती स्वतः खरेदी, विक्रीचे व्यवहार करीत नाही. या बाजार समितीने उडीद खरेदी केली आहे. बाजार समितीने 2800 रुपयांनी खरेदी केली व त्यावेळी एमएसपी 4300 रुपये होता. बाजार समिती व्यवहार करीत नाही. त्या ठिकाणी असलेले एजंट, तालुका संघ किंवा व्यापारी व्यवहार करीत असतात व बाजार समिती कमिशन घेत असते. खरेदी करणे हा बाजार समितीचा रोल नाही. बाजार समितीमध्ये सहायक निबंधक हे पदसिध्द संचालक असतात. सहकार विभागाचे अधिकारी आणि सहायक निबंधक यांनी मोठ्या संस्थांमध्ये भेट देणे आवश्यक असते. एवढा मोठा व्यवहार होत असताना त्याबाबतची चौकशी या अधिकाऱ्यांनी केली आहे का, एवढा मोठा भ्रष्टाचार होत असताना या अधिकाऱ्यांनी तेथे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

भेट दिलेली आहे का, त्यांनी या संदर्भात भेट दिली नसेल, चौ्कशी केली नसेल तर त्यांच्याविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? त्याचप्रमाणे ओपन स्पेस, रस्ते विकण्याचा अधिकार कोणालाही नाही. तशा प्रकारे ते विकले गेले असतील आणि त्याची नोंदणी झाली असेल तर नोंदणीस परवानगी देणाऱ्या संबंधित नोंदणी अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी या अगोदर सांगितले होते की, सन 2011-2012 मध्ये या गुन्ह्यांच्या संदर्भात सखोल चौकशी झालेली आहे. गुन्हे दाखल करण्याचे आदेश राज्य शासनाने यापूर्वीच दिले आहेत. तत्कालीन राज्य शासनाने फेर विचार करण्यासाठी विभागीय आयुक्तांकडे हे प्रकरण वर्ग केले होते, त्यानुसार ते प्रलंबित होते. याबाबत आजच्या आज गुन्हे दाखल करण्याचे मी संबंधितांना आदेश दिले आहेत. ए.आर. हे पदसिध्द संचालक आहेत. चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. दुसरा प्रश्न मिनिमम सपोर्ट प्राईज संदर्भातील होता. त्यावेळी 4300 रुपये मिनिमम सपोर्ट प्राईज होती. बीड जिल्ह्यात व आसपास या पिकाचा पेरा नव्हता. तरी देखील बाजार भावाप्रमाणे 2800 रुपयांची खरेदी करण्यात आली होती. खरेदी विक्री संघाने केलेल्या व्यवहाराची चौकशी झाली आहे, चौकशीत जे दोषी आढळले त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश राज्य शासनाने या अगोदरच दिले आहेत. यात कितीही मोठे लोक असले तरी राज्य शासन त्यांच्यावर गुन्हे दाखल करणारच आहे. याबाबत कोणीही शंका घेण्याचे कारण नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. त्यांनी आजच्या आज गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. मागील सरकारने जाणीवपूर्वक गुन्हे दाखल केले नव्हते. नवीन मार्केट कमिटीने अनधिकृत गाळे बांधले आहेत, व्यवहार सुरु आहेत, ही सर्व कामे अनधिकृतरित्या सुरु आहेत, भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे. याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल काय ? जुन्या मार्केट कमिटीची जागा परवानगी न घेता अनधिकृतपणे विकली आहे, रस्ता व ओपन जागा विकल्या आहेत, याबाबत उच्चस्तरीय चौकशी कमिशनर दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात येऊन दोषी लोकांवर कडक कारवाई करण्यात येणार काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, जी अनियमितता झाली आहे, त्याबाबत जॉईंट डायरेक्टर सहकार यांच्या मार्फत चौकशी करण्यात येऊन चौकशीचा अहवाल दोन महिन्यात प्राप्त करुन देण्याच्या सूचना संबंधित चौकशी अधिकाऱ्यांना देण्यात येतील. या चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "नैसर्गिक वायुअभावी बंद पडलेल्या दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस ॲड पॉवर प्रा.लि.ची महावितरणकडे असलेली रुपये दोन हजार कोटींची थकबाकी, सदर वीज प्रकल्पास रिलायन्स कंपनीकडून होणारा वायूचा पुरवठा बंद होणे" या संबंधी श्री.सुनील तटकरे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक 11 मार्च, 2015 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी./मु. शी. : सोलापूर विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नांव देणे याबाबत ॲड रामहरी रूपनवर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, सोलापूर विद्यापीठाला "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांचे नाव देण्यात यावे, यासाठी अनेक दिवसापासून जनतेतून मोठया प्रमाणात मागणी आहे. यासाठी अनेकवेळा मोर्चे, आंदोलने झालेली आहेत. अहिल्याबाईना जगाने "पुण्यश्लोक" अशी महत्वाची उपाधी बहाल केली आहे. जगामध्ये नळराजा, धर्मराजा, भगवान श्रीकृष्ण व अहिल्याबाई हे पुण्यश्लोक पदवीने गौरविलेल्या महान व्यक्ती आहेत. असे कविवर्य मोरोपंत म्हणतात. अहिल्याबाईंनी चारीधामाचे रस्ते बांधले, विहिरी बांधल्या, तलाव बांधले, अन्न छत्रे निर्माण केली, पाच हजार महादेवाची मंदिरे बांधली. बारा ज्योतिर्लिंगाचा उध्दार केला. त्यांनी नीती चारित्र्यावर आधारित राज्य कारभार केला आहे. अहिल्याबाईंचा जन्म अहमदनगर जिल्हयातील चौंडी या गावी झाला. ते सोलापूर पासून फार थोडया अंतरावर आहे. अहिल्याबाईंचे स्मारक व त्यांची शिकवण पुढच्या पिढीस योग्य मार्गदर्शक ठरणार आहे. त्यामुळे सोलापूर विद्यापीठास त्यांचे नाव देवून एक स्मारक उभे करावे, याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठाला जागा उपलब्ध करुन देणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडते.

"सभापती महोदय, गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यात येणे, विद्यापीठालगत असलेली दहा एकर शेतजमीन खरेदी करिता गोंडवाना विद्यापीठाला जागा मिळण्यासंबंधी 62 कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणे, परंतु सदर प्रस्ताव मंजूर न झाल्याने नवीन इमारत बांधकामाचा प्रश्न रेंगाळत पडला असणे, त्यामुळे सांधन सपत्तीवर आधारित विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु न होणे, त्यामुळे गोंडवाना विद्यापीठाला जागा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, शासनाने यावर करावयाची कार्यवाही. याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : दिनांक 13 ऑगस्ट 2014 रोजी सामान्य प्रशासन विभागाने आदेश काढून मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातून प्रवेश मिळण्यावर बंदी घातल्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांवर होत असलेला अन्याय याबाबत ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, दि.13 ऑगस्ट 2014 रोजी सामान्य प्रशासन विभागाने एक आदेश काढून मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातून प्रवेश मिळण्यावर बंदी घालण्यात येणे, परिणामी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या मागासवर्गीय उमेदवार मोठया हुद्यांच्या अधिका-यांच्या हक्कापासून वंचित राहण्याची आलेली वेळ, याबाबत दलित आदिवासी, भटके विमुक्त आणि ओबीसी यांना लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील नोकर भरतीबाबत दि.13 ऑगस्ट 2014 रोजी काढण्यात आलेले परिपत्रक रद्द करण्यात यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

....6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : वैद्यकीय शिक्षण विभागातील सर्व शासकीय दर करार संपुष्टात आल्यामुळे औषधांकरिता वैद्यकीय संचालकांची परवानगी घ्यावी लागणे याबाबत श्री.मितेश भांगडिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागातील सर्व शासकीय दर करार सन 2012 साली संपुष्टात आले आहेत. दर करार संपुष्टात आल्यामुळे अधिष्ठातांना औषधांकरिता तसेच शल्य चिकित्सेकरिता लागणारे आवश्यक त्या साधनांकरिता वैद्यकीय संचालकांची परवानगी घ्यावी लागत आहे. ज्यामुळे गंभीर व अत्यवस्थ रुग्णांचे फार हाल होत आहे. हृदयरोग चिकित्साशास्त्र करिता वापरण्यात येणारे स्टेंट, बलून, वायर हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे नवीन दर करारामध्ये त्या सर्व संसाधनांची दर्जोन्नती करण्यात येणे अत्यंत आवश्यक आहे. रुग्णालयात औषधांकरिता लागणाऱ्या छोटया खरेदीकरिता वैद्यकीय संचालकांची मंजुरी घेण्यात येण्यापेक्षा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या खरेदीला वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठातांना खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात यावे, जेणेकरुन रुग्णाला रुग्णसेवेकरिता निधी मंजुरीची वाट पहावी लागणार नाही. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : अंगणवाडीमध्ये सीडीपीओ व डेप्युटी सीईओ यांनी केलेला भ्रष्टाचार याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, मौजे घाटपूरी, ता.खामगांव, जिल्हा बुलढाणा येथील अंगणवाडीमध्ये सन 2009 पासून बनावट विद्यार्थी दाखवून सी.डी.पी.ओ. व डेप्युटी सी.ई.ओ. यांनी मोठया प्रमाणात संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. ही बनावट विद्यार्थी संख्या दाखविताना मयत मुलगा विद्यार्थी दाखवून त्याच्या नावावरही एक वर्ष पूरक पोषण आहाराचे वितरण करुन शासनाची फसवणूक केली आहे. सदर अंगणवाडीतील हजेरीपटावर दाखविण्यात आलेले विद्यार्थी हे इतर शाळेमध्ये शिक्षण घेत असून सर्व विद्यार्थी 7 ते 8 वर्षे वयोगटातील आहेत. या विद्यार्थ्यांच्या नावावर पूरक पोषण आहारासाठी कोटयवधी रुपयांची देयके काढण्यात येतात. बनावट अभिलेखे तयार करुन बोगस विद्यार्थी संख्या दाखवून शालेय पूरक पोषण आहारामध्ये तसेच देयकांमध्ये दर्शविण्यात येणाऱ्या वस्तू व साहित्याची खरेदीमध्ये संगनमताने भ्रष्टाचार केल्याच्या तक्रारी वारंवार करुन सुध्दा त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. या भ्रष्टाचार प्रकरणी दोषी असणारे सी.डी.पी.ओ. व डेप्युटी सी.ई.ओ. यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन कडक कारवाई करण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करत आहे."

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : सुधागड (जि.रायगड) तालुका येथे बल्लाळेश्वर देवस्थानकडे जाणाऱ्या मार्गावर कमान बांधणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, सुधागड (जि.रायगड) तालुक्यात अष्टविनायकापैकी एक महत्वाचे तीर्थक्षेत्र म्हणजे पालीचा प्रसिद्ध गणपतीचे देवस्थान आहे. महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी शहराच्या प्रवेश द्वाराला त्या त्या देवस्थानच्या नावासहित कमानी उभारण्यात आलेल्या आहेत.

मात्र पाली शहरातील बल्लाळेश्वरच्या नावाने कमान नसल्यामुळे अनेक भक्तांना बल्लाळेश्वर देवस्थानकडे जाण्यासाठी देवस्थान कोठे आहे, अशी विचारणा करावी लागते.

सन 1952 साली खोपोली-पाली रस्त्यावर अशी कमान उभारण्यात आली आहे. परंतु, सन 1980 मध्ये अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे या कमानीची मोडतोड झालेली आहे.

तरी खोपोली-पाली राज्यमार्ग व वाकण-पाली राज्यमार्गावर दोन्ही ठिकाणी तीर्थक्षेत्रासाठी उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून आकर्षक व मार्गदर्शक कमानी उभारण्यात याव्यात व त्यासाठी शासनाने योग्य ती दखल घ्यावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे."

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : पुणे महापालिकेच्या सन 2007 ते 2017 च्या प्रारूप विकास आराखड्यात करावयाचे बदल याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"सभापती महोदय, सभागृहात वेळोवेळी विविध शहरांच्या विकास आराखड्याचा विषय उपस्थित होत असतो. पुणे महानगरपालिकेने सन 2007 ते 2017 या कालावधीचा प्रारूप विकास आराखडा तयार केला आहे. विशेष म्हणजे शासनाने एमआरटीपीच्या कलम 28 अन्वये नियोजन समिती गठीत केली आहे. त्या समितीतील 7 सदस्यांपैकी 4 सदस्य शासन नियुक्त शहर नियोजन पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत व 3 सदस्य स्थायी समितीमधील आहेत. शासन नियुक्त 4 तज्ज्ञांपैकी 3 तज्ज्ञांनी या विकास आराखाड्याबाबत गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. सन 1987 च्या विकास आराखड्यामध्ये अनेक लोकोपयोगी आरक्षणे वगळण्यात आली आहेत. पुण्या सारख्या मोठ्या शहराचा विकास आराखडा तयार करताना नियोजन प्राधिकरणाने म्हणजेच पुणे महानगरपालिकेने समतोल आणि शाश्वत विकास करण्यासाठी अनेक गोष्टींबाबत अभ्यासपूर्ण पावले उचलावयास पाहिजे होती. म्हणून सुसह्य आणि राहण्यायोग्य होण्यासाठी शासन मॅकन्झिने तयार केलेला शहराचा अहवाल आणि अन्य तज्ज्ञांना एकत्र करून 23 गावांसह जुन्या हद्दीचा एकत्रित आराखडा करण्याचे निर्देश देणे गरजेचे आहे. परंतु जी तज्ज्ञ समिती आहे त्यामध्येच दोन गट पडलेले आहेत. त्यामुळे विकास आराखड्यातून कशा प्रकारे आरक्षणे वगळली गेलेली आहेत. त्या संदर्भात दाद मागण्याचा जो मार्ग आहे तो प्रलंबित दिसत आहे. म्हणून पुणे महानगरपालिकेचा हा जो विकास आराखडा आहे या संदर्भात जुन्या हद्दीचा एकत्रित आराखडा तयार करण्यासाठी राज्य शासनाने निर्देश द्यावेत, अशी माझी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील निसर्गसंपन्न उत्तनचा समुद्र किनारा विद्रुप करण्याचे काम सुरु असणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निसर्गसंपन्न उत्तनचा समुद्र किनारा विद्रुप करण्याचे काम राजरोसपणे चालू असून, उत्तन परिसरात अनधिकृत बंगल्यांची योजना पूर्ण झाल्यावर भू-माफियांनी, समुद्र किनाऱ्याजवळ अनधिकृत इमारती बांधण्यास सुरुवात केलेली असून, महानगरपालिकेत या संदर्भात अनेकदा तक्रारी करुनही या अनधिकृत बांधकामांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. समुद्र किनारी वाढीस लागलेली ही अनधिकृत बांधकामे भविष्यातला धोका ओळखून वेळीच निष्कासित करावीत, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : मुंबईवर झालेल्या 26/11 च्या हल्ल्यातील मुख्य आरोपीसंबंधी सरकारी वकिलांनी केलेले विधान याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सभापती महोदय, मुंबईवर झालेल्या 26/11 च्या हल्ल्यातील आरोपी अजमल कसाब याला फाशी देण्यात आली. या खटल्यात सरकारी वकील म्हणून निष्णात विधिज्ञ उज्वल निकम यांनी लक्षणीय कामगिरी बजावली होती. त्यामुळे वकील म्हणून त्यांच्या कीर्तीत नक्कीच मोलाची भर पडली. ही घटना उलटून बऱ्याच कालावधीनंतर एका सार्वजनिक कार्यक्रमात 'कसाबने बिर्याणी मागितली होती' असे ते बोलले होते. कारण कसाबच्या बाबतीत वातावरण भावनिक होण्याची शक्यता होती. वास्तविक कसाबने अशी कोणतीही मागणी केली नव्हती, असेही विधान त्यांनी केले. हे धक्कादायक तर आहेच, परंतु सरकार जेव्हा वकील नेमते त्यावेळी एक आचारसंहिता तयार करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. राज्याचे महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी माननीय मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे, हेही लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. मर्यादेबाहेरचे वक्तव्य करणे अनुचित आणि अप्रस्तुत आहे. एकूणच न्यायाकडे नेणारा प्रवास अशा अडथळ्यांमुळे भविष्यात अडचणी निर्माण करण्याची शक्यता आहे. शासनाने याची गंभीरतेने दखल घेऊन संबंधितांवर बंधने आणावीत, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)

पृ.शी./मु.शी. : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये खेळाला विशेष असे महत्व आहे. उत्कृष्ट खेळाडू राज्याला ओळख निर्माण करुन देण्याचे महत्वपूर्ण काम करतात. त्यामुळे आपल्या भारत देशात व राज्यात अशा उत्कृष्ट खेळाडूंची खाण आहे. सचिन तेंडुलकर, पी.टी.उषा, सानिया मिर्झा यासारखे अनेक नामवंत खेळाडू या देशाला मिळाले आहेत. सचिन तेंडुलकर हा तर आपल्या राज्याचा मानबिंदू ठरलेला आहे. तर महाराष्ट्राच्या कन्या अंजली भागवत, तेजस्विनी सावंत व राही सरनोबत या जागतिक कीर्तीच्या नेमबाजांनी महाराष्ट्राचे नाव उंचावण्याचे काम केलेले आहे. या नेमबाजीसाठी ॲम्युनेशनसाठी, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या नेमबाज खेळाडूंना आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे. तसेच, या राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये स्थान देण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: एकात्म बाल संरक्षण योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी न होणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यात विशेषत: मुंबई सारख्या शहरात प्रत्येक मंदिर, सिग्नल तसेच रेल्वे स्थानकांवर गर्दीच्या ठिकाणी लहान मुलांना घेवून भीक मागणारे सर्रास आढळणे, लहान मुलांना कचरा वेचण्यास किंवा भीक मागण्यास लावले जाणे, बाल संरक्षणासाठी राज्यात 2010 मध्ये एकात्म बाल संरक्षण योजना आखण्यात आली. परंतु, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात न येणे, या योजनेनुसार शासनाने बाल संरक्षण सोसायटी स्थापन करणे, राज्य दत्तक स्त्रोत संस्था बाल हक्क आणि बाल हक्क कल्याण समिती प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्याची आवश्यकता असताना शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, लहान मुलांचे जीवन अंधकारमय होवू नये याबाबत कठोर उपाययोजना करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

वि.स.वि.क्रमांक 6-नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयकाबाबत

उप सभापती : मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विनंती केलेली आहे की, हे विधेयक आजच्या ऐवजी उद्या चर्चेला घेण्यात यावे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेली विनंती सभागृहाला मान्य आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यासाठी माझी हरकत नाही. परंतु, अधिवेशन सुरु झाल्यापासून अद्याप एकही शासकीय विधेयक मंजूर झालेले नाही. (...अडथळा...) जात प्रमाणपत्र सादर करण्याच्या संदर्भातील सुधारणा असल्यामुळे ग्रामपंचायत सुधारणा विधेयक संमत करण्यात आले. शासकीय विधेयके मंजूर होणार आहेत काय ? शासनाला अजून किती तरी विधेयके सादर करावयाची आहेत. हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे, हे धार्मिक विधेयक आहे. या विधेयकावर फार काही बोलण्यासारखे आहे असे नाही. या विधेयकाला सुधारणा सुचविली असेल तर त्याचा विचार करता येईल. सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे, अशी माझी विनंती आहे. खरे म्हणजे, हे धार्मिक विधेयक आहे आणि माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या विधेयकात दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. शासनाने स्वत:हून यामध्ये काही केलेले नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि क्रमांक 6, नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक.....

उप सभापती : हे विधेयक उद्या चर्चेला घेण्यात येईल.

आता सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 3-महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक चर्चेला घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : पोलीस (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. III OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT.)

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री शहरे) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 3-महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 3-महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

<u>सन 1951 चा अधिनियम क्रमांक 22 यामध्ये कलमे 22 जे-1 ते 22 जे-4 समाविष्ट करणे</u>

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी खंड 4 ला सुधारणा सुचविलेली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खंड 4 ला पुढीलप्रमाणे सुधारणा सुचवितो.

"खंड-4,
पृष्ठ क्रमांक-2,
ओळ क्रमांक 31 "(ब) पोलीस महासंचालक
यांनी प्राधिकृत केलेला एक प्रतिनिधी सदस्य"
असा मजकूर दाखल करण्यात यावा."

सभापती महोदय, शासनाने दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी जो अध्यादेश काढला होता त्याचे स्थांतर कायद्यात करण्याकरिता हे विधेयक मांडण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयात अर्जाद्वारे ज्या सुधारणा सुचविण्यात आलेल्या होत्या त्यावर सर्वोच्च न्यायालयाने ज्या सूचना केल्या त्यातील एक भाग म्हणून पोलीस आस्थापनेच्या संदर्भात विविध प्रकारच्या समित्या असाव्यात, पूर्वीच्या पध्दतीपेक्षा वेगळया प्रकारच्या माध्यमातून कामकाज चालावे हा या विधेयकामागील उद्देश आहे. विशेषतः बदल्यांच्या संदर्भात निर्णय घेत असताना राज्यस्तरावर माननीय मुख्यमंत्र्यांकडे किती अधिकार असावेत, गृहमंत्र्यांकडे किती अधिकार असावेत, रिजनल लेव्हलवर कशा प्रकारचे अधिकार असावेत आणि जिल्हा स्तरावर कशा प्रकारचे अधिकार असावेत याबाबत आस्थापना मंडळाच्या माध्यमातून हे काम चालावे हे या सुधारणा विधेयकामधून अभिप्रेत आहे.

सभापती महोदय, आज गृह विभागातील एकूण परिस्थिती विचारात घेतली तर या व्यवस्थेवर अंकुश असला पाहिजे. मनाला वाटेल तशी व्यवस्था गृह विभागाकडून सुरु राहू नये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

यासाठी सामूहिक जबाबदारी त्यांच्यावर देऊन त्या माध्यमातून योग्य प्रकारचा निर्णय होईल आणि गृह विभागाच्या प्रशासनामध्ये चांगल्या प्रकारचे बदल होतील अशी अपेक्षा यामध्ये व्यक्त करण्यात आली आहे. या बिलाच्या संदर्भात विचार केला तर माननीय मुख्यमंत्र्यांकडे आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार होते, ते आजही त्यांच्याकडे कायम ठेवले आहेत. गृह मंत्र्यांना डीवायएसपी पर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार होते. योगायोगाने माननीय मुख्यमंत्र्यांकडेच गृह विभागाचा कारभार असल्यामुळे दोन्ही दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार एकाच ठिकाणी एकवटले आहेत. आज खऱ्या अर्थाने रिजनल लेव्हलला आयजी स्तरावर आणि जिल्हा लेव्हलला एसपीच्या माध्यमातून ही व्यवस्था योग्यरित्या राबवू शकलो, त्यात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करु शकलो तर निश्चितच सुप्रीम कोर्टाने जो उद्देश ठरवून दिलेला आहे, त्या माध्यमातून पारदर्शक व्यवस्था निर्माण होईल. त्या दृष्टीने मी सुधारणा सुचविलेली आहे.

सभापती महोदय, आयजी स्तरावर आयजी असेल, महापालिका स्तरावर पोलीस आयुक्तांना अधिकार असावेत. जिल्हा स्तरावर बदलीचे अधिकार एसपीना दिले तर त्यामध्ये आयजी लक्ष घालणार नाहीत. त्यांनी आपल्या शहरातील पी.आय., डी.सी.पी.यांच्या बदल्या कराव्यात आयजी आणि एसपी यांचे नाते पाहिले तर त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे आपल्या लक्षात येईल. त्यामध्ये फारसा फरक पडत नाही. सोयीप्रमाणे बदल्या करण्यासाठी एसपीने सांगायचे आणि आयजीने ऐकायचे. त्यांनी आयजीकडे बदलीचे प्रकरण पाठवायचे. त्यानंतर आयजीकडून सहमती दिली जाते. त्यात फार काही हस्तक्षेप केला जात नाही. अशी सांगड असेल तर त्यामध्ये बदल केला असे म्हणता येणार नाही. शासनाला या व्यवस्थेमध्ये बदल करावयाचा असेल, अंकुश ठेवायचा असेल तर तेथील पोलीस निरीक्षक काम करीत नसेल, पोलीस उप निरीक्षक काम करीत नसेल त्याला बाजूला करुन जो चांगले काम करणारा आहे, आपल्या सोयीप्रमाणे वागणारा आहे अशा लोकांची बदलीने वर्णी लावायचा प्रयत्न केला जातो हे आपल्या सर्वांच्या समोर आलेले आहे. आयजी फक्त मम म्हणण्यापेक्षा वेगळी भूमिका घेत नाही. तेथे काय चाललेले असते हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ही व्यवस्था पारदर्शकपणे पुढे न्यायची असेल तर त्यामध्ये पोलीस

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महासंचालक कार्यालयातील अतिरिक्त पोलीस महासंचालक किंवा त्याच कार्यालयातील अधिकारी प्रतिनिधी म्हणून पाठवून व्यवस्था करु शकलो तर त्यावर अंकुश ठेवता येईल. अन्यथा नव्याने

25-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) JJ.3

SGB/ AKN/ MMP/ 16:10

श्री.माणिकराव ठाकरे....

सुधारणा करीत असताना जुन्या गोष्टी लक्षात घेतल्या नाही तर त्या सुधारणेला अर्थ राहणार नाही असे मला वाटते. या दृष्टीने ही एक संधी असून या व्यवस्थेबाबत सर्वंकष चर्चा झाली पाहिजे. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती चांगली असेल, जनतेला न्याय मिळत असेल तर शासनाच्या दृष्टीने यापेक्षा कोणती मोठी गोष्ट असू शकत नाही. नेमका ढाचा तयार करताना, जबाबदारी देत असताना कोणावर किती विश्वास ठेवायचा हे अनुभवातून शिकणार नसाल तर कितीही कायदे केले तरी त्यामध्ये सुधारणा होऊ शकणार नाही. जिल्हा स्तरावर पोलीस उप निरीक्षक असेल त्याची बदली जिल्हयांतर्गत करायची असेल किंवा जिल्हयाबाहेर करायची असेल तर हे अधिकार पोलीस महानिरीक्षकांना दिले तर त्यात पारदर्शकता राहणार नाही. चांगल्या लोकांवर या कारणाने अन्याय होऊ शकतो. त्यांना न्याय मिळणार नाही. जो काम करीत नाही, परंतु एसपीच्या गुडबुकमध्ये आहे.....

नंतर 2के.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मग त्यांच्या माध्यमातून आय.जी.पर्यंत पोहोचायचे आणि पाहिजे तशा प्रकारचे पोलीस स्टेशन घ्यायचे. यातून शासनाला जो उद्देश अपेक्षित आहे तो साध्य होईल असे मला वाटत नाही. डीवायएसपी यांच्या बदलीचे अधिकार राज्यमंत्र्यांना देण्यात आलेले आहेत. आता आपण मोठ्या प्रमाणावर डीवायएसपी देत आहोत. पूर्वी एक किंवा दोन डीवायएसपी असायचे. तसेच सर्कल इन्स्पेक्टर देखील होते. मागच्या काळातच ते पद ॲबॉलिश करण्यात आले. पोलीस स्टेशनमध्ये पी.आय.बसलेला असताना देखील सर्कल इन्स्पेक्टर गाडी घेऊन बाहेर जात होता. त्याच्यापेक्षा वरच्या पदाच्या अधिकाऱ्याला सायकलवरून चर्चा करायला जावे लागत असे. आज सर्कल इन्स्पेक्टरचे पद नाही. आज डीवायएसपींची पदे वाढलेली आहेत. आज आपण शहरातील आयुक्तालयामध्ये, जिल्हा स्तरावर पाहिले असेल की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वच यंत्रणा कामाला लागली आहे काय असा संशय येतो. इन्व्हेस्टीगेशन हा देखील जनतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा भाग आहे. कोणत्या पोलीस स्टेशनमध्ये किती स्टाफ असावा, कोणाला किती संरक्षण द्यावे, मंत्री महोदय दौऱ्यावर आल्यानंतर चौकामध्ये किती पोलीस तैनात करायचे, एखादा कार्यक्रम असला की, तेथे किती पोलीस उपयोगात आणावे, सर्किट हाऊसवर किती पोलिसांनी सलामी दिली पाहिजे इत्यादी सर्व निश्चित केलेले असते. असे असताना देखील आज शासनाचे इन्व्हेस्टीगेशनकडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. पोलीस स्टेशनमध्ये असलेला किती स्टाफ आपण इन्व्हेस्टीगेशनसाठी वापरतात हे सांगावे. पोलीस स्टेशनमध्ये असलेल्या स्टाफला चौकात उभे राहण्यासाठी, मंत्र्यांना सलाम ठोकण्यासाठी पाठविण्यात येत आहे. तेव्हा या व्यवस्थेकरिता किती पोलीस वापरण्यात येतात त्याचा देखील खुलासा करण्यात यावा. तसेच पोलीस ठाण्यातील किती पोलीस इन्व्हेस्टीगेशनसाठी उपयोगात येतात याचा देखील खुलासा शासनाने करावा. आज प्रत्येक पोलीस ठाण्यातील 5 टक्केही बळ हे इन्व्हेस्टीगेशनसाठी वापरण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. याचा परिणाम समाजावर होत आहे. माननीय गृह राज्यमंत्री (ग्रामीण) यांनी आज सदनामध्ये चर्चेला उत्तर देताना सांगितले की, आरोपीला शिक्षा होण्याचा दर हा फार कमी आहे. 1994 रोजी हा दर 30 टक्के होता.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

पण 1994 ते 1999 या काळात हा दर 10 टक्क्यांवर आला होता. आजही तपास काम व्यवस्थित होत नाही. पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिल्यानंतर देखील घटनास्थळी पोलीस धावून जात नाहीत. तक्रारकर्त्यांनाच पोलीस ठाण्यामध्ये बोलावून बसवून ठेवण्यात येत आहे. तक्रार आल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी लॉ अँड ऑर्डरमधून पोलीस मुक्त होतात तेव्हा त्यांना घटनास्थळी पाठवून देण्यात येते. मग तो पोलीस कोणाच्या तरी मोटार सायकलवर बसून घटनास्थळी जातो. आज अशी परिस्थिती आहे की, 50 टक्के प्रकरणात पोलीस तपासासाठी जातच नाहीत. उलट ज्याच्या विरोधात आरोप आहेत त्यांनाच बोलावून घेतात. संबंधित पोलीस ठाण्यामध्ये आल्यानंतर त्याला रात्रीपर्यंत थांबवून ठेवतात. तो जर संध्याकाळ पर्यंत घरी गेला तर ते त्याचे भाग्यच समजायचे. त्याला पोलीस स्टेशनमध्ये नुसता बसवून ठेवलेला असतो. शिक्षा होण्याचा स्तर घसरण्याचे एकमेव कारण म्हणजे इन्व्हेस्टीगेशनकरिता आज पोलीस बळच शिल्लक राहिलेले नाही. इन्व्हेस्टीगेशनकरिता पी.आय., पी.एस.आय.यांना पोलीस स्टेशनमध्ये असलेले संपूर्ण बळ द्यावे लागते. तेव्हा इन्व्हेस्टीगेशनकरिता शासनाने योग्य ती पावले उचलण्याची गरज आहे तरच तेथील पी.आय., पी.एस.आय.चांगल्या प्रकारे इन्व्हेस्टीगेशन करू शकतील. त्यांनी इन्व्हेस्टीगेशन केले नाही तर मग त्यांच्या सर्व्हीस बुकमध्ये इन्व्हेस्टीगेशन केले नाही म्हणून अमुक ठिकाणी बदली करण्यात यावी अशा प्रकारचा शेरा मारण्याचे कारण एस.पी., आय.जीं.ना मिळू शकेल. त्यामुळे आज होम डिपार्टमेंटमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. पूर्वी पोलीस स्टेशनला एक पी.आय.व एक पी.एस.आय.असायचा. परंतु, नंतरच्या काळात पी.आय.व पी.एस.आय.ची संख्या वाढविण्यात आली. त्यातील काही अधिकाऱ्यांकडे कायदा व सुव्यवस्थेची तर उर्वरित अधिकाऱ्यांकडे इन्व्हेस्टीगेशनची जबाबदारी देण्याच्या दृष्टीने पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यात आली होती. तशा प्रकारचे वाटप एस.पी., ॲडिशनल एस.पी.यांना देखील करून द्यायला पाहिजे. जिल्ह्यातील पोलीस बळाचा वापर कसा करायचा याचा अधिकार एस.पीं.ना आहे. तसेच कायदा व सुव्यवस्थेसाठी किती व इन्व्हेस्टीगेशनसाठी किती पोलिसांची आवश्यकता आहे याची संख्या शासनाने निश्चित करावी. असे केले तरच येणाऱ्या तक्रारींच्या आधारे पोलीस बळ कसे वापरायचे हे ठरविता येईल.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

आज आपल्याकडे इन्व्हेस्टीगेशनसाठी व कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस बळ नाही. कायदा व सुव्यवस्थेसाठी आपणाला पोलीस बळ लागत असेल तर डीवायएसपी यांची परवानगी घेऊन ती यंत्रणा आपल्याला कामाला देखील लावता येईल. पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर सुद्धा पोलीस तक्रारीची तपासणी देखील करीत नाही. मुंबईसारख्या पोलीस ठाण्यामध्ये 400 ते 500 पोलीस आहेत. आपण महिन्याभरात एकूण किती प्रकरणे पोलीस ठाण्यामध्ये आलेली आहेत, किती तक्रारी आलेल्या आहेत, त्यापैकी किती नोंदविलेल्या आहेत, ती प्रकरणे तपासण्याकरिता आपण काय केले आहे या सर्वांचा रिपोर्ट काढून पहावा. तो रिपोर्ट पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, एका पोलीस ठाण्यामध्ये 450 पोलीस असतील तर त्यापैकी 10 पोलीस देखील इन्व्हेस्टीगेशनसाठी उपयोगात येत नाहीत. आज आपण प्रत्येकाला झेड, झेड प्लस सिक्युरिटी देत आहोत. आज ज्यांना अशा प्रकारची सुरक्षा पुरविण्यात आलेली आहे त्यांना खरोखरच सुरक्षेची आवश्यकता आहे काय, याचा आढावा घेण्याची गरज आहे. कोणाला कशा प्रकारची सुरक्षा द्यायची यासंबंधात समिती आहे. पण या समितीवर दबाव आणून माझ्या सुरक्षेसाठी जास्त पोलीस द्यावेत असे सांगितले जात आहे. रायफलपेक्षा स्टेनगनधारी पोलिसांचे संरक्षण घेऊन पोलिसांच्या माध्यमातून स्वत:चे महत्त्व वाढविण्याचे काम काही जण करीत आहेत. आज ही जी पद्धत सुरू झाली आहे ती खंडित करण्याचे काम सरकारने केले पाहिजे, तरच तेथील पी.आय.आणि पी.एस.आय. व्यवस्थितपणे काम करू शकतील.

यानंतर श्री.जुन्नरे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे .....

नाही तर केवळ स्वतःच्या सुरक्षेसाठी, स्वतःच्या मोठेपणासाठी पोलीस यंत्रणा वापरावयाची हे काही योग्य नाही. पोलीस यंत्रणाही जनतेच्या सुरक्षिततेसाठी, सामान्य जनतेला संरक्षण देण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. गुन्हे अन्वेषण विभागाच्या आस्थापनेच्या संदर्भातील उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यात, देशात आणि जगामध्ये पोलिसांसारखीच व्यवस्था गुन्हे अन्वेषण विभागात असली पाहिजे हा जो अधिकाऱ्यांचा आग्रह आहे तो का आहे हे मला तरी काही समजत नाही. पोलीस अधिकारी प्रथम आपली सोय पाहतात नंतर खालच्या अधिकाऱ्यांकडे लक्ष देतात व वेळ मिळाला तर जनतेकडे लक्ष देतात. गुन्हे अन्वेषण विभागात आज कोणत्या पध्दतीने कामकाज सुरु आहे याची आपल्या सर्वांना माहिती आहे. या ठिकाणी गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. गृहमंत्र्यांनी हा तपास सीआयडीकडे देणार आहोत अशी घोषणा केल्याबरोबर विरोधी पक्षातील सदस्य खूष होतात. परंतु सीआयडीमध्ये कोणती व्यवस्था आहे, कोणत्या क्षमतेचे अधिकारी आहेत, सीआयडीमध्ये कोणते अधिकारी जातात याचा आपण कधी विचार केला आहे काय ? सीआयडीकडे तपास गेल्यावर सीआयडी अधिकारी पोलीस स्टेशनमध्ये जातो. पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर सीआयडी अधिकाऱ्याकडे प्रथम लक्ष सुध्दा दिले जात नाही. सीआयडी अधिकारी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना या या प्रकरणात नेमकी परिस्थिती काय झाली होती त्याची माहिती द्या, असे सांगतो. परंतु सीआयडी अधिकाऱ्याला पोलीस स्टेशनमधून कोणतीही माहिती दिली जात नाही उलट त्या अधिकाऱ्याला बसवून ठेवले जाते. त्यामुळे क्षमता नसलेला अधिकारी सीआयडीमध्ये असेल तर त्याचा काही उपयोग होत नाही. सीआयडी ब्रँचमध्ये बदली करणे ही आता पोलिसांना शिक्षा वाटू लागली आहे.

सभापती महोदय, पोलिसांनी एखाद्या प्रकरणात जाणूनबुजून काम केले नसेल, दुर्लक्ष केले असेल तर असे प्रकरण सीआयडीकडे दिले जाते. त्यामुळे सीआयडीच्या विषयाकडे आपण गांभीर्याने पाहणार आहोत की, नाही हा महत्वाचा भाग आहे. पीआय, एसपी,आयजींची ट्रान्सफर करीत असताना तो कोणत्या क्षमतेचा आहे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. सायबर क्राईमच्या संदर्भात किंवा संपूर्ण गुन्हे सीआयडीच्या माध्यमातून शोधून काढण्यामध्ये वेगवेगळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे .....

टेक्निक आता उपलब्ध झालेले आहे. पीएसआयचे ट्रेनिंग घेतलेला किंवा बारावी पास कॉन्स्टेबल म्हणून नऊ महिने ट्रेनिंग घेऊन, सीआयडीत आहे म्हणून मोठमोठे गुन्हे शोधून काढणे शक्य नाही. खरे म्हणजे सीआयडी विभाग टेक्निकली मजबूत करण्याची आज गरज आहे. सीआयडीला टेक्नीकली मजबूत करावयाचे असेल तर तुम्हाला त्या पध्दतीने रिक्रुटमेंट करावी लागेल, चांगले शिक्षित लोक यासाठी घ्यावे लागतील, त्यांच्या पगारामध्ये वाढ करावी लागेल, विविध प्रकारच्या परीक्षा घ्याव्या लागतील. परंतु हे करण्यासाठी अधिकारी तयार नाहीत. पोलीस विभागाला वाटते की, गुन्हे अन्वेषण विभागात अधिक शिक्षित, अधिक टेक्निकल अधिकारी घेतले गेले तर आमच्या प्रमोशनमध्ये फरक पडेल, आमच्यापेक्षा वरचे प्रमोशन मिळाले आणि आमच्यावर जाऊन बसले तर हे लोक पुढे जातील आणि आम्ही मागे राहू असे गृहविभागातील अधिकाऱ्यांना वाटते. आम्हीच व्यवस्थित असलो पाहिजे, आमची सुरक्षितता राखली गेली पाहिजे असे जर झाले तर ते योग्य होणार नाही. आपण जर पोलीस यंत्रणेकडे पाहिले तर पीआयचे प्रमोशन झाले काय, कॉन्सटेबलचे प्रमोशन झाले काय याकडे मात्र अधिकारी लक्ष देत नाहीत. परंतु एखाद्या आयजी लेव्हलच्या अधिकाऱ्याचे, आयपीएस आधिकाऱ्यांचे प्रमोशन पेन्डींग असेल तर त्याकरिता नवीन पोस्ट तयार केल्या जातात. पोस्टची गरज आहे की, नाही याकडे कोणीही लक्ष देत नाही. प्रपोजल गृह मंत्र्यांकडे आल्यानंतर नवीन पोस्ट तयार केली जाते. आपल्याकडे किती डीजी आहेत, ॲडीशनल डीजीची खरोखर गरज होती काय याकडे लक्ष दिले जात नाही. फक्त विशिष्ट अधिकाऱ्यांच्या प्रमोशनासाठी व्यवस्था करावयाची हाच उद्योग गृह विभागात सुरु आहे. पीआय, पीएसआय, कॉन्स्टेबलपर्यंत प्रमोशन का दिले जात नाही ? आता केवळ खालच्या अधिकाऱ्यांना दुर्लक्षित करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे पोलिसांच्या संदर्भात अशा प्रकारची व्यवस्था असेल व त्यासाठी आपण कितीही आस्थापना विभागामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला तरी त्यायोगे पीआय, पीएसआय कोण असावे,नसावे ही जी साखळी आहे ती काही सुटू शकणार नाही.

सभापती महोदय, आपला सीआयडी विभाग खरोखर मजबूत आहे ? असे असताना आपण सीआयडीकडे तपास देतो परंतु आज सीआयडीवरील जनतेचा विश्वास उडत चालला आहे. इन्व्हेस्टीगेशनच्या संदर्भात पोलिसांवरील सुध्दा विश्वास उडत चालला आहे. जोपर्यंत गुन्हेगारांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे .....

शिक्षा होणार नाही तोपर्यंत जनतेला पोलिसांबद्दल विश्वास वाटणार नाही. गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी गृह विभागात काय व्यवस्था आहे ? पोलीस स्टेशनमध्ये एखाद्या पोलीस अधिकाऱ्याच्या माध्यमातून गुन्हा नोंदविला जातो, एक तर त्याचा तपासच बरोबर होत नाही. अशा प्रकारचा तपास झाल्यानंतर हे प्रकरण कोर्टात एखाद्या विशिष्ट तारखेमध्ये पाठविण्याचा प्रयत्न केला जातो. न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर हे प्रकरण वर्षानुवर्षे सुरु राहते. ज्या अधिकाऱ्याने फाईल तयार केलेली असते त्या अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर दुसरा अधिकारी त्या ठिकाणी येतो. दुसरा अधिकाऱ्याचा त्या प्रकरणात किती इन्टेरेस्ट राहणार ? साक्षीदारांवरही दबाव येत असतो त्यामुळे साक्षीदार किती काळ टिकून राहतात हा सुध्दा एक प्रश्न आहे. आपल्या कायद्यामध्ये आणि न्यायालयीन व्यवस्थेमध्ये काय उणिवा आहेत, इन्व्हेस्टीगेशन झाल्यानंतर कोर्टातून लवकर निर्णय का येत नाही याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या व्यवस्थेमध्ये कोणते कायदे बदलण्याची गरज आहे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. आपण जर चांगल्या निवृत्त न्यायाधीशाची नेमणूक करु शकलो व कायदे बदलण्याच्या संदर्भात तशा प्रकारच्या सूचना असल्या तर त्या सूचनांचा शासनाला निश्चितपणे विचार करता येईल.

सभापती महोदय, बदल्यांच्या संदर्भात मागे एक प्रकरण घडले आहे. एका बैठकीमध्ये आयजी, डीजी आले नाही. काही आयुक्तांना बोलावले परंतु त्यातील काही अधिकारी आले. सोयीच्या अधिकाऱ्यांना बोलावले, त्या अधिकाऱ्यांना बोलावले नाही असे वाद झाले. नवीन शासन आल्यानंतर राज्याची स्थिती काय झाली आहे हे आपल्याला कळून येईल. ही स्थिती पूर्ण विभागात आहे असे मी म्हणत नाही. परंतु डीजी यांना बोलावल्यानंतर किंवा त्यांनी मिटिंगला न येणे अशी परिस्थिती यापूर्वी राज्यात उद्भवली नव्हती. शेवटी आपण शितावरुन भाताची परीक्षा करीत असतो. तुम्ही आदेश दिल्यानंतर पाळले जात नसतील तर आपल्या प्रशासनामध्ये कोठे तरी गडबड आहे हे कोणाला विचारायला जाण्याची गरज नाही.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे .....

हे वेगळे सांगण्याची गरज नाही. एकूणच संपूर्ण पोलीस आस्थापने संदर्भात अंकुश ठेवण्याची गरज आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले म्हणून आपण हे विधेयक आणलेले आहे. अधिवेशन सुरु नसल्यामुळे अध्यादेश काढला, आता त्या अध्यादेशाचे रूपांतर विधेयकामध्ये करायचे आहे. आपणास दोन्ही सदनामध्ये हे विधेयक मंजूर करून घ्यायचे आहे. परंतु आपण या मर्यादेपर्यंत राहू नये, या विधेयकामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहू नयेत असे मला वाटते. तेव्हा त्या संदर्भातील सर्व विषय एकत्रित करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आज गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण का कमी झालेले आहे, त्यामध्ये कोणत्या उणिवा आहेत याचा विचार केला पाहिजे.कायदा आणि सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी पावले उचलली गेली पहिजेत. या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे विचार करण्याची गरज आहे. हे शासकीय विधेयक असल्यामुळे ते मागे घेणे म्हणजे धाडसाचे होईल. आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मी दुसराच प्रश्न वाचला, आठवा प्रश्न चर्चेसाठी आहे हे मला माहीत नाही, तेव्हा तो प्रश्न राखून ठेवावा अशी मी सदनाला विनंती करतो, त्यांनी अशाप्रकारचे धाडस केले. त्याप्रमाणे आम्ही हे विधेयक मागे घेऊन आणखी चांगल्या सुधारणा करून ते पुन्हा आणतो असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले तर ते निश्चितपणे धाडस ठरेल. मी या विधेयकाबाबत ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा विधेयकात अंतर्भाव करावा अशी विनंती करून माझे भाषण पूर्ण करतो.

सुधारणा प्रस्तुत झाली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या विधेयकावर बोलण्यासाठी हात वर केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपणास आता विधेयकावर बोलता येणार नाही ती वेळ निघून गेलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सुधारणेवर आपले विचार मांडले आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या): सभापती महोदय, मी अगोदरच बोलण्यासाठी हात वर केला होता. आम्हाला विधेयकावर बोलण्याचा अधिकार आहे. आपणास वेळ वाचवावयाचा असेल तर मी भाषण करीत नाही. या विधेयकावर बोलण्यासाठी मी हात वर केला होता. परंतु आपण पुढे वाचन केल्यानंतर आम्हाला कशापद्धतीने संरक्षण मिळणार ? आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते.

सभापती महोदय, मी विधेयकाचे समर्थन करण्यासाठी उभी आहे. मागील पंधरा वर्षापासून पोलीस सुधारणा विधेयकावर सातत्याने चर्चा होत आहे. सामाजिक संघटना, निवृत्त पोलीस अधिकारी आणि विविध न्यायालयांमध्ये याबद्दलच्या सुधारणा स्वीकृत झाल्यानंतर आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर हे विधेयक आलेले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम 6 मध्ये सुधारणा करून तसेच राज्य सुरक्षा आयोग, विविध स्तरावरील पोलीस आस्थापने मंडळे घटित करणे, अधिकाऱ्यांचा किमान कालावधी किती असावा याचा तपशील ठरविणे, अन्वेषण पोलीस आणि कायदा व सुव्यवस्था पोलीस यांचे विलगीकरण करणे आणि राज्य व विभागस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरण घटित करणे इत्यादी यांबाबत तरतूद करण्यासाठी अधिनियमामध्ये सुधारणा केलेली आहे. यातील अन्वेषण पोलीस आणि कायदा व सुव्यवस्था पोलीस यांचे विलगीकरण करणे यावर कशापद्धतीने उत्तर शोधणार आहात ? विधानसभेचे माजी सदस्य श्री.विवेक पंडित हे शिवसेना पक्षाचे सहयोगी सदस्य आहेत. त्यांनी पोलीस रिफॉर्म आणण्यासाठी बरेच प्रयत्न केले होते. कायदा आणि सुव्यवस्था व इन्व्हेस्टीगेशन ही दोन स्वतंत्र अंग असल्याप्रमाणे कारवाई झाली पाहिजे. ही कारवाई कशाप्रकारे होणार आहे हे सरकार पुढील आव्हान आहे आणि ते आव्हान आम्हाला समजून घ्यायला आवडेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, मी या विधेयकाचे अनेक कारणांमुळे स्वागत करीत आहे. कारण काही ना काही कारणे काढून मूळ मुद्याला फाटा देणे किंवा पळवाटा शोधणे असा प्रकार येथे झालेला नाही. राज्य सरकारने बदल्यांचे अधिकार विकेंद्रीत करण्याच्या संदर्भात स्वत: निर्णय घेतलेला आहे, तो स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, पोलीस शिपायांचा सामान्य पदावधी हा,पदस्थापनेच्या एका ठिकाणावर पाच वर्षे केलेला आहे. पोलीस उप अधीक्षक किंवा सहाय्यक पोलीस आयुक्त व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी यांचा सामान्य पदावधी हा पदस्थापनेच्या एका ठिकाणावर दोन वर्षे आहे. खंड 6 च्या (ड) मध्ये नमूद केलेले आहे की, पोलीस उप निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक याच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांचा सामान्य पदावधी हा मुंबई खेरीजच्या इतर आयुक्तालयांत सहा वर्षे आणि मुंबई येथील आयुक्तालयात आठ वर्षे केलेला आहे. तसेच (ई) मध्ये नमूद केलेले आहे की, विशेषीकृत अभिकरणामधील पोलीस उप निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक यांच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याचा सामान्य पदावधी तीन वर्षे केलेला आहे.

सभापती महोदय, पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या मार्च-एप्रिल महिन्यात होण्याऐवजी जून-जुलै महिन्यात होतात. हा कालावधी पोलीस अधिकाऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिकदृष्टया खूप अडचणीचा आहे. काही वेळेला बदल्या या अपरिहार्य असतात, हे आम्ही समजू शकतो. तरी सुद्धा अधिकाऱ्यांच्या बदल्या एपिल-मे महिन्यात झाल्या तर त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक वर्षाच्या दृष्टीने मार्ग निघू शकतो. अशाप्रकारच्या होणाऱ्या बदल्यांवर काही अधिकाऱ्यांनी तोडगा काढलेला आहे, जो कॉन्स्टेबल किंवा इतर अधिकाऱ्यांना शक्य नाही. काही अधिकाऱ्यांनी पुण्यामध्ये घर घेतलेले आहे आणि ते पुण्यातच राहतात. त्यांची कुठेही बदली झाली तरी त्यांचे कुटुंब शहराच्या ठिकाणी राहते.

सभापती महोदय, सरकारने बदल्यांचा कालावधी ठरविताना एका वर्षातील बदल्यांची कमाल टक्केवारी निश्चित केलेली आहे, हा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. कारण यापूर्वी बदल्यांना कोणत्याही प्रकारचा नियम नव्हता. काही अधिकाऱ्यांच्या दोन वर्षात तीन-तीन वेळा बदल्या झाल्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

आम्ही पाहिलेले आहे. आमच्या पुणे जिल्ह्यामध्ये कनिष्ठ पातळीवरील अधिकारी दहा-दहा वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. फक्त तालुका बदलून या विभागातून त्या विभागात त्यांची बदली झालेली असते. याचा निवाड्यावर काय परिणाम होतो हा पोलीस रिसर्चचा मुद्दा असला तरी यंत्रणेला वेगळ्या प्रकारचे शैथिल्य येऊ शकते. तेव्हा बदल्यांचा कालावधी ठरविणे अत्यंत आवश्यक होते. हा कालावधी किती असावा याबाबत शासनाने तज्ज्ञांशी चर्चा केली असेल असे मला वाटते, परंतु त्याची अंमलबजावणी करीत असताना आपणास काही ठिकाणी डिस्क्रीशन वापरावे लागणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकामुळे पोलीस विभागात निर्नायकी होईल, कोणाचा कोणाशी पायपोस राहणार नाही, अशी कोणाला भीती वाटत असेल तर त्याबाबत सांगू इच्छिते की, या विधेयकात नमूद केले आहे की, "कोणतीही गंभीर तक्रार, अनियमितता, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाच्या बाबतीत सर्वोच्च सक्षम प्राधिकरण, संबंधित पोलीस आस्थापना मंडळाच्या कोणत्याही शिफारशीशिवाय, कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्याची बदली करु शकेल." भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदलीची जबाबदारी माननीय मुख्यमंत्र्यांवर दिलेली आहे. तर पोलीस उप अधीक्षक व त्यावरील दर्जाचे महाराष्ट्र पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदलीची जबाबदारी गृह मंत्र्यावर दिलेली आहे. एखाद्या ठिकाणी बेशिस्ती किंवा अनियमितता झाली, तर बदल्यांचे अधिकार अंतिमत: शासनाकडे नोंदविलेले आहेत.

सभापती महोदय, माजी पोलीस महासंचालक श्री.रिबेरो यांनी पोलीस रिफॉर्म्ससाठी खूप प्रयत्न केले होते. पोलीस रिफॉर्म्सचे विधेयक प्रत्यक्षात आल्यामुळे त्याचा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर चांगला परिणाम होऊ शकतो की, त्यातून पुन्हा वेगवेगळ्या पळवाटा निघतील काय, असा प्रश्न मनात येतो.

सभापती महोदय, जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ घटित केलेले आहे. त्यामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक हे अध्यक्ष असतील, वरिष्ठतम अपर पोलीस अधीक्षक हे सदस्य असतील, पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) हे सदस्य-सचिव असतील आणि उपरोक्त सदस्यांपैकी एकही सदस्य मागासवर्गातील नसेल तर जिल्हा पोलीस अधीक्षक, अशा प्रवर्गातील पोलीस उप अधीक्षक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

दर्जाच्या एका अतिरिक्त सदस्याची नियुक्ती करण्यात येईल. मनुष्य स्वभावधर्मानुसार काही वेळेला साटेलोटेसुद्धा होऊ शकते ही वास्तविकता आहे. माझ्या ओळखीच्या दोन अधिकाऱ्यांची बदली कर, तुझ्या ओळखीच्या तीन अधिकाऱ्यांची बदली करतो, असे प्रकार होत असतील तर त्या ठिकाणी शासनाने मॉनेटरींग करणे गरजेचे आहे. सेवा शर्तीची देखरेख करणारी कठोर यंत्रणा हातात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.....

या पूर्वी सुध्दा आम्ही याकडे सरकारचे लक्ष वेधलेले आहे. वेगवेगळ्या प्रकारची गटबाजी, वेगवेगळ्या प्रकारचा फेव्हरटेझम, वेगवेगळ्या प्रकारचा जिल्हावाद, वेगवेगळ्या प्रकारचे जुने आणि नवे संचालक यातून अनेक प्रकारचे प्रभावक्षेत्र, राज्याच्या अनेक भागात निर्माण झालेले आहेत.

सभापती महोदय, हे विधेयक चांगले आहे. मी तर म्हणेन की, आपल्या पक्षाचे सरकार असताना आपल्या कारकिर्दीत हे विधेयक संमत होत आहे हा एक ऐतिहासिक स्वरूपाचा क्षण आहे. पण प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी करताना ती सदोष राहता कामा नये. या कायद्याची अचूक पध्दतीने अंमलबजावणी करताना नेहमी राजकीय इच्छाशक्तीचा प्रश्न पुढे येतो. पण आपल्याला राजकीय हस्तक्षेप करुन बदल्या करावयाच्या नसतील तर त्यातून मार्ग निघू शकतो. एखाद्या अधिकाऱ्याला मुंबईचा अनुभव असेल तर त्याला त्याच्या अनुभवाचा फायदा देणे महत्त्वाचे ठरणार आहे. या निकषामध्ये ज्या अधिकाऱ्यांच्या कारकिर्दीत सातत्याने चांगल्या पध्दतीने तपास केला गेला, त्या संदर्भातील कार्यक्षमतेचे निकष गृहीत धरुन, त्या बाबतची अंमलबजावणी सरकार करेल याची मला खात्री आहे. हे विधेयक मंजूर करण्यासाठी सभागृहात सादर करण्यात आलेले आहे. या विधेयकाचे मी मन:पूर्वक समर्थन करते. महोदय, मी जे विचार मांडले आहेत त्या बाबत सरकारच्या वतीने खुलासा करण्यात येईल, एवढीच अपेक्षा व्यक्त करते.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानते व माझे भाषण संपविते.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी हे विधेयक मांडल्यानंतर मी माझी सुधारणा मांडलेली आहे. माझ्या सुधारणेला पाठिंबा देण्याच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य बोलल्या आहेत. मला वाटते सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मी मांडलेल्या सुधारणेला पाठिंबा द्यावयास पाहिजे.

तालिका सभापती : मी सांगू इच्छितो की, विधेयकावर आपले विचार मांडण्याचा प्रत्येक सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. एक अपवाद म्हणून मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना सुधारणेवर बोलण्याची संधी दिली. कारण माननीय मंत्र्यांनी मांडलेले विधेयक आणि आपण सुचविलेली सुधारणा, या दोन्हींवर एकत्रिपणे चर्चा सुरु आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी मांडलेल्या सुधारणेला पाठिंबा देण्यासंदर्भातील अनावस्था प्रसंग आपण टाळला, त्याबद्दल मी आपली आभारी आहे. महोदय, प्रश्न कोण्या व्यक्तीच्या पाठिंब्याचा नाही तर आमच्या मुद्याचा आहे. त्यामुळे मी या विधेयकाचे समर्थन केलेले आहे.

तालिका सभापती : आता सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-3, महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यात आलेले आहे. या विधेयकाला सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांनी ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्या निश्चितच अतिशय उपयुक्त आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, पोलीस विभाग सक्षम झाला पाहिजे. शिवाय त्यांनी बोलताना पोलीस रिफॉर्मचा आणि निवृत्त पोलीस अधिकारी रिबेरो साहेब यांचाही उल्लेख केला.

सभापती महोदय, मी दोन-तीन मिनिटांत माझे म्हणणे मांडणार आहे. गृह विभाग हा राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सर्वसामान्य लोकांचे जनजीवन सुरळीत आणि सुरक्षित कसे चालेल, या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असा विभाग आहे. पोलीस विभागात भरतीपासून निवृत्तीपर्यंत अनेक प्रकारच्या अवस्थांमधून पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रवास करावा लागतो. हे करीत असताना पोलीस विभागात पदस्थापना असेल, बदली असेल, बढती असेल, याचा पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्याच्या मानसिकतेवर फार परिणाम होत असतो.

महोदय, या विधेयकातील खंड 6 (अ)(एक)(अ) अंतर्गत "पोलीस उप अधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी, यांचा सामान्य पदावधी हा पदस्थापनेच्या एका ठिकाणावर दोन वर्षे असेल," तसेच (ब) मध्ये "पोलीस शिपायांचा सामान्य पदावधी हा पदस्थापनेच्या एका ठिकाणावर पाच वर्षे इतका असेल." असे नमूद केले आहे. तसेच (क) मध्ये नमूद केले आहे की, "पोलीस उप निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्या दर्जाचे पोलीस अधिकारी यांचा सामान्य पदावधी हा पोलीस ठाणे किंवा शाखा येथे दोन वर्षे, एखाद्या जिल्ह्यात चार वर्षे आणि परिक्षेत्र स्तरावर आठ वर्षे इतका असेल, तथापि, जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखा व विशेष शाखा आणि आयुक्तालयातील गुन्हे शाखा व विशेष शाखा यांच्याकरिता सामान्य पदावधी हा तीन वर्षे असेल." तसेच पुढे (ड) अंतर्गत "पोलीस उप निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षक यांच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांचा सामान्य पदावधी हा मुंबई खेरीजच्या इतर आयुक्तालयांत सहा वर्षे आणि मुंबई येथील आयुक्तालयात आठ वर्षे इतका असेल." असे नमूद केले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

महोदय, खंड-4 अंतर्गत जिल्हा स्तरावर पोलीस आस्थापना मंडळ निर्माण करण्याबाबत चांगली तरतूद केली आहे. या मंडळामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक हे अध्यक्ष राहणार असून, वरिष्ठतम अपर पोलीस अधीक्षक हे सदस्य आणि पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) हे सदस्य-सचिव राहणार आहेत. महोदय, जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळात सदस्यांपैकी एकही सदस्य मागासवर्ग प्रवर्गातील नसेल तर जिल्हा पोलीस अधीक्षक, अशा प्रवर्गातील, पोलीस उप अधीक्षक दर्जाच्या एका अधिकाऱ्याची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. याचाच अर्थ चौथा सदस्य हा मागासवर्ग प्रवर्गातून घेण्यात येणार आहे, ही खरोखरच चांगली तरतूद आहे. मग तो सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग किंवा इतर मागास प्रवर्गातील असेल.

महोदय, या निमित्ताने एक गोष्ट निदर्शनास आणून देतो की, सी.आय.डी. विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी उपयुक्त सूचना केली आहे. आपण अनेकदा एखाद्या संवेदनशील प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.च्या माध्यमातून करण्याबाबत मागणी करतो. परंतु सी.आय.डी. विभागात काम करणारे अधिकारी/कर्मचारी खरोखरच तज्ज्ञ असतात काय ? कोणी एस.बी. एलआयबी, आर्थिक गुन्हे शाखा, विशेष संरक्षण विभाग, व्ही.आय.पी. सिक्युरिटी विभागातून सी.आय.डी. विभागात काम करण्यासाठी जातात. सी.आय.डी.विभागात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांची तेथे नेमणूक करावी. सी.आय.डी.मध्ये काम करणारे अधिकारी विशिष्ट ज्ञान आणि तंत्रज्ञानाची माहिती असणारे पाहिजेत. किंबहुना ते तज्ज्ञ असावेत. सी.आय.डी. विभागाला गृह विभागाचे गुप्तहेर खाते म्हटले जाते. हा विभाग सक्षम करण्यासाठी तज्ज्ञ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची भरती केली पाहिजे. हे सर्व करीत असताना पोलीस कर्मचारी वर्गाची बदली करण्यासाठी ज्या सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे त्यातून अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत, त्याचे मी स्वागत करतो. पोलीस दलात सेवा करण्यापूर्वी "आम्ही कोणाबद्दलही आकस आणि ममत्व बाळगणार नाही." अशी शपथ घेतली जाते. त्यामुळे पोलीस विभागात 'आकस' आणि 'ममत्व' या दोन गोष्टींचा ताळमेळ कसा घालता येईल या दृष्टीने गृह विभागाने प्रयत्न केला तर हे विधेयक अधिक सक्षम होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

महोदय, राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि सर्वसामान्य जनजीवनाशी संबंधित असा हा पोलीस विभाग आहे. हा विभाग अधिक सक्षम झाला पाहिजे, लोकाभिमुख झाला पाहिजे, या दृष्टिकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे, एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो. जयभीम.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 3 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. विधेयकाच्या निमित्ताने राज्याच्या पोलीस दलाच्या रचनेच्या संदर्भात मूलभूत विचार करण्याची गरज निर्माण होते. विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये रिट विनंती अर्जाच्या संदर्भात उल्लेख केला आहे. गृह खात्यात कालानुरूप बदल घडत जातात, गरज निर्माण होत जाते आणि खात्यामध्ये असलेल्या सर्व स्तरावरील पोलीस दलाचे नियोजन करण्याची आवश्यकता असते, त्यावेळी काही बाबी सुधारणा म्हणून पुढे आणल्या जात असतात, त्यामध्ये भरपूर कालावधी निघून जातो. कदाचित काळाच्या धावत्या वेगाच्या पुढे आपण करीत असलेल्या सुधारणा काही वेळा मागे राहण्याची सुध्दा शक्यता असते. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेबांनी या विधेयकाच्या संदर्भात सुधारणा सुचविली आहे. नियमांच्या संदर्भात कोणतेही एक मॉडेल, फ्रेमवर्क तयार केले की, त्या नियमांच्या तरतुदीच्या बाहेर कसे राहता येईल याचा प्रयत्न सर्व पातळीवर सुरू असलेला आपण पाहतो. पोलीस दलामध्ये प्रत्येक स्तरावर त्या कर्मचाऱ्याचा कालावधी किती असावा हे निश्चित करण्याची खरोखर गरज आहे आणि त्याचे नियोजन योग्य पध्दतीने झाले तर कदाचित सर्व काही बदलू शकेल. आपल्याला बदल्यांच्या प्रकरणांमध्ये निकष अधिकचे काय लावण्याची गरज आहे हे पाहण्याची गरज आहे. आपण ही पध्दत विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून मांडलेली आहे.

सभापती महोदय, भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी यांचे अधिकार सक्षम अधिकारी म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांकडे आणि उप अधीक्षक व त्यावरील दर्जाचे पोलीस सेवेतील अधिकारी यांचे अधिकार सक्षम अधिकारी म्हणून गृहमंत्री यांच्याकडे असतात. सध्याच्या राज्याच्या व्यवस्थेमध्ये दोन्ही विभाग माननीय मुख्यमंत्र्यांकडेच येतात. भारतीय पोलीस सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये 2 वर्ग झालेले आपल्याला माहीत आहेत, त्यातील एक म्हणजे जे भारतीय प्रशासन सेवेची परीक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या राज्याची निवड करतात आणि मग आपल्या राज्यामध्ये पोलीस दलात रूजू होतात आणि दुसरे म्हणजे ज्यांना त्यांच्या खालच्या स्तरावरून पदोन्नती मिळून झालेले आयपीएस दर्जाचे अधिकारी. गेल्या काही वर्षांचा गृह खात्याचा अनुभव असा आहे की, प्रमोट झालले आयपीएस अधिकारी आणि डायरेक्ट रिक्रूट झालेले आयपीएस अधिकारी यांच्यामध्ये बऱ्याचदा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले....

ताळमेळ पाळला जात नाही. आपल्याकडे नगरविकास खाते आहे. बऱ्याचदा महानगरपालिकांची मागणी असते की, आम्हाला डायरेक्ट असलेले आयएएस अधिकारी द्या, प्रमोटी आयएएस अधिकारी देऊ नका. दलाच्या सक्षमतेचा विचार करतो त्यावेळी प्रमोट झालेले आयपीएस अधिकारी व डायरेक्ट आलेले आयपीएस अधिकारी यांचे वय, मानसिक, शारीरिक क्षमता, बुध्दी-कौशल्य सर्व गोष्टींमध्ये फरक पडतो आणि या फरकामुळे आपल्याला धोरण राबविताना अडचणी येण्याचीच अधिकची शक्यता असते आणि आहे. साहजिकच त्यामुळे एक प्रकारचा विसंवाद तयार होतो आणि त्यामुळे आयुक्तालय किंवा जिल्हा पोलीस प्रमुख स्तरावर काम करणारे अधिकारी यांच्यामध्ये सुध्दा ज्याला आपण फेव्हरटिझमचा मुद्दा म्हणतो तो आत येण्याची फार मोठी शक्यता आहे. आपल्याला कल्पना आहे की, आपल्याकडे प्रत्येक अधिकाऱ्याच्या कामाच्या संदर्भातील वार्षिक अहवाल असतो, तो वार्षिक अहवाल कोणी लिहायचा त्याच्याही पध्दती ठरलेल्या असतात. सातत्याने वार्षिक अहवाल कसे आले त्यावरून काही निकष ठरविलेले आहेत आणि असे निकष असताना सुध्दा काही वेळा अन्याय झाल्याची भावना पोलीस दलातील अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाल्याचे आपण पाहिलेले आहे. सर्व पध्दतींमध्ये असलेल्या काही त्रुटींमुळे त्यांचा फायदा घेऊन पोलीस दलाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता गृहीत धरली आहे.

सभापती महोदय, या विधेयकाद्वारे आता अमलात येणारी योजना राबविल्यानंतर तिची यशस्विता समजेल. सदर योजना 2-3 वर्षांमध्ये कशाप्रकारे फायदेशीर ठरलेली आहे, त्यांच्या कामकाजामध्ये गुणात्मक दर्जा वाढला आहे की, कमी झाला आहे किंवा यामध्ये अधिक काही करण्याची गरज आहे का ते समजेल. केवळ अधिकाऱ्यांच्या बदल्यांपुरता विषय मर्यादित न राहता सर्वंकष विचार केला पाहिजे. पोलीस खात्याला ह्यूमन रिसोर्स मिळत आहे. दरवर्षी त्यामध्ये भर पडणार आहे. त्यामुळे आपल्याला वारंवार बदलत्या परिस्थितीत विचार केला पाहिजे. काही वर्षांचा कालावधी दिलेला आहे आणि त्यानंतर ती बदली होणे अपरिहार्य आहे. पूर्वीच्या काळी असे म्हटले जायचे की, एखादा सक्षम अधिकारी असला तर तो त्याच्या विभागामध्ये त्याला माहिती मिळविण्याचे एक चांगल्या प्रकारचे जाळे तयार करूशकतो, माहिती घेऊ शकतो. त्यामुळे तो गुन्ह्यांची संख्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले....

कमी आणू शकतो, कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित ठेवू शकतो. मूल्यमापन वारंवार झाले आणि कामाच्या, कर्तव्याच्या कसोटीवर बढती, बदली मिळणार, अशा प्रकारचा विश्वास पोलीस दलात निर्माण झाला, कोणतेही नवीन स्ट्रक्चर यामध्ये तयार झाले तर त्या दृष्टीने सकारात्मक उपयोग होण्याची शक्यता आहे. यातील पारदर्शकता कायम ठेवण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सुधारणा सुचविली आहे, ती अतिशय उपयुक्त सुधारणा आहे. कारण स्थानिक पातळीवरील गोष्टी, खालच्या स्तरावरील एकमेकांशी असलेले संबंध किंवा दुरावा या दोन्ही गोष्टींचा विचार करताना त्याच्यामध्ये थर्ड पार्टी इंटरव्हेन्शन होणे, या संदर्भात पोलीस महासंचालक यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी तेथे गेला तर, समतोल राखण्याच्या दृष्टीने खूप चांगला उपयोग होऊ शकेल. माननीय मंत्र्यांनी या सुधारणेचा विचार करावा, अशी आपल्याला विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 3 वर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आम्ही या विधेयकाला सहमती देत आहोत. या निमित्ताने माझ्या काही सूचना आहेत. आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये 2 वर्ग असतात, एक प्रमोटी आणि दुसरा डायरेक्ट. बदली, बढती, भरती प्रकरणावरून सत्ताधारी पक्षात मतभेद असतात. मुंबईचा पोलीस आयुक्त बदलायचा असला तरी एक पक्ष दुसऱ्याचे नाव घेतो आणि दुसरा पक्ष पहिल्याचे नाव घेतो. आपण वर्तमानपत्रात हे नेहमी वाचतो. बदलीच्या संदर्भात पक्षीय मतभेद होऊ शकतात. आपल्याला हे नाकारता येत नाही. मागासवर्गीय अधिकाऱ्याचा कधीही विचार होऊ शकत नाही, प्रमुख जागेवर तो कधी येऊ शकत नाही हे सुध्दा नाकारता येत नाही. आपण मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याच्या संदर्भात रोज वर्तमानपत्रात वाचतो. घटनेच्या अनुच्छेद 335 नुसार संविधानिक पदांचा विचार योग्य पध्दतीने केला पाहिजे. मी आपल्याला विधेयकातील पृष्ठ क्रमांक 2 वरील खंड 22जे-1 वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ म्हणून संबोधण्यात येणारे मंडळ घटित करील.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

हे मंडळ गठीत करण्यास आमची काहीही हरकत नाही.

सभापती महोदय, या विधेयकाच्या कलम 22जे-1 च्या (1) मध्ये असे नमूद केले आहे की, "राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, जिल्हास्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ म्हणून संबोधण्यात येणारे एक मंडळ घटित करील." या मंडळाचे अध्यक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक असतील, वरिष्ठतम अपर पोलीस अधीक्षक हे सदस्य असतील आणि सदस्य सचिव म्हणून पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) हे काम बघतील, अशीही तरतूद यामध्ये आहे.

सभापती महोदय, या विधेयकात मागासवर्गीयांची व्याख्या देखील दिलेली आहे. ती अशी आहे की, "मागासवर्ग, या शब्दप्रयोगाचा अर्थ, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग, असा आहे."

सभापती महोदय, माझी शासनाला अशी विनंती आहे की, या मंडळातील एक सदस्य अनुसूचित जाती व जमातीमधील असावा आणि एक सदस्य इतर मागासवर्ग किंवा व्हीजेएनटी प्रवर्गातील असावा. त्यामुळे पक्षपातीपणाचे आरोप होणार नाहीत आणि या विधेयकाचा उद्देश सफल होईल. या माध्यमातून आपल्याला दोन्ही प्रवर्गाला न्याय देता येईल.

सभापती महोदय, पोलीस शिपाई, पोलीस उप निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्या बदलीसाठी परिक्षेत्रस्तरावर पाच वर्षे, आठ वर्षे, असा कालावधी निश्चित केलेला आहे. एखादा पोलीस शिपाई किंवा पोलीस निरीक्षक एकाच ठिकाणी पाच वर्षे किंवा आठ वर्षे राहिला तर त्याला असे वाटते की, आता मला या ठिकाणाहून कोणी हलवू शकणार नाही. त्यामुळे सामान्य नागरिकांवर अन्याय होऊ शकतो. तो एका व्यक्तीचा पक्ष घेऊन दुसऱ्यावर अन्याय करु शकतो. आठ वर्षे किंवा पाच वर्षे, असा कालावधी ठेवला तर त्याला ते पोलीस स्टेशन लिजवर दिल्यासारखे होईल. मधल्या कालावधीमध्ये आपण त्याची बदली करु शकणार नाही आणि मग एककल्ली, हुकूमशाही कारभार होण्याची भीती आहे. त्यामुळे हा कालावधी दोन वर्षे व तीन वर्षे असा सीमित करावा, अशी माझी सूचना आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी या विधेयकाची उद्दिष्टे व कारणे दिलेली आहेत. ती अतिशय चांगली आहेत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी या विधेयकाला एक सुधारणा सुचविली आहे, ती मान्य करावी. तसेच, आम्ही ज्या काही सूचना केल्या आहेत, त्यांचाही शासनाने विचार करावा, अशी विनंती करतो आणि थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3-महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात आले आहे व त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी या विधेयकाला सुधारणा सुचविली असून त्या सुधारणेला माझा पाठिंबा आहे.

सभापती महोदय, शासनाने मांडलेले हे विधेयक निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण, आपण असे बघतो की, प्रशासनासाठी बदली हा एवढा मोठा प्रश्न तयार झाला आहे की, मंत्रालयामध्ये विशिष्ट काळात मोठ्या प्रमाणावर अधिकारी चकरा मारीत असतात. त्यामुळे प्रशासनाचा सर्व वेळ बदल्यांच्या कामामध्ये जातो. साधारणपणे मार्च व एप्रिल महिन्यात अधिकारी मंत्रालयाच्या अवतीभोवती फेऱ्या मारताना आपल्याला दिसतात. या विधेयकाच्या माध्यमातून बदल्यांच्या संदर्भातील अधिकारांचे विकेंद्रीकरण आपण करीत आहोत, हे अत्यंत स्वागतार्ह आहे. हे करीत असताना जिल्हा स्तरावर आस्थापना मंडळ निर्माण करण्याचा आणि त्यांना अधिकार प्रदान करण्याचा शासनाचा मानस आहे. याच संदर्भात सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सुधारणा सुचविली आहे. पोलीस महासंचालकांनी प्राधिकृत केलेला एक अधिकारी या मंडळात असावा, अशी त्यांची सुधारणा आहे. जेणेकरून बदल्यांच्या कामकाजात पक्षपात होणार नाही. ही सुधारणाही योग्य आहे. त्यामुळे सभागृहाने या सुधारणेसह विधेयक मंजूर करावे, अशी विनंती करतो आणि थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री (शहरे)) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3-महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात आले आहे व या विधेयकाला सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यांनी विधेयकाच्या खंड-4, पृष्ठ क्रमांक 2, ओळ क्रमांक 31 "(ब) पोलीस महासंचालक यांनी प्राधिकृत केलेला एक प्रतिनिधी सदस्य" असा मजकूर दाखल करण्यात यावा, अशी सुधारणा मांडली आहे. त्याबरोबरच या सभागृहाचे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश गजभिये यांनीही या विधेयकावरील चर्चेत भाग घेऊन काही मुद्दे मांडले आहेत. या सर्वांचा मी आभारी आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, राष्ट्रीय पोलीस आयोग स्थापन झाला आणि त्यांनी सुचविलेली सुधारणा प्रत्यक्षात कायद्यात करण्यासाठी सन 2015 वर्ष उजाडावे लागले. यामध्ये 20 ते 22 वर्षे निघून गेली. एखादा आयोग सुधारणा सुचवितो, त्यानंतर एखादा अधिकारी न्यायालयात जातो, सर्वोच्च न्यायालय सरकारला बाध्य करते आणि अशा प्रकारची सुधारणा करण्याच्या प्रवासात 15 ते 20 वर्षे निघून जातात.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अतिशय मूलभूत सुधारणा या विधेयकाला सुचविली आहे. त्यांनी असा मुद्दा मांडला आहे की, "लॉ ॲण्ड ऑर्डर बरोबरच इन्व्हेस्टिगेशन हा देखील पोलीस विभागाचा अविभाज्य घटक आहे. परंतु, इन्व्हेस्टिगेशनसाठी आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध होत नाही." किंबहुना त्याही पुढे जाऊन मी असे सांगू इच्छितो की, जेवढा इम्पॉर्टन्स याला दिला पाहिजे, तो दिला जावा आणि यामधील स्ट्रेस कमी करुन कन्व्हिक्शन वाढविण्यामध्ये या मनुष्यबळाचा कसा उपयोग करुन घेता येईल, हे पाहिले पाहिजे. सिक्युरिटी किती द्यावी, कशी द्यावी व कोणाला द्यावी, याबाबतचे निकष आहेत. मंत्री महोदयांचा एखादा कार्यक्रम असेल तर चौकात किती सिक्युरिटी तैनात करावी, वगैरेसाठी देखील काही निकष गरजेचे आहेत, हेही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. कालांतराने यामध्ये काही रिफॉर्म्स करता येतील किंवा कसे, याचाही मागोवा घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी असे सांगितले की, एखादी सुधारणा करण्यासाठी आपल्याला 15 ते 20 वर्षे लागतात आणि तेवढ्या काळात दुसरी सुधारणा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

करण्याची वेळ येते. ही वस्तुस्थिती आहे. व्हीआयपी किंवा अन्य लोकांना सिक्युरिटी देण्याबाबतचा मागोवा घेतला पाहिजे, या त्यांच्या मुद्याशीही मी सहमत आहे. त्यांनी केलेल्या सर्व सूचनांचा आम्ही निश्चितपणे विचार करू.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी असाही मुद्दा उपस्थित केला आहे की, "अधिकारांचे विकेंद्रीकरण होणार असून त्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर आस्थापना मंडळे निर्माण करणार आहोत आणि विशेष विभागाला सुध्दा हे नियम लागू करणार आहोत. त्या ठिकाणी काम करणाऱ्या सदस्यांचा स्थानिक स्तरावर संबंध येऊ शकतो, कुणी कुणाला मदत करतो आणि मग त्या माध्यमातून फेवरेटिझम निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे पाहिजे तसे इफेक्टिव्ह एक्झिक्युशन होत नाही. इंटर डिपेंडंट झाल्यानंतर काही प्रकार घडतात." त्यांनी सांगितलेली शक्यता नाकारता येणार नाही. अधिकारांचे विकेंद्रीकरण जिल्हा स्तरावर केले तर पोलीस अधीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांमध्ये साटेलोटे निर्माण होते व त्यामुळे निर्णयावर परिणाम होऊ शकतो, याबाबत शासनाने विचार करावा, अशी सूचनाही सन्माननीय सदस्यांनी केली आहे. या सूचनेचाही विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी असे सांगितले की, "आकस आणि ममत्व या दोन्हीचा समतोल असावा." त्यांची सूचनाही योग्यच आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "पोलिसांच्या बदल्या करण्याबाबत काळाचे निर्बंध नव्हते, या बदल्या शैक्षणिक वर्षात एका विशिष्ट काळात झाल्या पाहिजेत, अन्यथा मुलांचे शैक्षणिक नुकसान होते," असा मुद्दा उपस्थित केला आहे. ही वस्तुस्थिती आहे की, पोलिसांच्या बदल्या करेपर्यंत जून किंवा जुलै महिना उजाडतो व त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. त्यामुळे या बदल्या एप्रिल किंवा मे या महिन्यातच झाल्या पाहिजेत. जेणेकरून मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

सभापती महोदय, हे विधेयक अनेक वर्षानंतर आलेले आहे. राष्ट्रीय पोलीस आयोगापासून विधेयकावर आज सभागृहात चर्चा होईपर्यंत 15 ते 20 वर्षांचा कालावधी लोटला आहे. म्हणून माझी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना अशी विनंती आहे की, त्यांनी या विधेयकाला सुचविलेली सुधारणा मागे घ्यावी.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या व माझ्या सूचनेच्या संदर्भात पोलीस दलाचा उपयोग कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जास्तीत जास्त केला जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. चौकशी करण्याकरिता पोलीस दलाचा वापर अत्यंत कमी प्रमाणात करण्यात येतो. याचा परिणाम असा होतो की, कोर्टात केसेस दाखल झाल्यानंतर संबंधितांना न्याय मिळत नाही. त्यामुळे शिक्षा होण्याचे प्रमाण कमी होते. यामध्ये दोन भाग स्पष्टपणे आहेत की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये किती पोलीस असावेत. पीएसआय व डीएसपीपर्यंत ही व्यवस्था कशी असावी. गुन्हांची चौकशी करण्याकरिता किती पोलीस दल असावे. या संदर्भातील जबाबदारी डीवायएसपी स्तरावरील अधिकाऱ्यांकडे असावी असे वेगवेगळे केले तर जनतेला न्याय मिळेल. पुढील काळात याबाबत विधेयकात सुधारणा करण्याबाबत मंत्री महोदय सकारात्मक आहेत. हा विषय सन्माननीय सदस्य व माझ्या मूळ सूचनेत होता. आस्थापना मंडळ स्थापन करताना त्या मंडळात आय.जी. आणि एस.पी.स्तरावर या दोन्ही अधिकाऱ्यांचे संगनमत असते. त्यामुळे डी.जी. कार्यालयाचा प्रतिनिधी आस्थापना मंडळावर दिला तर दोघांच्या संगनमताने ठरवून बदली करता येणार नाही. त्यामुळे इतर अधिकाऱ्याला न्याय मिळेल. अशा प्रकारे एक प्रतिनिधी त्यात असावा अशी सूचना आम्ही केली होती याबाबत सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी देखील उल्लेख केला आहे. याबाबत मंत्री महोदय पुढील काळात विचार करणार आहेत, आपला दृष्टीकोन सकारात्मक आहे. त्यामुळे मी जी सुधारणा मांडलर आहे, ती मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने सुधारणा मागे घेण्यात आली.

खंड 4 विधेयकाचा भाग झाला.

खंड 5 ते 8 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-3 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 3 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांच्या मालमत्तेची गुप्त चौकशी

मु.शी.: गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांच्या मालमत्तेची गुप्त चौकशी याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, आज दिनांक 25/03/2015 रोजी लोकसत्ता वर्तमान पत्रात बातमी छापून आली आहे की, 'गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांच्या मालमत्तेची गुप्त चौकशी.' या संबंधी स्पष्ट करण्यात येते की, विक्रांत प्रल्हादराव काटे, आर.टी.आय. कार्यकर्ता, अकोला यांनी विविध अधिकाऱ्यांना दिलेल्या अर्जाची प्रत महासंचालक, ए.सी.बी. यांना दिली आहे. अशा प्रकारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करण्यासाठी संबंधित विभागीय अधिकारी यांच्याकडे प्रत पाठवून खातरजमा केली जाते. त्याप्रमाणे सदर प्राप्त अर्ज पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांच्याकडे पडताळणी करण्यासाठी पाठविण्यात आला आहे. संबंधित पोलीस अधीक्षक यांनी अहवाल दिल्यानंतर त्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सभापती महोदय, जाणीवपूर्वक गृह राज्यमंत्र्यांची संपत्ती व त्याबाबत चौकशी चालली आहे, असा संभ्रम निर्माण झाला आहे, तो संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने निवेदन करण्यात आले आहे.

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL NO. VII OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.)

डॉ.रणजित पाटील (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक -7 महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक - 7 महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम 1869/14 यांच्या विद्यमान तरतुदीनुसार अपिलाच्या प्रयोजनासाठीच्या वादविषयाची रक्कम किंवा किंमत या संभावितरित्या जिल्हा न्यायालयाची पिकनरी ज्युरिडिक्शन 10 लाख रुपयांपर्यंत होती. त्या रकमेच्या वरचे अधिकार उच्च न्यायालयांना सध्या आहेत. आज कामपरत्वे देशातील शहरी व महसुली मालमत्तेच्या दरात वाढ झाली आहे. 10 लाख रुपयांच्या वरील सर्व पिकनरी ज्युरिडिक्शनची प्रकरणे उच्च न्यायालयाकडे पाठवावी लागत होती. त्यामुळे उच्च न्यायालयात दावे आणि दाखले जास्त प्रमाणात होतात. आता महागाई आहे, किंमती वाढलेल्या आहेत, त्यामुळे या सर्वांचा भार उच्च न्यायालयावर जात होता. त्यामुळे कालपरत्वे याचा विचार करुन यात सुधारणा व्हायला पाहिजे. जिल्हा स्तरावरील न्यायालयाची पिकनरी ज्युरिडिक्शन 10 लाख रुपयांवरुन 1 कोटी रुपयांपर्यंत करण्यात येत आहे. जे खटले प्रलंबित आहेत, ते उच्च न्यायालयातून जिल्हा न्यायालयात आणण्यात येतील, असा बदल या विधेयकात करण्यात आला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक - 7 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक - 7 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL NO. VIII OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.)

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक - 8 महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,1975 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक - 8 महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आता पुढील विधेयके पास करण्यात येऊ नये, सभागृहात विरोधी पक्ष नेते नाहीत. एक विधेयक पास करण्याचे ठरले होते, परंतु आता विधेयके पास करण्यात आली आहेत. विरोधी पक्षाचे सदस्य उपस्थित नसताना विधेयके पास करून घेणे बरोबर नाही. ही विधेयके उद्या मंजूर करून घेता येतील. सरकारला एवढी काय घाई झालेली आहे. अधिवेशन अजून काही दिवस आहे. सभागृहात सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत, अशा वेळी आणखी दोन विधेयके मंजूर करून घेणे योग्य होणार नाही. उद्या परवा ही विधेयके चर्चेला घेतली तर सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घेता येईल.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : मंत्री महोदय, आपण या विधेयकाचा उद्देश थोडक्यात सांगावा.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, जेथे स्थानिक नागरी प्राधिकारी संस्था अस्तित्वात आहे तेथे ट्री ॲथॉरिटी स्थापन करण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हे विधेयक महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश मर्यादित आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर आपले विचार व्यक्त करुन सूचना केल्यास त्या सूचना शासनाला उपयोगी ठरतात.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर चर्चा करण्यासाठी माझी काहीच हरकत नाही. मघाशी जी विधेयके मंजूर झाली त्या विधेयकांवर चर्चा झालेली आहे. त्या प्रमाणे आपण याही विधेयकावर चर्चा करु.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहेत. आज सकाळी सन्माननीय गट नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीत विधेयके मंजूर करण्याबाबत चर्चा झालेली आहे. ज्या सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलावयाचे होते, त्यांनी सभागृहात उपस्थित राहावयास पाहिजे होते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आज सकाळी सन्माननीय गट नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली होती. ही विधेयके महत्वाची आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेवर विधेयके दाखविण्यात आलेली आहेत. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे मुद्दा उपस्थित केला की, झाडांचे संरक्षण व जतन सुधारणा विधेयकाचा हेतू जरी मर्यादित असला तरी त्याचा संदर्भ संपूर्ण पर्यावरण रक्षणाच्या संदर्भात आहे. आज सकाळी तारांकित प्रश्नोत्तराच्या तासामध्ये गोरेगाव येथील मेट्रो रेल्वेच्या कारशेड उभारण्याबाबतचा प्रश्न चर्चेला आला होता. हा प्रश्न देखील त्याच संदर्भात होता. कारशेड उभारण्यासाठी झाडे पाडली जातात आणि आपण ती झाडे पुन्हा कशी लावणार असा एक प्रश्न त्यातून निर्माण झाला होता. तो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

विषय देखील गंभीर आहे आणि त्या विषयावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. सभागृहात आता उपस्थिती कमी आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी आता फक्त या विधेयकाचा उद्देश सांगावा व हे विधेयक उद्या चर्चेला घ्यावे.

तालिका सभापती : मंत्री महोदय, आपण आता या विधेयकाचा उद्देश सांगावा. आपण हे विधेयक उद्या चर्चेला घेऊ.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 मधील कलम 3 मधील तरतुदीनुसार हा अधिनियम अंमलात आल्यानंतर लगेच नागरी स्थानिक प्राधिकरण म्हणजे ट्री ॲथॉरिटी सुद्धा अस्तित्वात यावयास पाहिजे. परंतु, बऱ्याच नगरपालिकांमध्ये ट्री ॲथॉरिटी अस्तित्वात नाही आणि जेथे कोठे विकासाचे काम करावयाचे असते, जेथे वृक्ष पाडावयाची असतात त्यासाठी परवानगी कोणी द्यावी आणि त्या परवानगीसाठी सहा-सहा महिने निघून जातात. एखादा प्रकल्प करावयाचा असेल आणि एखादे मोठे झाड मध्ये येत असेल तर त्या प्रकल्पाचे काम थांबून जाते. म्हणून तेथे रितसर ट्री ॲथॉरिटी निर्माण होईपर्यंत या विधेयकान्वये हे अधिकार महानगरपालिका असेल तर आयुक्तांना आणि नगरपालिका असेल तर मुख्याधिकाऱ्यांना प्रदान करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या विधेयकामध्ये एवढीच सुधारणा प्रस्तावित आहे.

तालिका सभापती : मंत्री महोदय, या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. कारण, हा अनेक सन्माननीय सदस्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. हा पर्यावरणाशी संबंधित विषय आहे. या विधेयकाचा उद्देश मर्यादित असला तरी या विधेयकावर सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे असल्यामुळे वरील चर्चा येथेच थांबविण्यात येत आहे. हे विधेयक उद्या पुन्हा चर्चेला घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा)विधेयक.

L.A. BILL NO. X OF 2015

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA FIRE PREVENTION AND LIFE SAFETY MEASURES.)

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 10- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 10- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 अन्वये रुग्णालयीन इमारतीच्या उंचीबाबत जी बंधने घातलेली आहेत ती शिथिल करण्याबाबत या विधेयकान्वये सुधारणा करण्यात येत आहे. आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 मधील कलम 3 व त्यावरील अधिसूची 1 व 2 अनुसार रुग्णालयाची उंची 30 मीटर इतकी ठेवण्यात आली व आपण ते नॅशनल बिल्डींग कोड, 2005 मधील तरतुदी नुसार केले होते. त्यामुळे शासन, स्थानिक प्राधिकारी संस्था, न्यास यांची जी हॉस्पिटल्स आहेत त्यांचा विकास आणि पुनर्विकास खोळंबला होता. गरजेनुसार जेथे विकास करणे अपरिहार्य झाले होते, तेथे आपण महानगरपालिका क्षेत्रात काही ठिकाणी 5 एफएसआय तर काही ठिकाणी 4 एफएसआय दिला. परंतु, जागा कन्स्ट्रक्टेड होत्या, जागेचा स्पेस कमी होता. उदाहरणच द्यावयाचे झाले तर मुंबई शहरातील जे.जे.हॉस्पिटल, भाटीया हॉस्पिटल आणि अन्य शासकीय व ट्रस्टची देखील हॉस्पिटल्स आहेत. आपण त्या हॉस्पिटलची उंची 30 मीटर इतकीच ठेवू शकतो. कारण आपल्याला त्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

कन्स्ट्रिक्शन्स होते. आपण एकीकडे 5 एफएसआय देत होतो. परंतु, फायर कायद्याच्या कन्स्ट्रिक्शन्समुळे आपण त्याची व्हर्टिकल डेव्हलपमेंट करु शकत नव्हतो. जेथे आरोग्य सुविधा पुरवावयाच्या होत्या, फंड्स उपलब्ध होते, एफएसआय देखील होता. परंतु तेथे व्हर्टिकल डेव्हलपमेंटला फायरच्या कन्स्ट्रिक्शन्सच्या नियमामुळे आपण हे करु शकत नव्हतो. आपण तेथे या विधेयकान्वये हे अधिकार प्रदान करीत आहोत. आपण एनबीसीच्या शिफारशीनुसार ही मर्यादा घातली होती. ते रिकमेंडरी होते. सन 2006 मध्ये कलकत्ता येथे जी घटना घडली त्या घटनेत मोठ्या प्रमाणावर जीवित हानी झाली होती. त्यानंतर नॅशनल बिल्डींग कोड अस्तित्वात आला आणि त्यांनी हॉस्पिटलच्या उंचीवर निर्बंध घातले. परंतु, आता असे लक्षात येते की, फंड्स आहे, एफएसआय आहे आणि हे सर्व असताना देखील आपण मुंबई सारख्या मोठ्या शहरामध्ये जेथे मध्य भागात हॉस्पिटल्स आहेत त्यांचे व्हर्टिकल डेव्हलपमेंट करु शकत नव्हतो. म्हणून आग प्रतिबंधक ज्या यंत्रणा आहेत त्या बसविण्यासाठी किमान ज्या आवश्यकता आहेत त्यांची पूर्तता करण्यासाठी आपण हे अधिकार प्रदान करीत आहोत. आपण या विधेयकान्वये 30 मीटर ऐवजी 45 मीटर उंचीसाठी परवानगी देत आहोत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 10- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना सुधारणा विधेयकाचे मी स्वागत करतो. तांत्रिक गोष्टींमुळे अनेक अडचणी निर्माण होत होत्या. मला अशी सूचना करावयाची आहे की, जी छोटी रुग्णालये आहेत त्यांना फायर सेफ्टी ॲक्टचा खूप त्रास होतो. कारण, छोट्या रुग्णालयांमध्ये सर्व अत्याधुनिक यंत्रणा बसविणे शक्य नसते, ती खूप महाग असते. म्हणून फायर सेफ्टी ॲक्टमध्ये पुढील काळात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. 100 खाटांपेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांना आग प्रतिबंधक नियम लागू करावा, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील साहेब स्वत: ऑर्थोपॅडिक सर्जन आहेत आणि रिजनल मेडिकल असोसिएशनची कायम ही मागणी राहिलेली आहे की, फायर सेफ्टी ॲक्टचा त्यांना खूप त्रास होतो. जी छोटी रुग्णालये आहेत त्यांना यातून वगळण्यात यावे, अशा प्रकारच्या उपाययोजना आपण पुढील काळात कराव्यात, अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी अत्यंत महत्वाची सूचना केलेली आहे. त्यांनी खरोखर प्रॅक्टीकल सजेशन केलेली आहे. त्या बाबतीत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 10- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना सुधारणा विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 10- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 यात सुधारणा करण्याकरिता हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. हे विधेयक अतिशय उपयुक्त आहे. आम्ही या विधेयकाचे स्वागत करतो. परंतु, मी सांगू इच्छितो की, अगोदर 30 मीटर पर्यंतची मर्यादा घालण्यात आली होती. त्यामुळे वैद्यकीय सेवा करणारे जी हॉस्पिटल्स आहेत त्यांचा विस्तार करावयाचा असेल, नवीन सुविधा निर्माण करावयाच्या असतील तर त्यांना विस्तारीकरणासाठी अडचण निर्माण होत होती, त्यासाठी आपण ही तरतूद केलेली आहे. आम्ही या विधेयकाचे स्वागत करतो. आपण या विधेयकान्वये रुग्णालयांची उंची 30 मीटर ऐवजी 45 मीटर पर्यंत वाढविण्याची तरतूद केलेली आहे. तसेच, नियोजन प्राधिकरणाच्या विनंतीवरुन 45 मीटरपेक्षा अधिक उंच असलेल्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी नियोजन प्राधिकरणाला परवानगी देण्याकरिता राज्य शासनास अधिकार देण्याची तरतूद करणे शासनास इष्ट वाटते, असेही आपण म्हटलेले आहे. आम्ही याचे स्वागत करतो. परंतु, एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपण कितीही उंच इमारत बांधण्यासाठी परवानगी द्यावी. आपण टॉवरिंग इन्फॉर्मल नावाचा सिनेमा बघिता असेल. मल्टी स्टोअरीज बिल्डींगला आग लागल्यानंतर कशा पद्धतीचा आतंक निर्माण होतो हे आपण बघितले आहे. असे दृश्य पडद्यावर बघताना माणसाच्या अंगावर शहारे येतात असा तो सिनेमा आहे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

त्यानंतर मल्टी स्टोरी इमारतींमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना असली पाहिजे ही धारणा निर्माण झाली. आपण रुग्णालयांना 45 मीटरपर्यंत बांधकाम करण्यास परवानगी देत आहात ही उत्कृष्ट गोष्ट आहे. परंतु त्या ठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजनेची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 10 महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हा विषय छोटा नाही. या विधेयकावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. पक्ष प्रतोदांनी सुचविल्याप्रमाणे आम्ही या विधेयकाला सहमती देत आहोत. कोणत्या माध्यमातून रुग्णालयांना 45 मीटरपर्यंत बांधकाम करण्यास परवानगी देत आहात हा विषय अनुत्तरित आहे. उर्ध्व दिशेने 45 मीटरची मर्यादा निश्चित केली आहे. विशिष्ट रुग्णालयांना ही परवानगी देणे आणि राज्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे यामध्ये फरक आहे. ज्या रुग्णालयामध्ये सर्वसाधारण माणूस जात नाही, गरीब माणूस जात नाही, त्या रुग्णालयांना 45 मीटरपर्यंत बांधकाम करण्यास परवानगी देत आहात. गरीब माणसांसाठी पुढील काळात विधेयकामध्ये सुधारणा करावी अशी माझी विनंती आहे. या मोठया रुग्णालयांकडून गरीब जनतेला न्याय मिळत नाही, तेथील उपचार गरीब माणसांना परवडत नाहीत. विधेयक आणण्यामागचा उद्देश साध्य व्हावा. परंतु कायदा तयार करताना तो गरिबांच्या हिताचे रक्षण करणारा कायदा असला पाहिजे. हे सभागृह गरीब जनतेला न्याय देणारे आहे. फायर प्रिव्हेन्शनचे विधेयक नसून त्यांच्या सोयी सुविधा एनलार्ज करीत आहात.

सभापती महोदय, निश्चितच बीपीएल, बिलो बीपीएल, एपीएल वर्गातील लोकांना या मोठया रुग्णालयाकडून न्याय मिळाला पाहिजे. तसे विधेयक पुढील काळात सरकारने आणावे. निश्चितच 45 मीटर बांधकाम करण्यास जेवढी रुग्णालये पुढे येतील त्यांचे स्वागत केले जाईल. मोठया रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना उपचारासाठी आत घेतले जात नाही, प्रथम पैसे भरण्याची मागणी केली जाते. म्हणून गरीब लोक त्या ठिकाणी जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सरकार त्यांच्या मागे उभे असले तरी त्यांच्याकडून योग्य काम चालते का याची पाहणी सरकारने केली पाहिजे. हे सभागृह त्यांच्या दृष्टीने चर्चा करणार नसेल तर अटी व शर्तीनुसार त्यांना मंजुरी द्यावी. आमचा या विधेयकाला विरोध नाही. परंतु आम्ही ज्या प्रवर्गातून येतो, ज्यांचे प्रतिनिधीत्व करतो त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा एवढे बोलतो आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ज्या सूचना माननीय सदस्यांनी केल्या आहेत त्या विचारात घेण्यात येतील.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक- 10 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक- 10 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : चंद्रपूर जिल्हयातील वर्धा व इरई नदीवरुन मोठया प्रमाणात होत असलेला पाण्याचा उपसा

मु. शी. : चंद्रपूर जिल्हयातील वर्धा व इरई नदीवरुन मोठया प्रमाणात होत असलेला पाण्याचा उपसा यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करते :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा व इरई नदीवरुन मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात असणे, त्यात ४ विज केंद्र, ३ वेकोली उद्योग, २ मत्स्य केंद्र, २ पाणी पुरवठा योजना व इतर अशा १३ विविध उद्योगांद्वारे व संस्थांद्वारे पाणी उपसा करण्यात येणे, सदर उद्योग व इतरांकडे १ कोटी, ९२ लाख, २७ हजार रुपये पाणीकर शिल्लक असणे, सदर उद्योगांनी अद्यापही पाटबंधारे विभागाकडे पाणीकर न भरल्याने पाटबंधारे विभागाने त्यांना नोटीस देणे, त्यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे होत असलेले नुकसान, संबंधित उद्योगांवर होत नसलेली कारवाई, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयातील चार विद्युत प्रकल्पांना पाणी देत असताना प्रती मे.वॉट किती टीएमसी पाणी लागते याचा हिशोब शासनाकडे नाही. 100 मे.वॉट वीज निर्मितीसाठी 40 टीएमसी पाणी मागितले जाते. परंतु 1 मे.वॉट वीज निर्मितीसाठी किती पाणी लागते याचा हिशोब नसल्यामुळे मोठया प्रमाणात पाण्याची चोरी विद्युत प्रकल्पांच्या माध्यमातून होत आहे. प्रती मे.वॉट किती पाणी लागते याचा हिशोब करुन यापुढे कोणत्याही विद्युत प्रकल्पाला पाणी देत असताना विचार होणे आवश्यक आहे. त्या प्रमाणात त्यांना पाणी द्यावे आणि त्या पाण्याचा दर आकारणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात धारिवाल प्रकल्पाच्या माध्यमातून वर्धा नदीवर रेडियल वेल खोदून 30 मीटर खोल जाऊन प्रत्येक फुटावर 5 याप्रमाणे 100 फूट आडवे पाईप टाकून भूगर्भातील पाण्याचा उपसा केला जात आहे. किती पाणी घेतले याचा हिशोब कोणाकडेही नाही. प्रकल्पाला अनुमती देत असताना त्यांनी स्पेशल तलाव बांधून पावसाळ्याचे पाणी त्यात साठवावे आणि उन्हाळ्यामध्ये ते पाणी वापरावे अशी तरतूद करारामध्ये असताना रेडियल वेल खोदून 30

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

मीटर खोल जाऊन एका फुटावर 5 पाईप याप्रमाणे 100 फूट आडवे पाईप टाकून पाणी खेचण्याकरिता 150 मे.वॉटचे दोन विद्युत पंप बसविण्यात आले आहेत. या संदर्भात मी हरकत घेतली होती. रेडियल वेल नदी पात्रात खोदत असताना तो जलसंधारण विभागाचा अधिकार आहे. भूगर्भातील पाण्यावर जलसंधारण विभागाचा अधिकार नाही. भूगर्भातील पाण्याचा अधिकार ज्यांच्याकडे आहे त्यांच्याकडून परवानगी घेतलेली नाही. मोठया प्रमाणात पाण्याचा उपसा रेडियल वेलच्या माध्यमातून केल्यामुळे आजूबाजूच्या 10 गावांना उन्हाळ्यामध्ये पाणी कमी पडते.

सभापती महोदय, वर्धा नदीचे पाणी माणिकगढ सिमेंट कंपनी, बल्लारशा पेपर मिल, कोठारी इंडस्ट्रीकडे जाते. याबाबत शासनाने विचार करावा अशी मी विनंती करते. बल्लारशा पेपर मिलकडून गेली 20 वर्षे वर्धा नदीचे पाणी घेतले जाते. परंतु पाण्याचे दर वाढविले म्हणून त्या कंपनीने कोर्टात दावा दाखल केला आहे. मी सतत याबाबत पाठपुरावा करीत आहे. कोर्टाबाहेर तडजोड करण्याबाबत कोणीच प्रयत्न करीत नाही. दरवर्षी त्यांच्याकडून 10 लाख रुपये घ्यायचे.....

नंतर 2 टी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

मग ते 20 वर्षे सुरू राहते. बल्लारशा पेपर मिल प्रचंड प्रमाणावर पाण्याचा वापर करीत आहे. कारण त्यांना कपडा सडवावा लागतो. झाडे सडवावी लागतात. त्यातून मग कागदाचा लगदा तयार होतो व त्यानंतर कागद तयार होतो. बल्लारशा पेपर मिल प्रचंड पाण्याचा उपसा करत असताना सुद्धा आपण 20 वर्षापासून कोर्टाची केस देखील विद्ड्रॉ करू शकलेलो नाही. आपल्या बाजूने न्याय मिळवू शकलेलो नाही. मोठ्या प्रमाणावर वर्धा नदीचे एरिगेशनचे पाणी वापरून सुद्धा आपण त्यांच्याकडून 10 लाखाच्या वर पैसेच घेऊ शकत नाही. ही केस कुठे तरी निकालात काढून या पेपर मिलकडे असलेली संपूर्ण थकित रक्कम वसूल करावी अशी मी आपणाला विनंती करीत आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राकडून 90 लाख 15 हजार रूपये येणे आहे. वास्तविक पाहता इरई नदीचे पाणी हेच केंद्र मोठ्या प्रमाणावर वापरत आहे. धरण देखील इरई नदीवर बांधण्यात आले आहे. त्यामुळे पाण्याचा कर देणे अत्यंत आवश्यक आहे. तो देखील वसूल करण्यात यावा व दरवर्षी वसुली होण्याकडे आपण लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

चंद्रपूर मनपाकडे पाण्याचे दुसरे कुठलेही साधन नाही. इरई नदीचे पाणी हेच पिण्याचे साधन आहे. समजा काही अडचण निर्माण झाली तर पर्यायी व्यवस्था म्हणून चंद्रपूर मनपाने काहीच केलेले नाही. ते खाजगी कंपनीद्वारे पिण्याच्या पाण्यावरील कर वसुली करीत आहेत. परंतु, शासनाचे रूपये 60 लाख 48 हजार त्यांनी न देणे हे काही बरोबर वाटत नाही. त्यांनी पाणी बंद केले तर पिण्याचे पाणी कोणालाच मिळणार नाही. तेव्हा रूपये 60 लाख 48 हजार वसूल करून महानगरपालिकेला पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करता आली तर करावी अशा प्रकारची सूचना आपण करावी. कारण आज आपण पाणी पुरवू शकत नाही. तेव्हा महानगरपालिकेला पर्यायी पाण्याची व्यवस्था करण्याची सूचना आपण करावी.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

वरोरा नगर पालिकेकडे 1 लाख 67 हजार पाणी कर शिल्लक आहे. ते देखील इरई नदीवरून पाणी घेतात. धारीवाल कंपनीने पाण्याचा उपसा करून सुद्धा रुपये 9 लाख 71 हजार अद्याप पर्यंत दिलेले नाहीत. भूगर्भातील पाण्याचा उपसा केल्यामुळे उन्हाळ्यामध्ये वर्धा नदीमध्ये पाणीच राहात नाही. त्यामुळे आजूबाजूच्या गावातील लोकांना पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होते. त्यांनी अद्याप पर्यंत स्वतःचा तलाव निर्माण केलेला नाही. तलावासाठी फक्त खोदकाम करून अर्धवट अवस्थेत काम ठेवलेले आहे. गुप्ता एनर्जी यांच्याकडे 19 लाख रुपयांची थकबाकी आहे. चिमूर शारदा अंबिका पॉवर स्टेशनकडे रुपये 4 लाख 63 हजाराची थकबाकी आहे. चंद्रपूर जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची सर्वात अडचण कुठे असेल तर ती चिमूरमध्ये आहे. आज तेथे पाण्याची व्यवस्थाच नसल्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर अडचण निर्माण होत आहे. पाणी देऊन वर पैसे न देण्याची भूमिका या पॉवर स्टेशनची असेल तर त्याबाबत आपण कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. वेकोलीचे पाणी कार्यालयासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. वेकोली ताडाळी, वेकोली माजरी, तेलवासा येथे मोठ्या प्रमाणावर पाणी वापरले जाते. त्यांचे देखील पैसे येणे असून ते आपण वसूल करावेत अशी माझी विनंती आहे. चारगाव व गडचांदूर,अमरनाल येथे आपण मत्स्यबीज केंद्र उघडले असून अनुक्रमे रुपये 1 लाख 67 हजार व रुपये 1 लाख 81 हजार येणे आहेत. साखरवाही पाणी पुरवठा योजना देखील वर्धा व इरई नदीवर आहे. या योजनेचे 2 लाख 49 हजार रुपये येणे बाकी आहेत. बोरगाव शिवणफळ पाणी पुरवठा योजनेचे रुपये 43 हजार येणे बाकी आहेत. जलसंपदा विभागाने मागणी करून देखील कुठल्याही प्रकारची वसुली अद्याप पर्यंत झालेली नाही. त्यांना फक्त कागदपत्र देण्याचाच अधिकार आहे. आज त्यांच्याकडे वसुली करण्याचे कुठलेही साधन नाही. वसुली करण्यासाठी कायद्यात कुठलीही तरतूद नाही. आज एखाद्या प्रोजेक्टचे पाणी बंद करण्याचा देखील त्यांना अधिकार नाही. त्यांनी मागणी केली तरी आमचे काही वाकडे होऊ शकत नाही हे त्यांना देखील माहीत आहे. त्यामुळे उद्योजक त्यांना पैसे देत नाहीत. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभाताई फडणवीस...

तेव्हा त्यांना कायद्याने अधिकार देण्याचा विचार करावा अशा प्रकारची विनंती मी येथे करीत आहे. कारण कंपनीची पॉवर खूप मोठी असते. जलसंपदा हे खूप छोटे खाते आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाला पैसे दिले नाहीत तरी ते आपले काहीच बिघडवू शकत नाही असे सर्वांना वाटते. नव्हे तशी कारखानदारांची मन:स्थिती आहे. तेव्हा आपण या विभागाला कायद्याने पॉवर देण्यासाठी मदत करावी अशी मी आपल्याला विनंती करते. महानगरपालिका चंद्रपूर, महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर यांना इरई नदीच्या पाण्याशिवाय दुसरी कोणतीच सोय नाही. त्यामुळे नदीतून पाणी घेतले जाते. आज तेथे पाण्याची पर्यायी व्यवस्था नाही. तेव्हा बल्लारशा पेपर मिल, धारिवाल कंपनी व अन्य प्रकल्पांना किती पाणी लागते याचा एकदा कुठे तरी हिशोब करून जादाचा पैसा वसूल करावा व पाण्याची चोरी थांबवावी अशी विनंती मी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून करीत आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली आहे. त्यातील बऱ्याच गोष्टी खऱ्या आहेत. वर्ध्यातील इरई नदीवरून मोठ्या प्रमाणावर उद्योगांसाठी, महानगरपालिकांसाठी पाणी घेतले जात आहे. यात 4 विद्युत केंद्र आहेत. 3 वेस्ट कोल्ड फिल्डच्या कंपन्या या नदीचे पाणी वापरत आहेत. या नदीवर 2 मत्स्यबीज केंद्र व 2 पाणी पुरवठा योजना आहेत. अशा एकूण 13 योजना या नदीवर आहेत. सन्माननीय सदस्यांनी शासनास रुपये 1 कोटी 92 लाख 97 हजार रुपये देणे असल्याचे सांगितले आहे. मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा आकडा एक कोटी रुपयांचा नसून ही संपूर्ण वसुली 14 कोटी 93 लाख रुपये इतकी आहे. आज सकाळी माझ्याकडे अधिकारी ब्रीफिंगला आले होते. त्यावेळी मी महाजनकोचे मुख्य अभियंता श्री.लोंढे यांच्याशी बोललो. धारिवाल उद्योगाच्या जनरल मॅनेजरशी देखील मी बोललो. तसेच चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त श्री.शंभरकर यांच्याशी देखील बोललो. सकाळी 11.00 वाजता बीफ्रिंग घेतल्यानंतर दुपारी 2.00 वाजेपर्यंत महाजनकोने आरटीजीएसद्वारे 9 कोटी रुपये शासनाच्या खात्यावर जमा केले आहेत. चंद्रपूर महानगरपालिका 1991 पासून पाणी घेत आहे. त्यांच्याकडून फक्त पाण्याची रॉयल्टी घेण्यात येते. कारण तो डॅम महाजनकोचा आहे. निसर्गाच्या पाण्यावर आपण प्रती 10 हजार लिटरला 70 पैसे या दराने रॉयल्टी घेत आहोत. ती रॉयल्टी चंद्रपूर महानगरपालिकेने 1991 पासून आजतागायत भरलेली नव्हती. आज सकाळी मी श्री.शंभरकर यांच्याशी आपण पैसे का भरत नाही या विषयी बोललो व त्यांच्याकडे विचारणा केली की, आपण लोकांना पाणी देता म्हणजे पाणीपट्टीच्या रुपाने लोकांकडून पैसे घेत असाल. मी त्यांना हेही सांगितले की, आपल्याकडून कमी दराने रॉयल्टी आकारण्यात येत आहे. 1991 पासून आज पर्यंत एकूण 2 कोटी 69 लाख एवढी रॉयल्टीची रक्कम आपल्याकडून येणे बाकी आहे. यावेळी मी त्यांना विचारले की, आपले रनिंग बिल किती आहे. तेव्हा त्यांनी यावर्षीचे रनिंग बिल 4 लाख रुपये आहे असे सांगितले. तेव्हा त्यांना मी 2 ते 3 वर्षाचे बिल एकदम भरावे असे सांगितले. मला सांगावयास आनंद वाटतो की, त्यांनी आज दुपारी 2.00..... ..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे....

वाजण्याच्या आत रूपये 10.00 लाख आरटीजीएसद्वारे शासनाच्या खात्यामध्ये जमा केले आहेत. 9 कोटी रूपये महाजनकोचे आणि 10 लाख रूपये चंद्रपूर महानगरपालिकेचे असे मिळून 9 कोटी 10 लाख शासनाकडे जमा करण्यात आले आहेत. धारिवाल उद्योगाकडून एक-दीड लाख रूपये येणे नसून तब्बल रूपये 41लाख 71 हजार येणे बाकी आहे. त्यांना सदर रक्कम भरण्यासाठी 31 मार्च पर्यंतची मुदत आहे. यासंबंधी मी त्यांच्या जनरल मॅनेजरशी बोललो आहे. माझ्या पद्धतीने मी नीट समजावून सांगितल्यानंतर त्यांनी देखील आरटीजीएसद्वारे पैसा जमा करतो असे सांगितले. पण त्यावेळी 3.00 वाजले होते. साधारणपणे 2.00 वाजेपर्यंत आरटीजीएस करण्याची वेळ असते. त्यामुळे त्यांनी उद्या 36 लाख रूपये पेमेंट करू असे सांगितले आहे. त्यामुळे उधारी बाकी आहे हा आपला प्रश्न मिटलेला आहे.

धारिवाल कंपनीने भूगर्भामध्ये आडवा बोअर मारून भूगर्भातील पाणी घेतले असेल तर त्याची चौकशी केली जाईल. शेवटी त्याला देखील मीटरींग आहे. त्यांनी पाणी धरणातून किंवा वेलमधून घेतले तरी मीटरप्रमाणे त्यांच्याकडून आकारणी केली जात असेल. ते मीटर सोडून पाणी घेत असतील तर त्याची निश्चितपणे चौकशी करून कारवाई केली जाईल. त्याचे आणखी काही दायित्त्व निघत असेल तर त्या दृष्टीने विचार केला जाईल.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय शिवतारे .....

सभापती महोदय, बल्लारशा पेपर मिलचे प्रक्ररण न्यायप्रविष्ट आहे. इतक्या वर्षामधून त्यांच्याकडून केवळ 10 लाख रुपये मिळत असेल तर ती केस देखील ऐरणीवर घेऊन स्टे उठविणे आणि योग्य ती रिकव्हरी करण्यासाठी विभागाच्या माध्यमातून ताबडतोब कार्यवाही केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. मला वाटते सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे मिळाली असतील असा विश्वास आहे.

तालिका सभापती : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अर्धा-तास चर्चेसंबंधी

तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) **:** आजच्या कामकाजात दर्शवण्यात आलेली दुसरी अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आली आहे.

दमणगंगा, पिंजाळ व नारपार, तापी, नर्मदा या नदीजोड योजनेच्या सादरीकरणासंबंधीची घोषणा

दिनांक 20 मार्च, 2015 रोजी श्री. जयवंतराव जाधव व इतर सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दमणगंगा, पिंजाळ व नारपार, तापी, नर्मदा या नदीजोड योजनेबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्यावेळी दिलेल्या निदेशानुसार दमणगंगा, पिंजाळ व नारपार, तापी, नर्मदा या नदीजोड योजनेचे सादरीकरण जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र शासन हे गुरुवार दिनाक 26 मार्च, 2015 रोजी दुपारी 4.30 वाजता, कक्ष क्रमांक 145 (पहिला मजला) विधान भवन, मुंबई येथे करणार आहेत. विधान परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सादरीकरणाच्या वेळी उपस्थित रहावे ही विनंती.

सभा□हाची बैठ□ आता स्थ□□ होऊ□□उद्या गुरुवार, दि□□□ 26 मार्च, 2015 रोजी दुपारी 12 वाजता पु□□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□1 मि□□टां□□, गुरुवार, दि□□□ 26 मार्च, 2015 रोजीच्या दुपारी 12 वाजेपर्यंत स्थ□□ झाली)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION